गजेन्द्रमोक्ष

डॉ. वा. के. लेले

गजेन्द्रमोक्ष

अगस्त्य ऋषीच्या शापामुळे हत्तीरूप झालेल्या इन्द्रद्युम्न राजाला विष्णूनें मगराच्या विळख्यातून सोडविले आणि मोक्ष दिला; पूर्वजन्मींचा हूहू नामक गंधर्व देवल ऋषीच्या शापामुळे मगर झाला होता; अशी एक पुराणकथा (myth) असून ती भक्तिमार्गीयांना अतिशय प्रिय व आदरणीय आहे. ह्या कथेवरील प्राचीन व मध्ययुगीय चित्रे व शिल्पे भारतातील अनेक वस्तुसंग्रहालयांत आढळून येतात. ह्या कथेवर कचेश्वर, देवदास, नारायण, माधव, मुक्तेश्वर, मोरोपंत, रघुनाथपंडित, रङ्गनाथ, वामनपंडित इत्यादी मध्ययुगीय मराठी कवींनी लहानमोठी काव्ये लिहिली असून ती सर्व ह्यापूर्वी मुद्रित झालेली आहेत.

प्रस्तुत पुस्तकात संस्कृत व मराठी भाषांतील सुमारे पन्नास पूर्णापूर्ण हस्तलिखितांच्या आधारे 'गजेंद्रमोक्ष' आख्यानाचा अभ्यास सादर करण्यात आला आहे. प्रथमतः आख्यानास आधारभूत असलेल्या मूळ ग्रंथांची ओळख करून देण्यात आली असून तदनुषंगानें आख्यानाच्या स्वरूपाविषयीच्या काही प्रश्नांची चर्चा करण्यात आली आहे. तदनंतर तीन अज्ञातनाम आणि एकनाथ, गिरिदास, गोविंद, पंडित सुरेंद्र, माधव, रघुनाथ, विष्णुदास व शेष ह्या मध्ययुगातील मराठी कवींच्या अद्यापपावेतो अप्रसिद्ध असलेल्या कविता येथे पहिल्यांदाच मुद्रित करण्यात आल्या आहेत. पुस्तकाच्या चौथ्या व अखेरच्या प्रकरणात ह्या कवितांचे अन्तर्बाह्य सौन्दर्य उकलून दाखविले आहे. अशा प्रकारे आत्मज्ञान, भक्तिभाव व प्रपंचवैराग्य यांना पोषक असलेल्या ह्या आख्यानाचा, अपूर्वप्रकाशित मराठी काव्यांच्या आधारे, परिचय करून देण्यात आला आहे. तो मराठी काव्याच्या रसिकांना अभिनव व आस्वाद्य वाटेल.

गजेन्द्रमोक्ष

[संस्कृत व मराठी हस्तलिखितांच्या आधारे अभ्यास]

प्रा. डॉ. वा. के. लेले

एम्. ए., पीएच्. डी.,

मराठीचे प्रपाठक

भारतीय - भाषा - विभाग, कलासंकाय

काशी हिन्दू विश्वविद्यालय, वाराणसी

प्रथमावृत्ती १९८१] [किंमत वीस रुपये

प्रकाशिका : सौ० मालती वामन लेले
घर नं. बी २७/६२ डी १ ए,
दुर्गाकुण्ड रोड, वाराणसी–२२१००५ (उ. प्र.)

सर्व हक्क सुरक्षित
© डॉ. वा. के. लेले

मुखपृष्ठावरील छायाचित्र : देवगढ (जिल्हा झाशी, उत्तरप्रदेश) येथील दशावतारमन्दिराच्या उत्तरेकडील भिंतीवरील 'गजेन्द्रमोक्षा'चे शिल्प (काळ इ. स. मुमारे ५००–५२५)

मुद्रक :
स्पेशल प्रिंटर्स,
लंका, वाराणसी–२२१००५ (उ. प्र.)

निवेदन

प्रस्तुत पुस्तक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

१९७५ साली 'मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये' संपादित करताना गजेंद्र-मोक्षाच्या आख्यानाने माझे लक्ष वेधून घेतले. त्याच वर्षी कचेश्वर, मोरोपंत, वामनपंडित, रघुनाथपंडित, रंगनाथ, मुक्तेश्वर, नारायण इत्यादी प्राचीन मराठी कवींच्या 'गजेंद्रमोक्ष'-पर मुद्रित कवितांचा अभ्यास करून तदाधारे एक हस्तलिखित प्रकाशनअनुदानाच्या विचारार्थ पुणे विद्यापीठाला सादर केले. त्याचे पुढे काय झाले नकळे ! त्यानंतर, सुमारे तीन वर्षांपूर्वी विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रस्तुत पौराणिक आख्यानाची संस्कृत व मराठी भाषांतील हस्तलिखिते जमविण्यासाठी व त्यांच्या अध्ययनातून हाती येणारे निष्कर्ष प्रकाशित करण्यासाठी सातशे पन्नास रुपयाचे अनुदान मला काशी हिन्दू विश्वविद्यालयामार्फत दिले. त्या अनुदानामधूनच हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

ह्या पुस्तकाची एकूण चार प्रकरणे असून त्यांपैकी पहिल्या प्रकरणात संस्कृत व मराठी भाषांतील मिळून पन्नासाहून अधिक हस्त-लिखितांचा परिचय करून दिला आहे. दुसऱ्या प्रकरणात सुरवातीस प्रस्तुत आख्यानाचे प्राचीन मूळ आधार कोणते व त्यांतील कथानकाचे स्वरूप कसे आहे, ते विशद केले आहे आणि त्यानंतर हे आख्यान की उपाख्यान, ह्याला स्तोत्र म्हणता येईल काय, ह्याची गणना पंचरत्नांत का होते इत्यादी मुद्यांची चर्चा केली आहे. तिसऱ्या प्रकरणात एकूण बारा मध्ययुगीय मराठी कवींची काव्ये, संक्षिप्त परिचयासह, छापली आहेत. शेवटच्या म्हणजे चौथ्या प्रकरणात ह्या बारा काव्यांच्या बहिरंगांचे व अंतरंगांचे गुणदोष दर्शवून दिले आहेत. शेवटच्या दोन प्रकरणांच्या योगे रघुनाथ, गिरिदास, गोविंद, पंडित सुरेंद्र, माधव व शेष अशा काही नवीन कवींशी मराठी वाचकांची ओळख होईल. शेवटी निवडक शब्दांचे अर्थ दिले आहेत.

ह्या पुस्तकातील काही उणिवांची जाणीव खुद्द मलाच आहे. उदाहरणार्थ, रघुनाथाची संपूर्ण समश्लोकी, मूळ भागवती पद्यांसकट, उद्धृत करावयास हवी होती. तसेच रामदास व जनीजनार्दन यांची

प्रदीर्घ काव्ये पूर्णपणे समाविष्ट करावयास हवी होती. महाभारत, भागवत व पद्मपुराण या मूळ आधारभूत ग्रंथांतील आख्याने समग्रपणे उतरून घ्यावयास हवी होती. शेवटच्या प्रकरणातील समीक्षणही अधिक विस्तृत असावयास हवे होते. तसेच पौराणिक संदर्भ-विषयक टीपाही द्यावयास हव्या होत्या. परंतु, विद्यापीठ अनुदान मंडळाने दिलेले अनुदान बेताचे असल्यामुळे इच्छा असूनही वरील मजकुराचा अन्तर्भाव प्रस्तुत पुस्तकात करता आला नाही. पुढेमागे दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास हा मजकूर दाखल करता येईल.

विद्यापीठ अनुदान मंडळाने 'Grant for support of research in the Universities during V Plan' ह्या योजनेखाली प्रस्तुत अध्ययन-प्रकल्पाला सातशे पन्नास रुपयांचे अनुदान दिले, हे येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

इतिहासाचार्य वि० का० राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, जयकर ग्रंथालय-पुणे विद्यापीठ, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे आणि सरस्वती महाल लायब्ररी, तंजावर ह्या संस्थांच्या अधिकाऱ्यांनी संस्कृत व मराठी हस्तलिखितांच्या नकला तत्परतेने व आस्थेने पाठवून दिल्या, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सयाजीराव गायकवाड ग्रंथालय, गोएंका पुस्तकालय व भारती महाविद्यालयाचे ग्रंथालय तसेच पुराणविभाग यांच्या व्यवस्थापकांनी अनेक प्राचीन ग्रंथ अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. रामनगर (वाराणसी) येथील अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ इण्डियन स्टडीज् ह्या संस्थेचे असोशिएट् डायरेक्टर श्री० व्ही.आर्. नंबियार यांनी जातीने लक्ष घालून मुखपृष्ठावर छापलेले छायाचित्र अल्पावधीत देऊन ते छापण्यास परवानगी दिली, ह्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. स्पेशल प्रिंटर्स चे कारभारी व कर्मचारी ह्यांनी अल्प वेळात मुद्रणकार्य पूर्ण केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

सहृदय वाचक ह्या पुस्तकाचे यथोचित स्वागत करतील अशी आशा आहे.

वाराणसी, ११ मार्च, १९८१ डॉ. वा. के. लेले.

अनुक्रमिका

१. हस्तलिखितांचा परिचय पृ. १ ते १०

संस्कृत हस्तलिखिते : १–४, मराठी हस्तलिखिते : ५–१०

२. 'गजेन्द्रमोक्ष' आख्यानाचे मूळ आधार पृ. ११ ते २४

२.१ भारती आख्यान : ११–१३, २.२ भागवती आख्यान : १३-१५ २.३ पद्मपुराणातील आख्यान : १६–१७, २.४ इतर पुराणांतील आख्यान: १७, २.५ मूळ आधारांचे विश्लेषण : १८, २.६ गजेन्द्रमोक्ष आणि इतिहासपुराण : १९, २.७ गजेन्द्रमोक्ष आख्यान की उपाख्यान: ? २०, २.८ गजेंद्रमोक्ष हे स्तोत्र ? : २०–२२, २.९ गजेंद्रमोक्ष आणि पंचरत्ने : २२–२४.

३. प्राचीन मराठी काव्ये पृ. २५ ते ६९

३.१ रघुनाथ : २६–२९, ३.२ अज्ञात कवी : २९–३१,
३.३ अज्ञात कवी : ३१-३२, ३.४ एकनाथ : ३२–३५.
३.५ एकनाथ : ३५–४०, ३.६ गिरिदास : ४१–४३,
३.७ गोविंद : ४३–४५, ३.८ पंडित सुरेंद्र : ४५–५४,
३.९ माधव : ५४–५९, ३.१० कविनाम ? : ५९–६४,
३.११ विष्णुदास : ६४–६८, ३.१२ शेष : ६८–६९,

४. समालोचन पृ. ७० ते ७७

४.१ बहिरंग वैशिष्ट्ये : ७०, ४.२ अंतरंग वैशिष्ट्ये : ७१-७७.

निवडक शब्दांचे अर्थ पृ० ७८

संदर्भ–ग्रंथांची यादी पृ० ७९-८०

संक्षेपांचा खुलासा

NCC 5—New Catalogus Catalogorum. Vol. Five
MBH 15—The Mahabharata, Vol. 15.
MBH 16—The Mahabharata, Vol. 16.
PE —Puranic Encyclopaedia.
PSD —Prin. Apte's The Practical Sanskrit-English Dictionary, Vol. I.

आरा —आनंदरामायण
इपुसा —इतिहासपुराणसाहित्य का इतिहास
इसंह —भारत-इतिहास-संशोधक-मण्डलस्थ-हस्तलिखित ग्रन्थानुक्रमणिका.
चासं —चापेकर-संस्मृति [प्रबंधोपहार]
तंको —मराठी भाषेचा तंजावरी कोश
तुगा —तुकाराम गाथा
पंच —श्रीपंचरत्नगीता सचित्र
पद्म —पद्मपुराणम् [उत्तरखण्ड-चतुर्थ भाग]
पेश —पेशवेकालीन महाराष्ट्र
भाग —सान्वय सार्थ श्रीमद्भागवत स्कंध ७-८ संपूर्ण, भाग ५
भाप्र —भाषाप्रकाश
मनु —मनुस्मृतिः
मसा —महाराष्ट्र-सारस्वत पुरवणीसह
यादी १—सरस्वती महालातील मराठी ग्रंथांची बयाजवार यादी, भाग १
यादी २— ,, ,, ,, ,, ,, ,, २
यादी ३— ,, ,, ,, ,, ,, ,, ३
याम —यादवकालीन महाराष्ट्र
राको —श्रीरामकोश खण्ड पहिला : भाग दुसरा
रासं १—श्री रामदासी संशोधन प्रथम खण्ड
रासं २—श्रीरामदासी संशोधन द्वितीय खण्ड
विष्णु —विष्णुधर्मोत्तरपुराण
शिव —शिवाजी व शिवकाल
स्कंद —स्कांद महपुराण.

१. हस्तलिखितांचा परिचय

'गजेन्द्रमोक्ष' आख्यानाच्या प्रस्तुत अध्ययनासाठी जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, इतिहासाचार्य वि० का० राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, श्रीसमर्थ वाग्देवता मन्दिर, धुळे, आणि सरस्वती महाल लायब्ररी, तंजावर ह्या संस्थांकडून संस्कृत व मराठी भाषांतील संपूर्ण तसेच अपूर्ण हस्तलिखितांच्या नकला प्राप्त झाल्या. त्यांचा प्रथमतः परिचय करून देण्यात येत आहे. खालील नोंदी हस्तलिखिताचा । बाडाचा क्रमांक, (रचना)काळ, हस्तलिखिताची पूर्णापूर्णता, पद्यसंख्या, काव्याचे वृत्त, कविनाम व इतर वैशिष्ट्ये ह्या क्रमाने केलेल्या आहेत.

संस्कृत हस्तलिखिते

ज = जयकर ग्रन्थालय, पुणे विद्यापीठ, पुणे.

ज १ = ह. १५६६. मार्गशीर्ष शु॥८, शके १७८१. पूर्ण. पद्यसंख्या एकशे-त्रेपन्न. विविधवृत्तात्मक. प्रारंभ ॥ अथ गजेंद्रमोक्षप्रारंभः॥ श्रीगणेशाय नमः ॥ आद्य पद्य—शतानीक उवाच ॥ मया हि देवदेवस्य विष्णो-रमिततेजसः । श्रुता संभूतयः सर्वा गदतस्तव सुव्रत ॥ १ ॥ अन्तिम पद्य—गीतासहस्रनामैव स्तवराजो ह्यनुस्मृतिः ॥ गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते ॥ १५३ ॥ पुष्पिका–इति श्रीमन्महाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैय्याशिक्यां शांतिपर्वणि भीष्मयुधिष्ठिरसंवादे गजेंद्रमोक्षः समाप्तः ॥ हस्तलिखित लेखकप्रमादामुळे भाषादृष्ट्या क्वचित्स्थली अशुद्ध.

भ = भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

भ ४ = पोथी क्र. ७।४६२. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये एकोणतीस ते बहात्तर. विविधवृत्तात्मक. महाभारतानुसारी. भाषा शुद्ध.

भ ५ = पो. क्र. ७।७३५. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये एक ते अठ्ठावीस (अठ्ठाविसाव्याचा अन्तिम चरण अनुपलब्ध)आणि एकूणनव्वद ते एकशे सव्वीस आणि एकशे सत्ताविसाव्याचा आद्य चरण. विविधवृत्तात्मक.

प्रारंभ—॥ गजेंद्रमोक्षप्रारंभः ॥ श्रीगणेशाय नमः ॥ आद्य पद्य— शतानीक उवाच ॥ मया हि देवदेवस्य विदर्भातुल्यतेजः ॥ श्रुताः संभूतयः सर्वा गदतस्तव सुव्रत ॥ १ ॥. महाभारतानुसारी. लेखकप्रमादामुळे भाषा अशुद्ध.

भ ६ = पो. क्र. २२।३०११. गुरुवार, ज्येष्ठ कृष्ण ॥ संवत १८२२, शके १६८७ (?). अपूर्ण. पद्ये एक ते शहात्तर व एक्याऐंशी ते एकशे सदतीस. विविधवृत्तात्मक. प्रारंभ—अथ गजेंद्रमोक्षप्रारंभः ॥ श्रीगणेशाय नमः ॥ आद्य पद्य—शतानिक उवाच ॥ मया हि देवदेवस्य विष्णोरमिततेजसः ॥ श्रुत्वा संनतयः दतस्तव सुबतः ॥ १ ॥ अन्तिम पद्य—गीतासहस्रनामैव स्तवशजोह्यनुस्मृति । गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते ॥ १३७ ॥ पुष्पिका—इति श्रीमहाभारते साहस्र्यां संहितायां वैयाशिक्यां शांतिपर्वणि गजेंद्रमोक्षणो नाम स्तोत्रं समाप्तं ॥ ह० अनेक जागी खंडित. भाषादृष्ट्या अशुद्ध.

भ ७ = पो.क्र. २९।१०५६ क. बुधवार, श्रावण शु॥ ७, विक्रम (की सौम्य?) नाम संवत्सरे शके १७४१. अपूर्ण. पद्ये नव्याण्णव ते एकशेऐंशी. विविधवृत्तात्मक. अन्तिम पद्य—नमोस्तु पद्मनाभाय सांख्ययोगोद्भवाय च । विश्वेश्वराय देवाय शिवाय हरये नमः ॥ १८० ॥ पुष्पिका—इति श्रीमहाभारते शतसहस्रसंहितायां वैय्याशिक्यां शांतिपर्वणि मोक्षधर्मे भीष्मयुधिष्ठिरसंवादे गजेंद्रमोक्षणं समाप्तं ॥ पोथीचे मालक व नकलनवीस बाजीभट्ट सदाशिव गोडबोले. भाषादृष्ट्या क्वचित्स्थली सदोष.

भ ८ = पो. क्र. २९।११७८. शनिवार, वैशाख कृष्ण ॥ ११, शुक्ल (की विकारी ?) संवत्सरे, शके १७९१. अपूर्ण. पद्ये एक ते तेरा व एकावन्न ते एकशे चौऱ्यांशी. विविधवृत्तात्मक. प्रारंभ- ॥ अथ गजेन्द्रमोक्षप्रारंभः ॥ श्रीगणेशाय नमः । आद्य पद्य—शतानीक उवाच ॥ मया हि देवदेवस्य विष्णोरतुलतेजसः । श्रुताः संभूतयः सर्वा गदतस्तव सुव्रत ॥१॥ अन्तिम पद्य—आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥ १८४ ॥ पुष्पिका—इति श्रीमन्महाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैय्यासिक्यां शांतिपर्वणि मोक्षधर्मे भीष्मयुधिष्ठिरसंवादे गजेंद्रमोक्षणं नाम स्तोत्रं संपूर्णम् ॥ भाषादृष्ट्या अशुद्ध.

भ ९ = पो. क्र. २९।११९६. पोथी संपूर्ण असली तरी एक ते सोळा पद्येच प्राप्त होऊ शकली. प्रारंभ–श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगजाननाय नमः ॥ आद्य पद्य–शतानीक उवाच ॥ मया हि देवदेवेश विष्णोरमिततेजसः । श्रुताः संभूतयः सर्वाः गदस्तस्य तस्तव सूव्रत ॥ १ ॥. लेखकप्रमादामुळे भाषादृष्ट्या अशुद्ध.

भ १० = पो. क्र. ४१।४५३. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये एक ते चाळीस. विविधवृत्तात्मक. प्रारंभ ॥ श्रीगणेशाय नमः ॥ आद्य पद्य–शतानीक उवाच । मया हि देवदेवस्य विष्णोरतुलतेजसः । श्रुताः संभूतयः सर्वागतयस्ताश्चसुव्रत ॥ १ ॥. भाषादृष्ट्या अशुद्ध.

भ ११ = पो. क्र. ५०।२२१. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्ये एक ते छत्तीस. विविधवृत्तात्मक. प्रारंभ- ॥ अथ गजेंद्रमोक्षप्रारंभः ॥ श्रीगणेशाय नमः ॥ आद्य पद्य—ॐ नमो मूलप्रल्लतये अजिताय महात्मने । अनाश्रयाय देवाय निःस्पृहाय नमोनमः ॥ १ ॥ अन्तिम पद्य–तावद्‌भवति मे दुःखं चितासंसारसागरे । यावत्कमलपत्राक्षं न स्मरामि जनार्दनं॥३६॥ पुष्पिका–इति समाप्तिमगमत् । यात गजेंद्रकृत विष्णुस्तोत्र आहे. पोथीलेखक माणको गिरमाजि. भाषादृष्ट्या अशुद्ध.

भ १२ = पो. क्र. ५३।१५८. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये नऊ व गद्यवाक्ये अकरा. विविधवृत्तात्मक पद्ये, गद्य बाणाच्या शैलीचे. प्रारंभ–अथ गजेंद्रचंपू प्रारंभार्यै विराजते ॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीहनूमते नमः ॥ आद्य पद्य–पूर्णकामं गुणग्रामं विश्रामं कामविद्विषः । कामाभिरामं श्रीरामं मेघश्यामं नमाम्यहम् ॥ १ ॥. गजेंद्रचंपूच्या प्रथम उल्लासातील काही भाग.

स = श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर धुळे

स २४ = बाड क्र. ३८७. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या एक ते चार, एक ते तेहतीस, एक ते तेहतीस व एक ते सव्वीस मिळून शहाण्णव. विविधवृत्तात्मक. प्रारंभ–गजेंद्रमोक्ष. आद्य पद्य -॥ ॐ ॥ तत्रापि जज्ञे भगवान् हरिण्यां हरिमेधसः । हरिरित्याहुतो येन गजेंद्रो मोचितो ग्रहात् ॥१॥ अन्तिम पद्य–इत्यादिश्य हृषीकेशः प्राध्माय जलजोत्तमं । हर्षयन्विबुधानीकमारुरोह खगाधिपं ॥ २६ ॥ पुष्पिका–इति श्रीमद्‌भागवते महापुराणे पारमहंस्यां संहितायामष्टमस्कंदे मन्वंतरानुवर्णने गजेंद्रमोक्ष-

प्राप्तिर्नाम चतुर्थोध्यायः ॥. भागवताच्या आठव्या स्कंधातील पहिल्या चार अध्यायांतील गजेंद्रमोक्षकथा. भाषा अशुद्ध.

स २५ = बा. क्र. ६२८. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या एकशेबासष्ट. विविधवृत्तात्मक. प्रारंभ—गजेंद्रमोक्षणं. आद्य पद्य—शतानीक उवाच ॥ मयाहि देवदेवस्य विष्णोरमिततेजसः । श्रुताः संभूतयः सर्वा गदतस्तव सुव्रत ॥१॥ अन्तिम पद्य —गीतासहस्रनामैव स्तवराजो ह्यनुस्मृतिः । गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते ॥ ६२ ॥ पुष्पिका—इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां शांतिपर्वणि गजेंद्रमोक्षणं संपूर्णं ॥. भाषादृष्ट्या शुद्ध.

स २६ = बा. क्र. १२००. रविवार, पौष कृष्ण ११, सुभानु संवत्सरे शके १६८५. अपूर्ण. पद्ये एक ते अठ्ठ्याऐंशी व एकशेबावीस ते एकशेपंचावन्न. विविधवृत्तात्मक. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष. आद्य पद्य—नमो भगवते तस्मै व्यासायामततेजसे । यस्य प्रसादाद्वक्षामि नारायणकथामिमां ॥ १ ॥ अन्तिम पद्य—य इदं पठते स्तोत्रं मम जन्मानुकीर्तनं । देवलोकमतिक्रम्य मत्यलोकमवाप्नुयात ॥ १५५ ॥ पुष्पिका—इति श्रीमहाभारते शतसहश्र संहितायां शांतिपर्वणि मोक्षधर्मे भीष्मयुधिष्ठिरसंवादे गजेंद्रमोक्षणं समाप्तं ॥ भाषादृष्ट्या अशुद्ध.

वरील हस्तलिखितांपैकी भ १२ हे गजेंद्रचंपूचे अपूर्ण हस्तलिखित आहे, ते विचारात घेण्याचे कारण नाही. सदरहू चंपू सन १८८८ मध्ये काव्येतिहाससंग्रहात (क्र. १२) मुद्रित झाला आहे. ह० स २४-मधील भागवती कथा प्रसिद्धच आहे. ह० भ ४, भ ५, भ ९ व भ १० अपूर्ण आहेत. सबब त्यांचा विचार करण्याचे प्रयोजन नाही. परंतु ज १, भ ६, भ ७, भ ८ व स २६ ही सगळी हस्तलिखिते शालिवाहनाच्या सतराव्या-अठराव्या शतकांतील आहेत. त्यांवरून असे अनुमान काढता येते की, सुमारे तीनशे वर्षांपूर्वी हे आख्यान शान्तिपर्वान्तर्गत असल्याचे मानले जात होते. हे आख्यान सध्या उपलब्ध असलेल्या शान्तिपर्वात आढळत नाही, असे डॉ० राघवन म्हणतात [NCC. 5 p. 233], तसेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधनमंदिराने प्रसिद्ध केलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या शांतिपर्वाच्या मूळ संहितेत [MBH. 15 व MBH. 16] किंवा परिशिष्टातही [MBH. 16, Appendix I, pp. 2022-2105] हे आख्यान आढळत नाही. व्यासांनी सुमंतू, जैमिनी, पैल, शुक व वैशंपायन ह्या पाच शिष्यांकडून महाभारताच्या ज्या पृथक-पृथक संहिता तयार करवून घेतल्या [इपुसा. पृ ७९]

त्यांपैकी एखादी संहिता तीनशे वर्षांपूर्वीच्या विद्वानांना उपलब्ध झाली असावी व तिच्या शान्तिपर्वात हे आख्यान असावे. भ ११-चा लेखक गजेंद्रकृत विष्णुस्तुती स्वयंपूर्ण मानतो ही बाब ध्यानात घेण्याजोगी आहे.

मराठी हस्तलिखिते.

इ = इतिहासाचार्य वि०का० राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

इ १ = ह. क्र. ५१६।प१४. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी वृत्त. वामन. प्रारंभ—श्रीगणेशाय नमः ॥ अथ गजेंन्द्रमोक्ष प्रारंभ. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

इ २ = ह. क्र. ५१६।प १८२. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये सतरा ते चौतीस. विविधवृत्तात्मक. कविनाम अप्राप्त. दोन-तीन स्थळी ह० खंडित. लेखकप्रमादामुळे भाषा अशुद्ध.

त = तंजावर महाराजांची सरफोजी सरस्वती महाल लायब्ररी, तंजावर

त १ = ठोकळ क्र. ९५४. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पदे व श्लोक मिळून सुमारे ८०. विविधवृत्तात्मक. नारायण [यादी १. पृ० ३०६]. भाषादृष्ट्या अशुद्ध.

त २ = ठो. क्र. १८१२. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या त्रेपन्न. ओवी. एकाजनार्दन [यादी २. पृ० ७५१]. प्रारंभ ॥श्रीरामचंद्राय नमः । पुष्पिका—इति श्रीगजेंद्रमोक्ष संपूर्ण ॥ अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. ह० चांगले.

त ३ = ठो. क्र. १८१३. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या चोवीस. प्रमाणिका. देवदास [यादी २. पृ० ७५१]. प्रारंभ—श्रीगणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्री गजेंद्रमोक्ष आरंभः ॥ अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

त ४ = ठो. क्र. १८१४. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [यादी २. पृ० ७५१-५२]. प्रारंभ ॥ गजेंद्रमोक्षाचे श्लोक ॥ अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

त ५ = ठो. क्र. २०६१a. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या अकरा. ओवी. कविनाम अप्राप्त. [यादी ३. पृ० ७५] प्रारंभ ॥ गजेंद्रमोक्ष ॥ श्रीगणेश प्रसन्न ॥ ह० दोन जागी खंडित.

त ६ = ठो. क्र. २०६१b. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या बावीस, पण पहिल्या दोनच पद्यांना पद्यांक, पुढील पद्यांना पद्यांक नाहीत. विविध-वृत्तात्मक. कविनाम गोविंद[यादी ३, पृ० ७८]. प्रारंभ-।। श्रीगणेशाय नमः।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. पाचसहा जागी ह० अनाकलनीय.

त ७ = ठो. क्र. २०६७. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या एकूणचाळीस. उपजाती. कविनाम मुकुंद [यादी ३. पृ० ९१]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष. श्रीगणाधिपतये नमः ।। शुभमस्तु ।। निर्विघ्नमस्तु ।। पुष्पिका—इति गजेंद्रमोक्ष. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

त ८ = ठो. क्र. २१२७. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या चाळीस. ओवी. गिरिदास [यादी ३. पृ० १९७]. प्रारंभ—श्रीगजेंद्रमोक्ष. पुष्पिका—इति श्रीगजेंद्रमोक्ष संपूर्णमस्तु. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

त ९ = ठो. क्र. २१४९. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या ब्याहत्तर. ओवी. विष्णुदास [यादी ३. पृ० २३७]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. ह० अनेक जागी खंडित.

त १० = ठो. क्र. २२०६. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [यादी ३. पृ० २५५]. प्रारंभ—।। श्रीगजेंद्रमोक्ष श्लोक ।। पुष्पिका ।। इति गजेंद्रमोक्ष श्लोक ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. ह० खंडित.

त ११ = ठो. क्र. २२१३. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [यादी ३. पृ० २५९]. प्रारंभ—श्रीगणेशाये नमः ।। पुष्पिका— ।। वामनकृत गजेंद्रमोक्ष संपुर्ण ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. ह० चांगले.

त १२ = ठो. क्र. २२२६. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [यादी ३. पृ० २७०] प्रारंभ—श्रीमते द्विरदवरदाय भक्तचातक-नीरदाय नमः ।। गजेंद्रमोक्ष ।। श्लोक ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

त १३ = ठो. क्र. २२३५. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [यादी ३. पृ० २७९]. प्रारंभ—वामनकृत गजेंद्रमोक्ष प्रां ।। पुष्पिका—इति श्री गजेंद्रमोक्ष संपूर्णमस्तू।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

भ = भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

भ १ = पो. २९।३७४. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी.

वामन [इसंह. पृ ७४] प्रारंभ—श्रीगणेशाय नमः । पुष्पिका—इति वामनकृत गजेंद्रमोक्षसंपूर्ण ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

भ २ = पो. ३४।४७९. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन. प्रारंभ—अथ गजेंद्रमोक्ष प्राकृत प्रारंभ. पुष्पिका—इति गजेंद्र-मोक्ष समाप्त. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

भ ३ = पो. ४६।३५६. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन. प्रारंभ—।। अथ गजेंद्रमोक्षवामनकृत प्रारंभः ।। श्रीगणेशाय नमः ।। अथ गजेंद्रमोक्ष वामनकृत प्रा ।। पुष्पिका—इति गजेंद्रमोक्ष संपूर्णमस्तु ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स = श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

स १ = बाड क्र. ५०. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं १. पृ० ९५]. प्रारंभ—श्रीगणेशाय नमः । अथ गजेंद्रमोक्ष प्रारंभ ।। पुष्पिका—इति वामनिग्रंथ गजेंद्रमोक्ष संपूर्णम् ।। अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स २ = बा. क्र. २५०. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पदे व ओव्या इत्यादी अनेक. समर्थ इ. [रासं १. पृ० २४८]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष ।। श्रीरामदास-स्वामी गजेंद्रमोक्ष ।। अन्तिम पद्यात तुकारामाचा निर्देश. एकूण काव्यात चार स्थळी तुकारामाचा उल्लेख.

स ३ = बा. क्र. २८५. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन. [रासं १. पृ० २६३]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष वामन. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा. ह० अन्तिम पद्यात खंडित.

स ४ = बा. क्र. ३१६. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्यसंख्या ३४ + ३३ + २६ = ९३. सुरवातीची चार पद्ये नाहीत. समश्लोकी. रघुनाथ [रासं १ पृ० २७७]. भागवत स्कंध ८, अध्याय २ ते ४ चा मराठी अनुवाद. पुष्पिका—श्रीमद्भागवते महापुराणे मन्वंतरानुवर्णने अष्टमस्कंदे शुकपरीक्षीतसंवादे पारमहंस्यां संहितायां रघुनाथकृत समश्लोकीटीकायां गजेंद्रमोक्षणनाम चतुर्थोध्यायः समाप्तः ।।

स ५ = बा. क्र. ३५८. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं १. पृ० ३०१]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष. पुष्पिका—गजेंद्र-मोक्ष समाप्त. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स ६ = बा. क्र. ३६४. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन. [रासं १. पृ० ३०७]. प्रारंभ-श्रीगजेंद्रमोक्षप्रारंभः ॥ पुष्पिका-इति गजेंद्रमोक्षसंपूर्णमस्तु ॥ अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स ७ = बा. क्र. ७६१. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं २. पृ० १२२]. प्रारंभ–गजेंद्रमोक्ष. पुष्पिका–इति गजेंद्रमोक्ष. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स ८ = बा. क्र. ९७९. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या एकूणऐंशी. विविध-वृत्तात्मक. रामदास [रासं २. पृ० २०४]. प्रारंभ–दासकृत गजेंद्रमोक्ष. श्रीरामसमर्थ ॥ पहिल्या तीन पद्यांत अनुक्रमे गणपती, सरस्वती व सद्‌गुरू यांना वंदन. पुष्पिका–इति श्रीगजेंद्रमोक्ष संपूर्ण ॥ अन्तिम पद्यात कविनाममुद्रिका. ह० क्वचित्स्थळी खंडित.

स ९ = बा. क्र. ११२७. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये ७४ ते ७९. भुजंग-प्रयात. रामदास. पुष्पिका–श्री इति गजेंद्रमोक्षकथा संपूर्ण. अन्तिम पद्यात कविनाममुद्रा.

स १० = बा. क्र. ११६५. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये एक ते सहा. शिखरिणी. समर्थ ? [रासं २. पृ० २६०]. प्रारंभ–गजेंद्रमोक्ष. वामनाच्या प्रसिद्ध काव्याचे हे त्रुटित ह० आहे.

स ११ = बा. क्र. १२०४. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्ये एक ते तीस. अनुष्टुभ. एकनाथ [रासं २. पृ० २८८]. प्रारंभ–गजेंद्रमोक्ष. हा गजेंद्रकृत विष्णूचा धावा आहे. ह० अनेक जागी खंडित. ह्यात पुढे उल्लेखिलेल्या स १८ मधील मधल्या-मधल्या ओव्या एकत्रित केल्या आहेत.

स १२ = बा. क्र. १२०५. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या बासष्ट. हस्त-लिखितात पद्यांक १७ नंतरच्या ओव्यांना १ ते ४ असे क्रमांक देऊन त्यानंतरच्या पद्याला ३६ हा क्रमांक दिला आहे. नंतर ३७ हा क्रमांक वगळला आहे व पुढच्या पद्याला एकदम ३८ क्रमांक दिला आहे. पुढे ७१ नंतरच्या तीन पद्यानां क्रमांक नाहीत. एकदम अंतिम पद्याला ७२ हा क्रमांक दिला आहे. विविधवृत्तात्मक. पंडित [रासं २. पृ० २८९]. प्रारंभ–श्रीराम ॥ गजेंद्रमोक्ष ॥ पुष्पिका–इति श्रीगजेंद्र-मोक्ष. अन्तिम पद्यात पंडित ही नाममुद्रा. तत्पूर्वी वाविमाव्या पद्यात पंडित सुरेंद्र असा स्वनामनिर्देश.

म १३ = बा. क्र. १३३७. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पदे व श्लोक मिळून ८४. विविधवृत्तात्मक. विश्वनाथतनय नारायण [रासं २. पृ० ३५२]. प्रारंभ श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । × × गजेंद्रमोक्षगद्य-पद्यात्मकश्लोकाः ॥ श्याहत्तराव्या पद्यात कविनामनिर्देश—ह० खंडित.

म १४ = बा. क्र. १४५०. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं २. पृ० ३७६]. प्रारंभ—गजेंद्र मोक्ष. अंतिम पद्यात कविनाममुद्रा

म १५ = बा. क्र. १४५०. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पदे व श्लोक मिळून सुमारे चाळीस. विविधवृत्तात्मक. माधव [रासं २. पृ० ३७५].

म १६ = बा. क्र. १४७२. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं २. पृ० ३८०]. अंतिम पद्यात कविनाममुद्रा. ह० अनेक स्थळी खंडित.

म १७ = बा. क्र. १४९८. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या तीन. पदे. शेष [रासं २. पृ० ३८९]. प्रारंभ—गजेंद्र मोक्ष (शेष). अंतिम पद्यात कविनाममुद्रा.

म १८ = बा.क्र. १५१३. काळ अनिर्दिष्ट. अपूर्ण. पद्यसंख्या दोनशे एकेचाळीस. ओवी. एकनाथ ? [रासं २. पृ० ४०२]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष ॥ गजेंद्र-कृत विष्णुस्तुतीखेरीज ईश्वराच्या इतर अवतारांतील पराक्रमांचे ही वर्णन. ह० अनेक जागी खंडित. ह्यात पद्यांक ९० मध्ये जनीजनार्दन अशी कविनाममुद्रा आहे.

म १९ = बा. क्र. १५१५. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं २. पृ० ४०२]. अंतिम पद्यात कविनाममुद्रा.

म २० = बा. क्र. १५१७. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या चाळीस. ओवी. एकनाथ [रासं २. पृ० ४०३]. प्रारंभ—गजेंद्र मोक्ष. पुष्पिका—इति श्रीगजेंद्र आख्यान संपूर्णमस्तु ॥ उपान्त्य पद्यात कविनामोल्लेख.

म २१ = बा. क्र. १५५२. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या चाळीस. ओवी. एकनाथ [रासं२. पृ० ४१४]. प्रारंभ—गजेंद्रमोक्ष. पुष्पिका—इति श्रीगजेंद्र आख्यान संपूर्ण. उपान्त्य पद्यात कविनामनिर्देश.

म २२ = बा. क्र. १५५८. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या चाळीस. ओवी. एकनाथ [रासं २. पृ० ४१७]. प्रारंभ—एकनाथविरचित गजेंद्र मोक्ष.

पुष्पिका—इति एकनाथविरचित गजेंद्रमोक्ष संपूर्ण. उपान्त्यपूर्व पद्यात एकाजनार्दन ही कविनाममुद्रा.

स २३ = बा. क्र. १६२९. काळ अनिर्दिष्ट. पूर्ण. पद्यसंख्या दहा. शिखरिणी. वामन [रासं २. पृ० ४३९]. अंतिम पद्यात कविनाममुद्रा.

वरील नोंदींचे विश्लेषण केले असता असे निष्पन्न होते की, इ २ व त ५ ह्या काव्यांचे कर्ते अज्ञात आहेत. स २ ह्या काव्याचे कर्तृत्व अनिश्चित आहे. स १० हे वामनाच्या दश (की द्वादश ?) पद्यात्मक प्रसिद्ध कवितेचेच त्रुटित हस्तलिखित आहे. त्याच्या कर्तृत्वासंबंधीची रासं २ पृ० २६० वरील नोंद दुरुस्त करावयास हवी. अशीच पुस्ती-दुरुस्ती यादी २ पृ० ७५१ वरील त २–विषयक नोंदीत करावयास हवी- त २. मध्ये एकाजनार्दन ही एकनाथांची नाममुद्रिका आहे. अर्थात ते काव्य नाथांच्या नावावर दाखल व्हावयास हवे. स ११ व स १८ ह्यांचे कर्तृत्व जनीजनार्दनांकडे जाते. त्यामुळे ह्यासंबंधातही योग्य त्या सुधारणा रासं २ मध्ये संबंधित पृष्ठांवर करावयास हव्यात. एकनाथ, गिरिदास, गोविंद, देवदास, पंडित सुरेंद्र, माधव, मुकुंद, विष्णुदास व शेष या कवींच्या काव्यांचे प्रत्येकी एक हस्त-लिखित आहे. स ४ म्हणजे मूळ संस्कृत भागवती कथेचे मराठी रूपान्तर आहे. त १ व त १३ ही दोन्ही हस्तलिखिते विश्वनाथतनय नारायणाच्या एकाच काव्याची आहेत. तद्वत स ८ व स ९ ह्यांत रामदासांचे एकच काव्य आहे. स ११ हे विष्णुस्तोत्र असून ते स १८ चाच एक भाग आहे. स २०, स २१ व स २२ ही नाथांच्या एकाच काव्याची तीन हस्तलिखिते आहेत. तर वामनाच्या प्रसिद्ध कवितेची एकोणीस हस्तलिखिते आहेत. वरीलपैकी कोणत्याही मराठी हस्तलिखिताच्या शेवटी कालोल्लेख मिळत नाही.

—:०:—

२. 'गजेन्द्रमोक्ष' आख्यानाचे मूळ आधार

मागील प्रकरणात ज १, भ ६, भ ७, भ ८, स २५ व स २६ ह्या हस्तलिखितांच्या संदर्भात केलेल्या नोंदींवरून हे स्पष्ट होते की, प्रस्तुत आख्यान महाभारतात वर्णिलेले आहे. तसेच, हस्तलिखित स २४–प्रमाणे ते भागवतातही आढळते. ह्या दोन आर्ष ग्रंथांखेरीज आणखी कोणकोणत्या प्राचीन ग्रंथांत व कोणत्या स्वरूपांत ह्या आख्यानाचे वर्णन प्राप्त होते ह्याचा शोध घेतल्यावर असे निदर्शनास येते की, प्रस्तुत आख्यान आनंदरामायण, वामनपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण व विष्णुधर्मोत्तरपुराण ह्याही ग्रंथांत आहे. ह्या सर्व ग्रंथांच्या रचनाकाळांचा विचार प्राच्यविद्याविशारदांनी केला आहे. तोच येथे प्रमाण मानला आहे. तदनुसार भारताची संहिता इ. स. पूर्व सहाव्या शतकात सिद्ध झाली [PE. p. 123], भागवत इसवी सनाच्या पहिल्या शतकात रचले गेले [इपुस्म. पृ० १२७], इतर पुराणांना सध्याचे स्वरूप इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकात प्राप्त झाले [PE. pp.617-618] आणि आनंदरामायण इसवी सनाच्या सोळाव्या शतकात साकार झाले [राको. परिशिष्ट ओ, पृ० २९]. अर्थात महाभारत हा प्रस्तुत आख्यानाचा प्राचीनतम आधार ठरतो. तदनुसार ह्या आख्यानाचे कथानक असे.

२.१ भारती आख्यान

एकदा युधिष्ठिराने भीष्माला विचारले, 'पितामह, मनुष्याला जी स्वप्ने पडतात त्यांत त्याला शुभाशुभ गोष्टी दिसतात. त्या स्वप्नांची शुभाशुभ फळेही मिळतात. तर ज्यायोगे अशुभ स्वप्नफलांचा नाश होतो, असा पूर्वेतिहासातील एखादा कथाप्रसंग असल्यास तो मला ऐकवा.' ह्यावर भीष्माने युधिष्ठिराला दुःस्वप्ननाशक व शान्तिप्रद असे गजेंद्रमोक्षणाचे प्राचीन कथानक सांगण्यास सुरुवात केली–त्रिकूट नामक रत्नमय पर्वत होता. त्याचे चरणतल क्षीरसागर धूत असे. त्या पर्वतावर देवर्षी, अप्सरा, गंधर्व इत्यादींची वस्ती होती. तसेच त्यावर सिंह, हत्ती, कोल्हे इत्यादी श्वापदेही राहत असत. त्या पर्वतावर आंबा, लिंबू, चंदन, चाफा इत्यादी झाडांची गर्दी होती. पर्वताची तीन उत्तुंग शिखरे असून त्यांपैकी तिसऱ्या शिखरावर ब्रह्मदेवाचे निवासस्थान होते. कृतघ्न, हिंसक व पापी लोक त्याचे दर्शन घेत नसत. त्या रमणीय व झगमगणाऱ्या शिखराच्या आसमंतात राजहंसादी पक्षी वावरत असत.त्या पर्वतावर कित्येक मैल लांबरुंद असे एक सरो-

वर होते. त्यात एक दुष्टबुद्धीचा मगर राहत असे. त्याचे हत्तींशी वैर होते. एकदा एक तहानेलेला मत्त हत्ती आपल्या कळपाबरोबर त्या सरोवरावर आला. तो जणू पादचारी पर्वतासारखाच दिसत होता. तो तहानेने व्याकुळ झालेला असल्यामुळे एकदम सरोवरात शिरला व पाणी पिऊ लागला. तेव्हा लपून बसलेल्या मगराने त्याच्या पायाला विळखा घातला. अचानक ओढवलेल्या ह्या संकटाने तो गजेंद्र गांगरून गेला. त्याची ती दारुण स्थिती पाहून त्याच्या कळपातील हत्तिणी मोठमोठ्याने ओरडू लागल्या. इकडे सरोवरात गजेंद्र व मगर यांचे तुंबळ युद्ध जुंपले. गजेंद्र मगराला पाण्याबाहेर ओढतो आहे तर मगर गजेंद्राला पाण्यात खेचतो आहे, असे सतत चालू होते. त्यांचे ते घोर युद्ध एक हजार वर्षे चालले होते. शेवटी गजेंद्र थकला, अतिशय व्याकुळ झाला आणि अगदी निराश बनला. त्याचे बळ संपल्याचे लक्षात येताच मगराने त्याच्या पायांना करकचून आवळून धरले. तेव्हा त्या गजेंद्राने मन एकाग्र केले आणि श्रीहरीचे मनोमन स्मरण करून स्तोत्र गायिले. ते ऐकून चक्रधारी श्रीकृष्णाचे हृदय द्रवले आणि तो त्वरित गरुडावर बसून सरोवरापाशी येऊन ठेपला. त्याने प्रथमतः गजेंद्र व मगर यांना पाण्याबाहेर काढले, नंतर आपल्या सुदर्शनचक्राने मगराला ठार केले आणि त्याच्या तडाख्यातून गजेंद्राची सुटका केली. पूर्वीचा हूहू नावाचा गंधर्व देवल ऋषीच्या शापामुळे मगर झाला होता. त्याला श्रीकृष्णाच्या हातून मरण येऊन मुक्ती मिळाली. गंधर्व मगर कसा झाला त्याबद्दलची हकीकत अशी—हाहा व हूहू नावाचे दोन गंधर्व होते. ते गायन व वाद्यवादन यांत प्रवीण होते. एकदा उर्वशी, मेनका, रंभा इत्यादी अप्सरा इंद्रासमोर नृत्य करीत होत्या. तेव्हा वरील दोन गंधर्व गात-गात इन्द्रसभेत आले व गाण्याच्या बाबतीत एकमेकांशी स्पर्धा करू लागले. ते इंद्राला म्हणाले, 'आमचे गायन-वादन ऐकून आम्हां दोघांपैकी श्रेष्ठ कोण ते सांगा'. त्यावर इंद्राने म्हटले, 'तुम्हां दोघांच्या गायन-वादनांतील फरक मला समजत नाही, परंतु, देवल नावाचे एक श्रेष्ठ ऋषी आहेत, ते तुमची खरी पारख करतील.' ते ऐकून ते दोघे गंधर्व, एकमेकांवर विजय मिळविण्याच्या इच्छेने, देवल ऋषीच्या आश्रमात गेले. त्यांनी ऋषिवर्यांना सांगितले, 'आम्हांला इंद्राने धाडले आहे. आम्हां दोघांचे गायनवादन ऐकून आमच्यातला श्रेष्ठ कोण त्याचा निर्णय करा.' एवढे म्हणून त्या दोघांनी गायन-वादनास सुरुवात केली, परंतु मौनव्रत धारण केलेल्या देवलाने कोणताच अभिप्राय दिला नाही. तेव्हा ते दोघे अस्वस्थ झाले आणि रागाच्या भरात म्हणाले, 'ह्या मूर्खाला गीत-वाद्यांत खरोखरीच काही कळत नाही.' त्या उन्मत्त गंधर्वांचे हे उद्धटपणाचे

बोलणे ऐकून देवल ऋषी संतापला व त्याने त्या दोघांना 'हा दुष्ट हूहू मगर होईल आणि हाहा हत्ती होईल,' असा शाप दिला. तेव्हा त्या शापवाणीने भयभीत झालेले ते दोघे देवलाची मनधरणी करू लागले. त्यासरशी देवलाला दया आली व तो म्हणाला, 'सुमेरू पर्वतावर एक रम्य सरोवर आहे. हूहू, तू त्यात मगर होऊन राहशील. तहानेने व्याकुळ झालेला हा हाहा तेथे हत्तीच्या रूपाने येईल. तेव्हा तुम्हां दोघांमध्ये भीषण युद्ध होईल. मगराच्या विळख्याने जर्जर झालेला हत्ती शेवटी ईश्वराचे स्तोत्र म्हणेल. तेव्हा भगवान् नारायण संतुष्ट होऊन पृथ्वीवर येतील व तुमचे युद्ध थांबवून तुम्हां दोघांना मोक्ष देतील.' त्याप्रमाणे सारे घडून आले आणि श्रीकृष्णाने गजेंद्रमोक्ष केला. हत्ती व मगर यांना स्वतःची रूपे पुनः प्राप्त झाली आणि दोघांना खूप आनंद झाला. गजेन्द्र विष्णूची स्तुती करू लागला असता विष्णू त्याला म्हणाला, 'जो मनुष्य माझे, तुम्हां दोघांचे, सरोवराचे, मगराच्या वधाचे, पर्वतावरील झाडीचे, पर्वताचे, पिंपळाच्या वृक्षाचे, सूर्याचे (किंवा भास्कर तीर्थाचे), गंगेचे, नैमिषारण्याचे, प्रयागाचे, ब्रह्मतीर्थाचे, दण्डकारण्याचे, प्राचीन रामचरित्राचे, महाभारताच्या इतिहासाचे, विभूतीचे, विश्वरूपाचे, भीष्मस्तवराजाचे, अनुस्मृतीचे, ॐकाराचे, कुरुक्षेत्राचे, गरुडाचे, मेरुपर्वताचे व त्रिकूट पर्वताचे स्मरण करील त्याच्या दुःस्वप्नांचा नाश होऊन त्याला चांगल्या स्वप्नांची फळे प्राप्त होतील. जो मनुष्य अनिरुद्ध, गजेंद्र, मगर, वासुदेव कृष्ण, बलराम, मत्स्य, कूर्म, वराह, वामन, गरुड, नृसिंह, शेष, हृषीकेश, गोविन्द, मधुसूदन व वैकुंठ यांचे प्रातःस्मरण करील त्याची सर्व पापे नाहीशी होतील.' असे म्हणून श्रीकृष्णाने गजेंद्र व मगर यांना हस्तस्पर्श केला. त्याबरोबर उत्तम वस्त्रे नेसलेले व सुंदर हार घातलेले असे ते झाले तसेच त्या दोघांनाही दिव्य शरीरे लाभली व ते वैकुंठलोकी गेले. स्वतः भगवंतही अन्तर्धान पावले. गजेंद्रमोक्षाची ही अपूर्व घटना बघून ब्रह्मदेवादी देव व महर्षी भगवंतांची स्तुती करू लागले व 'जो मनुष्य गजेंद्रमोक्षाची ही कथा दररोज पहाटे ऐकेल त्याच्या दुःस्वप्नांचा नाश होऊन त्याला श्रेष्ठ सिद्धी प्राप्त होतील', असेम्हणू लागले. अशा प्रकारे भीष्माने युधिष्ठिराला ही कथा ऐकविल्यावर युधिष्ठिराने जवळच उभ्या असलेल्या श्रीकृष्णाची भक्तिभावाने पूजा केली [ह० स २५ च्या आधारे]ह्यानंतर रचनाकालदृष्ट्या भागवताचा क्रमांक लागतो. तेव्हा त्यातील कथेची ओळख करून घेऊ.

२.२ भागवती आख्यान

शुक परीक्षित राजाला म्हणाला, 'तामस नावाच्या चौथ्या मन्वन्तरात

हरिमेधा नावाच्या ऋषीच्या हरिणी नामक पत्नीच्या पोटी हरीच्या रूपात भगवंतांनी अवतार घेतला आणि त्याच अवतारात त्यांनी गजेंद्राची मगराच्या तडाख्यातून सुटका केली.' हे ऐकून परीक्षित राजाने, 'गजेंद्र मोक्षाची ती कथा कृपा करून ऐकवा', अशी शुकाला विनंती केली. तेव्हा शुकाने ती कथा पुढील शब्दांत सांगितली---क्षीरसागरात त्रिकूट नावाचा एक श्रेष्ठ व प्रचंड पर्वत होता. तो कित्येक मैल लांब, रुंद व उंच होता. त्याची शिखरे सोन्याची, रुप्याची, रत्नांची व विविध धातूंची असून त्यांच्या योगे समुद्र, आकाश व दशदिशा उजळून निघत असत. त्या पर्वतावर अनेकविध झाडे व वेली होत्या. तसेच त्यावरून कितीतरी झरे मंदमधुर आवाज करीत निरंतर वाहात असत. त्या पर्वतावरील गुहांमध्ये सिद्ध, किन्नर, विद्याधर, गंधर्व व अप्सरा विहार करीत असत. त्याच पर्वतावर भगवान वरुणाचे ऋतुमान नामक एक उपवन होते. त्यात सदा फळाफुलांनी बहरलेले वृक्ष असून त्यांमध्ये देवांगना नित्य क्रीडा करीत असत. त्या उपवनात एक विशाल सरोवर असून त्यात नाना जातींच्या कमळांचे ताटवे होते. ते सरोवर प्रसन्न जल, रंगीबेरंगी कमळे, चित्रविचित्र पक्षी, नानाविध वृक्ष, इत्यादींनी शोभून दिसत असे.

त्या पर्वतावरील दाट जंगलात अनेक हत्तिणींसह एक गजेंद्र राहात असे. एके दिवशी तो वेळू, वेत इत्यादींची झाडे तुडवीत आणि सिंहादी श्वापदांना घाबरवून सोडीत मस्तीने त्या पर्वतावर सपरिवार हिंडत होता. त्या वेळी कडक ऊन पडले होते. त्यामुळे तो व त्याच्या बरोबरच्या हत्तिणी अशी सगळी तहानेने व्याकुळ झाली होती. तेव्हा ती सारी उपवनातील सरोवरापाशी आली. गजेंद्र पाण्यात शिरला, प्रथमतः पोटभर पाणी प्याला, आणि नंतर एखाद्या गृहस्थाप्रमाणे बरोबरच्या पिल्लांना व हत्तिणींना प्रेमाने स्नान घालू लागला. तो ह्या जलक्रीडेत मग्न असतानाच त्या सरोवरातील एका बळकट मगराने त्याचा पाय घट्ट पकडला. अशा प्रकारे त्या गजेंद्रावर एकाएकी संकट ओढवले. तेव्हा तो आपले सारे बळ एकवटून मगराच्या विळख्यातून सुटण्याची धडपड करू लागला. त्याच्या बरोबरचे सगळे हत्ती ते दृश्य पाहून भीतीने किंचाळू लागले. इकडे पाण्यात गजेंद्र व मगर यांचे घोर युद्ध सुरू झाले. गजेंद्र मगराला पाण्याबाहेर ओढण्याचा प्रयत्न करू लागला तर मगर गजेंद्राला पाण्यात खेचण्याची शर्थ करू लागला. असे हे आश्चर्यकारक युद्ध एक हजार वर्षे चालले होते. कालान्तराने गजेंद्र थकला, त्याचे बळ संपले, आणि उत्साह ओसरला. इतर हत्ती व हत्तिणी त्याला सोडून गेली. तेव्हा अशा प्राणान्तिक संकटाच्या वेळी परमेश्वरालाच शरण जाणे योग्य

असा विचार करून त्याने मन स्थिर केले आणि पूर्वजन्मी अभ्यासलेले विष्णूचे स्तोत्र म्हणावयास सुरुवात केली. ते भावपूर्ण स्तोत्र ऐकून आणि तो गजेंद्र संकटात आहे हे पाहून चक्रधारी श्रीहरी गरुडावर बसून त्या सरोवरापाशी आले. त्यांना पाहताच गजेंद्राने त्यांना भक्तिभावाने नमस्कार केला. तेव्हा श्रीहरी चटकन गरुडावरून खाली उतरले आणि त्यांनी गजेंद्र व मगर ह्या दोघांनाही पाण्याबाहेर काढले. तेव्हा तेथे गोळा झालेले ब्रह्मादी देव, महर्षी व गन्धर्व श्रीहरींची स्तुती करू लागले. इकडे त्या मगराला दिव्य शरीर प्राप्त झाले. तो मगर पूर्वी 'हूहू' नावाचा श्रेष्ठ गंधर्व होता. देवल ऋषीच्या शापामुळे तो मगर झाला होता. आता श्रीहरींच्या कृपेमुळे तो शापमुक्त झाला. त्याने भगवंतांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांचे स्तुतिगान केले आणि नंतर गंधर्वलोकी प्रयाण केले.

गजेंद्रालाही भगवन्तांच्या स्पर्शाबरोबर भगवंतांचे रूप प्राप्त झाले. तो पीतांबरधारी व चतुर्भुज झाला. गजेंद्र हा पूर्वजन्मीचा इन्द्रद्युम्न नावाचा पांड्य-वंशीय राजा होता. तो श्रेष्ठ ईश्वरोपासक होता. एकाएकी त्याला विरक्ती आली आणि तो राज्यत्याग करून मलयपर्वतावर ईश्वराचे ध्यान करू लागला. एकदा तो असाच ध्यानमग्न असताना अगस्त्य मुनी आपल्या शिष्यांसह तेथे येऊन पोचले. इन्द्रद्युम्नाने त्यांचे आगतस्वागत केले नाही. तेव्हा ते चिडले व त्यांनी राजाला, 'तू हत्तीसारखा जडबुद्धीचा आहेस. म्हणून तू हत्ती होशील', असा शाप दिला. आणि ते तेथून निघून गेले. त्या शापानुसार इन्द्रद्युम्नाला हत्तीची योनी प्राप्त झाली. त्याने भगवंताचे संकटकाळी स्मरण केले असता त्याला भगवंतांनी संकट-मुक्त केले, आपला पार्षद (अनुचर) बनविले आणि निजरूप अर्पण करून वैकुंठात अढळ स्थान दिले. अशा प्रकारे श्रीकृष्णाने गजेंद्राचा उद्धार केला. तो करताना श्रीकृष्णाने गजेंद्राला असा उपदेश केला की, जे लोक प्रातःकाळी उठून इन्द्रिय-निग्रह करून एकाग्रचित्ताने ह्या कथेचे स्मरण करतील ते पापमुक्त होतील; त्यांच्या दुःस्वप्नांचा नाश होईल आणि त्यांना कीर्ती, उन्नती व सद्गती यांची प्राप्ती होईल. श्रीकृष्णाने गजेंद्राला असे आश्वासन दिले की, 'जे लोक प्रातःकाळी उठून तू गायलेल्या माझ्या स्तोत्राने माझे स्तुतिगान करतील त्यांना मी त्यांच्या मृत्यूसमयी निर्मळ बुद्धी देईन.'

श्रीमद्भागवत महापुराणातील आठव्या स्कंधाच्या एक ते चार अध्यायांतील गजेंद्र मोक्षण आख्यान असे आहे.

[भाग. अष्टमस्कंध, श्लोक १।३०-४।२६]

आता भागवतेतर पुराणांपैकी पद्मपुराणातील आख्यानाचा परिचय करून घेऊ.

२.३ पद्मपुराणातील आख्यान

जय व विजय हे दोघे विष्णूचे द्वारपाल होते. परंतु, त्यांनी पूर्वी जे आचरण केले होते त्यामुळे त्यांना ते रूप प्राप्त झाले होते.

देवहूती ही तृणबिंदूची कन्या होती. तिला कर्दमाच्या दृष्टिमात्रेंकरून दोन मुलगे झाले. त्यांपैकी मोठ्याचे नाव जय असे असून धाकट्याचे नाव विजय असे होते. जय आणि विजय हे नेहमी विष्णूच्या भजनपूजनांत निमग्न असत. ते धार्मिक स्वभावाचे असून त्यांनी इन्द्रियांना कह्यात ठेवले होते. ते नेहमी विष्णूचा 'ॐ नमो वासुदेवाय ।' हा अष्टाक्षरी जप करीत असत आणि विष्णुव्रत आचरीत असत. विष्णूने त्यांना प्रत्यक्ष दर्शन दिले होते व तो त्यांच्या दैनंदिन पूजेत प्रकट होत असे. एकदा मरुत्ताने त्यांना यज्ञ चालविण्यासाठी बोलावले. यज्ञ कर्मात निष्णात असलेले ते देवर्षिगणांबरोबर मरुत्ताकडे गेले. यज्ञात जय ब्रह्मा झाला आणि विजय याजक झाला. त्यांनी यज्ञविधी यथासांग पार पाडला. यज्ञाच्या समाप्तीनंतर मरुत्ताने अवभृथस्थान केले आणि त्या दोघांना खूप दक्षिणा दिली. ते दोघे दक्षिणेचे ते धन घेऊन आपल्या घरी परत आले. नंतर विष्णूला संतुष्ट करण्यासाठी विष्णुयाग करण्याचे त्यांच्या मनात आले. तेव्हा त्या दोघांनी मिळवून आणलेल्या धनाची वाटणी करण्याचे ठरविले. जयाने सुचवले की, आपण मिळविलेल्या संपत्तीचे सारखे वाटे करू या. विजयाचे म्हणणे असे होते की, ज्याने जे मिळविले त्याने ते स्वतःपाशी ठेवावे. तेव्हा जय खवळला व त्याने विजयाला शाप दिला, 'तू माझे द्रव्य बळकावून बसलास आणि ते मला परत देत नाहीस. म्हणून तू मगर होशील.' जयाची ती शापवाणी ऐकून विजयही संतापला व त्यानेही जयाला शाप दिला, 'तू उन्मत्त झाला आहेस व मला शाप दिला आहेस म्हणून तू हत्ती होशील.' नित्य पूजा-समयी दर्शन देणाऱ्या विष्णूला त्यांनी आपली हकीकत सांगितली आणि शापाचे निवारण करण्याची विनंती केली, 'भगवन्, आम्ही दोघे तुझे भक्त मगर व हत्ती होऊ. म्हणून हे कृपासागरा, त्या शापांचे निवारण कर'. त्यावर श्रीविष्णू म्हणाले, 'माझ्या भक्तांचे वचन कधीच खोटे होत नाही. इतकेच काय, खुद्द मीही त्यात कोणताही फेरबदल करू शकत नाही. कारण मी पूर्वी प्रल्हादाच्या वचनाखातर खांबातून प्रकट झालो. तसेच अंबरीषाच्या वचनाखातर मी गर्भात जन्म घेतला. म्हणून तुम्ही दोघे एकमेकांनी एकमेकांना दिलेले शाप भोगाल आणि त्यानंतर कायमचे माझ्याप्रत याल'; असे

म्हणून विष्णू अन्तर्धान पावले. तेव्हा ते दोघे गंडकी नदीच्या काठी मगर व हत्ती बनून राहू लागले. परंतु; त्यांना पूर्वजन्माची स्मृती असल्यामुळे ते (मनुष्येतर योनीतही) विष्णुव्रत आचरीत राहिले. तो गजेन्द्र कार्तिक महिन्यात एकदा गंडकीवर स्नानासाठी गेला असता मगराला शापकारणाची आठवण झाली व त्याने गजेंद्राच्या पायाला विळखा घातला. तेव्हा त्या गजेंद्राने मनोभावे विष्णूचे स्मरण केले. त्याबरोबर शंखचक्रधारी विष्णू प्रकट झाले व त्यांनी सुदर्शनचक्र फेकून मगर व हत्ती यांना वर काढले, त्यांना 'सरूपता' मुक्ती दिली आणि आपल्याबरोबर वैकुंठात नेले. ते हे दोघे जगात जय व विजय म्हणून प्रसिद्धी पावले. हे दोघे विष्णुप्रिय विष्णूचे द्वारपाल म्हणून नित्य उभे असतात. जो मनुष्य हा पुरातन इतिहास ऐकतो त्याला विष्णूच्या कृपेने विष्णूचे सान्निध्य प्राप्त होते.

अशा प्रकारे पद्म महापुराणान्तर्गत कार्तिकमासमाहात्म्य प्रकरणात श्रीकृष्ण-सत्यभामासंवादातील कलहोपाख्यानामध्ये गणपूर्वपुण्यवर्णन नावाचा अध्याय आहे. [पद्म. ११२।१-३२]

२.४ इतर पुराणांतील आख्यान

विष्णुधर्मोत्तरपुराणाच्या प्रथम खंडाच्या अध्याय १९३ व १९४ मध्ये (९ + ७५ =)८४ श्लोकांत गजेंद्रमोक्षाचे कथानक वर्णिलेले आढळते. ते भारती आख्यानानुसार आहे. [वि.पु. पृ० ११९-१२१]

वामन पुराणाच्या वामनप्रादुर्भाव प्रकरणात [पंच. पृ० १७१-१८२] आणि आनन्दरामायणाच्या सारकांडाच्या सीताशुद्धी नावाच्या प्रकरणात [आरा. पृ० ६२-६३] वर्णिलेले आख्यान, किंचित फेरफारांनी, भागवती आख्यानासारखेच आहे. वामनपुराणात पुलस्त्याने नारदास असा उपदेश केला आहे की, दुःस्वप्नांचा नाश करणारे चार जप असून त्यांपैकी गजेंद्रमोक्षाचा हा पहिला जप आहे. आनंदरामायणात देवल मुनींनी हूहू गंधर्वाला शाप देण्याचे कारण असे सांगितले आहे की, एकदा देवल मुनी अघमर्षणासाठी सरोवरात उतरले असता हूहूने सरोवराच्या पाण्यात बुडी मारली आणि खालून देवलांचे पाय धरले. त्याने अशी कुरापत काढल्यामुळे मुनिवर्य चिडले व त्यांनी हूहूला शाप दिला. वरील दोन्ही ग्रंथांतील हा अधिकचा तपशील किरकोळ स्वरूपाचा आहे. अर्थात वामनपुराण व आनंदरामायण भागवतानुसारीच ठरतात.

स्कंद पुराणाच्या वैष्णव खंडाच्या अठ्ठाविसाव्या अध्यायातील १ ते ३१ श्लोकांत आलेले मकरहूहू आख्यान [स्कंद. पृ० १७८] ह्यापूर्वी वर्णिलेल्या पद्म-पुराणातील आख्यानाशी तंतोतंत मिळतेजुळते आहे.

२.५ मूळ आधारांचे विश्लेषण

प्रस्तुत आख्यानाच्या मूळ आधारांच्या वरील नोंदींचे विश्लेपण केले असता असे प्रतीत होते की, प्रस्तुत कथा त्रिपथगा आहे. महाभारत, भागवत आणि पद्मपुराण असे ते तीन पंथ आहेत. ह्या तिन्ही ग्रंथांत ही कथा एक प्राचीन इतिहास ह्या स्वरूपातच वर्णिलेली आहे. तिन्ही ग्रंथांतील कथानकांत दोन व्यक्तीं-संबंधी हकीकत आहे. भारती आख्यानात हाहा व हूहू हे दोन गंधर्व आहेत; भागवती कथेत इन्द्रद्युम्न राजा व हूहू गंधर्व आहे आणि पद्मपुराणातील कथानकात जय व विजय हे दोन ब्राह्मण आहेत. प्रस्तुत पुरातन इतिहासाच्या पठण-श्रवण-कथनादींमुळे मनुष्याची सर्व पापे नष्ट होतात, आणि त्याला मरणोत्तर सद्‌गती लाभते ही फलश्रुती तिन्ही कथाप्रवाहांत समान रूपात सांगितलेली आढळते. ह्या कथेचे प्रातःस्मरण करणाऱ्याच्या दुःस्वप्नफलांचा नाश होऊन त्याला सुस्वप्न-प्राप्ती होते, अशी विशेष फलश्रुती भारती व भागवती आख्यानांत नोंदली आहे. प्रस्तुत कथेच्या त्रिविध स्वरूपांत वरील ढोबळ साम्ये आहेत. आता काही वैषम्ये विचारात घेऊ. पहिलेच वैषम्य असे की, भारती व भागवती आख्याने विस्तृत आहेत, तर पद्मपुराणातील आख्यान संक्षिप्त आहे. त्यांच्या पद्यांची संख्या अनुक्रमे १६२, ९५ व ३२ अशी आहे. विष्णुधर्मोत्तरातील आख्यान भारतानुसारी असल्या-मुळे त्यात ८४ पद्ये आहेत. त्रिकूट पर्वत, त्याची शिखरे, त्याच्यावरील झाडेझुडपे, पशुप्राणी, सिद्धगंधर्वादी योनींतील व्यक्ती, उपवन, सरोवर इत्यादींचे सविस्तर वर्णन भारतात तसेच भागवतात आहे; पद्मपुराणात नाही. हत्तीचे जलपानार्थ सरोवरावर जाणे, तेथील जलक्रीडा, गजेंद्राचे पत्नीप्रेम व पुत्रवात्सल्य इत्यादींच्या वर्णनात भागवतकार रमले आहेत; भारतकारांनी त्याबाबतीत हात आखडता घेतला आहे. पद्मपुराणातील कथाकथन अनुलोम पद्धतीचे आहे तर भारती व भागवती आख्यानात विलोम पद्धतीचा अवलंब केलेला आहे. भारती आख्यानात गजेन्द्राने केलेल्या विष्णूच्या स्तुतीप्रीत्यर्थ ३४ श्लोक खर्ची पडले आहेत (विष्णु-धर्मोत्तरात २० आहेत), भागवती आख्यानात २८ आहेत. पद्मपुराणात ही स्तुती आढळत नाही. तसेच भारती व भागवती आख्यानांच्या अखेरीस श्रीकृष्णाने आपल्या विविध रूपांची जो यादी दिली आहे तिचाही पद्मपुराणात अभाव आहे. भारत-भागवतकारांचा रोख दुःस्वप्ननाशक, स्तोत्रयुक्त व प्रातःस्मरणीय आख्यानाचे वर्णन करण्याकडे आहे तर पद्मपुराणाचा कल कार्तिकमासाच्या माहात्म्याचे वर्णन करण्याच्या निमित्ताने एक पुरातन कथा सांगण्याकडे आहे. येथवर मूळ आधारांची छाननी करून त्यांची साम्यवैषम्ये बघितली. आता आणखी काही मुद्यांकडे वळू.

२.६ गजेंद्रमोक्ष आणि इतिहासपुराण

गजेंद्रमोक्षाचे प्रस्तुत आख्यान हा पुरातन इतिहास आहे असे, भीष्मांनी युधिष्ठिराला हे आख्यान सांगताना, सुरवातीलाच म्हटले आहे. [अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । म २५. श्लोक २३]. भगवंताने तामस मन्वंतरामध्ये 'हरि' ह्या नावाने अवतार धारण करून मकरापासून गजेन्द्राला मुक्त केले, ह्या शब्दांनी भागवती आख्यानाची सुरुवात झाली आहे [भाग. आठवा स्कंध, १।३०]. पद्मपुराणातही पुरातन इतिहास याच शब्दांत या आख्यानाचा उल्लेख केलेला आहे. ['इतिहासमिमं पुराभवं शृणुते यश्च पुमान्यथाविधि ।' –पद्म. ११२।३२]. ह्यावरून ही एक ऐतिहासिक हकीकत आहे, हे ध्यानात येते. महाभारताला इतिहास, पुराण व पंचमवेद ही तिन्ही नावे दिलेली आढळतात [इपुसा. पृ० ७४]. विष्णुगुप्त कौटल्यानुसार ज्यात पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र हे सगळे असते त्यास इतिहास म्हणतात [तत्रैव पृ० ७३]. इतिहास वेदांचा गूढ अर्थ स्पष्ट करतो, असे भविष्यपुराणात म्हटले आहे. वेदार्थाचे उपबृंहण (पोषण किंवा विस्तार) करणे हे जसे इतिहासाचे कार्य आहे तसेच ते पुराणांचेही कार्य आहे. महाभारतात एके ठिकाणी म्हटले आहे की, पुराणरूप पूर्णचंद्रामुळे श्रुतिरूप रात्री उजळून निघतात [पुराणपूर्णचन्द्रेण श्रुतिज्योत्स्नाः प्रकाशिताः ॥ महाभारत, आदि० १।८६]. अठरा प्रमुख व अठरा गौण पुराणांत प्राचीन भारतीय जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इत्यादी सर्व अंगोपांगांविषयी माहिती आलेली आहे. पुराणांची व्यापकता, बहुविषयसमावेशकता व सांस्कृतिक महत्ता यांचे वक्तृत्वपूर्ण व यथार्थ वर्णन करताना श्री० मणी म्हणतात—"The Purāṇas · · · · throw a flood of light on all aspects of Indian Culture—its religion, social practices, art, literature and science. They serve as the key to the proper understanding of the various aspects of Hinduism—its beliefs, its modes of worship, its mythology, its festivals, feasts and fasts, its sacred shrines, and places of pilgrimage, its philosophy and ethics and its theogony. . . . · " [PE. Preface, p. vii]. हे सारे उत्तम प्रकारे साधता यावे ह्यासाठी पुराणार्थविशारदांनी आख्यान, उपाख्यान, गाथा व कल्पशुद्धी अशी चार प्रमुख उपकरणे वापरली. [आख्यानैश्चाप्युपाख्यानैर्गाथाभिः कल्पशुद्धिभिः । पुराणसंहितां चक्रे पुराणार्थविशारदाः ॥–विष्णुपुराण ३-६-१५]. ह्यावरून आख्यान हे पुराणसंहितासिद्धीचे साधन आहे, असे ठरते. त्या दृष्टीने प्रस्तुत आख्यानाचा थोडा विचार करू.

२·७ गजेंद्रमोक्ष आख्यान की उपाख्यान ?

आख्यान म्हणजे पुरातन कथा, पूर्ववृत्तकथन किंवा स्वयंदृष्टार्थकथन अर्थात् स्वतः पाहिलेल्या घटनेचे वर्णन [PSD. p. 312]. मनूच्या 'स्वाध्यायं श्रावयेत्पित्र्ये धर्मशास्त्राणि चैव हि । आख्यानानीतिहासांश्च पुराणानि खिलानि च ॥' [मनु० ३।२३२ पृ० १३२] ह्या श्लोकातील 'आख्यानानि' शब्दाचे स्पष्टीकरण कुल्लूकाने आपल्या टिप्पणीत 'आख्यानानि सौपर्णमैत्रावरुणादीनि' अर्थात सौपर्ण, मैत्रावरुण (अगस्त्य व वसिष्ठ यांचे नामान्तर) इत्यादींच्या प्राचीन हकीकती, असे केले आहे. थोडक्यात, अतिप्राचीन काळी होऊन गेलेल्या व्यक्तींसंबंधीची हकीकत म्हणजे आख्यान असे ठरते. उपाख्यान म्हणजे आख्यानाच्या तुलनेने लहान कथा किंवा हकीकत. इतरांकडून पूर्वी ऐकलेल्या हकीकतीचे पुनः कथन करणे असाही उपाख्यानाचा अर्थ कोशात दिलेला आढळतो [PSD. p. 470]. उपाख्यानां-व्यतिरिक्त ते भारत व उपाख्यानांसहित ते महाभारत, अशी विद्वानांची धारणा आहे. तिच्यावरूनही उपाख्यान म्हणजे संक्षिप्त पूर्ववृत्ते असाच अर्थ निष्पन्न होतो. एकंदरीने आकाराने जे मोठे (उदाहरणार्थ, रामायण किंवा महाभारत) ते आख्यान व आकाराने जे सापेक्षतया लहान (उदाहरणार्थ, पुरूरवा व उर्वशी यांची कथा, सुग्रीवाची कथा इत्यादी) ते उपाख्यान, असे सामान्यपणे म्हणता येईल. ह्या दृष्टीने गजेंद्रमोक्षाची कथा हे एक उपाख्यान ठरते.

२·८ गजेंद्रमोक्ष हे स्तोत्र ?

मागे पहिल्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे ह० भ ११ व म ११ च्या लेखकांनी हे एक स्वयंपूर्ण स्तोत्र मानले आहे. तसेच भ ६ व भ ८ ह्या हस्त-लिखितांच्या पुष्पिकांत अनुक्रमे 'गजेंद्रमोक्षणो नाम स्तोत्रं समाप्तं' व 'गजेंद्रमोक्षणं नाम स्तोत्रं संपूर्णम्' असेच ह्याचे वर्णन आढळते. त्यामुळे प्रस्तुत आख्यान स्वतंत्र स्तोत्र मानता येईल काय असा एक प्रश्न उत्पन्न होतो, त्याचा थोडक्यात विचार करू.

कोणत्याही स्वतंत्र व स्वयंपूर्ण स्तोत्रात पुढील वैशिष्ट्ये आढळतात-त्याचा रचनाकार एखादा ऋषी असतो; त्याची विशिष्ट देवता व शक्ती असते, त्याच्या आरंभी इष्ट देवतेचे ध्यान केलेले असून नंतर सरस्वती-गुरुजन-प्रभृतींना वंदन केलेले असते. प्रत्येक स्तोत्रात स्तुत्य देवतेच्या स्वरूपाचे, सामर्थ्याचे, महिम्याचे, पूर्वयुगातील अवतारांचे, त्या अवतारांतील पराक्रमांचे, दुष्टांच्या पारिपत्याचे, सज्जनांच्या रक्षणाचे व देवतेच्या ज्ञान, औदार्य, भक्तवात्सल्य, वरदत्व, दीनबंधुत्व, कृपासिंधुत्व, विभुत्व, सर्वानर्थहरणक्षमत्व इत्यादी गुणांचे, पौराणिक कथांचा

निर्देश करून, वर्णन केलेले असते. ते करून झाल्यावर स्तोत्रकर्ता स्वतःच्या क्षुद्रत्व, पापीपणा, दैन्य, दारिद्र्य, दुःख, दौर्बल्य, अज्ञान, त्रिविध तापांपासून होणारे क्लेश, शत्रु-आपत्ती इत्यादींपासून वाटणारे भय इत्यादी उणिवांचा किंवा वैगुण्यांचा, पाढा वाचतो आणि स्तुत्य देवतेची 'मला ज्ञान दे', 'मला वाचव', 'माझ्या संकटांचे निवारण कर', इत्यादी शब्दांत पुनःपुन्हा विनवणी करतो. तत्पश्चात स्तोत्राची फलश्रुती सांगितलेली असते. स्तोत्राच्या अखेरीस स्तुत्य देवतेच्या व स्तोत्रकर्त्या कवीच्या नावांचा निर्देश असतो. सामान्यपणे स्तोत्राची रूपरेषा अशी असते.

प्रस्तुत आख्यानात संकटग्रस्त गजेंद्राने विष्णूचा धावा केला आहे व तत्प्रीत्यर्थ भारत, भागवत व विष्णुधर्मोत्तर ह्या ग्रंथांतील संबंधित भागांत सुमारे तीस श्लोक खर्ची पडले आहेत, हे खरे. परंतु, ह्या धाव्याच्या सुरुवातीस स्तोत्रकर्ता ऋषी, स्तोत्रदेवता, स्तोत्राची शक्ती, स्तोत्राचा कीलक (आधार), इष्ट देवतेचे ध्यान, इत्यादी औपचारिक वैशिष्ट्यांचा अभाव आहे. विष्णुस्तुतिरूप श्लोकांत विष्णूला पुनःपुन्हा नमस्कार केलेला आहे. त्या स्तुतीत विष्णूला अनुलक्षून जी संबोधने वापरलेली आहेत त्यांत विष्णूच्या सामर्थ्य-पराक्रम-स्वरूप-प्रभृती अनेक गुणांचे वर्णन मात्र अवश्य आढळते. उदाहरणार्थ, भारती आख्यानात गजेंद्रकृत विष्णुस्तुतीत विष्णूस उद्देशून पुढील विशेषणे वापरलेली आहेत—अनन्य, अचिन्त्य-रूप, अच्युत, अज, अजित, अणीयान्, अतर्क्य, अतुल, अदृश्य, अनन्तर, अनाश्रय, अप्रमेय, अभयप्रद, अमितविक्रम, अव्यक्त, अव्यय, अक्षर, अज्ञेय, आत्मविकाशन, आत्मप्रभव, आत्महितायन, आदित्यरुद्राश्विवसुप्रभाव, आदिदेव, आदिभूत, आद्य, आर्षेय, ईश्वर, एक, कमलपत्राक्ष, कांचनभक्तिचित्र, कारणवामन, कार्य, कूटस्थ, केशव, क्रियाकारण, गुण, गुणवर्ती, गुणात्मा, गुणाध्यक्ष, गुह्य, गोविन्द, गोक्षीर-हेमशुकनीलघनोपम, चतुर्भुज, चारुमुकुट, चारुविचित्रमौली, जगत्प्रतिष्ठ, जनार्दन, त्रिदशायन, त्रिलोकेश, त्रिविक्रम, देव, देवगुह्य, देवदेव, देवदेवेश, देवनिधी, देवेन्द्रविघ्नशमनोद्यतपौरुष, देवोत्तम, दैत्यनिधन, नागेन्द्रभोगशयन, नानाविचित्र-कनकांगदभूषण, नाभिप्रजातकमलस्थचतुर्मुख, नारायण, नारोद्भव, निर्गुण, निश्चिन्त, निःस्पृह, पद्मनाभ, परमात्मा, पीताम्बर, पुण्डरीकाक्ष, पुराण, पुरातन, पुरुषोत्तम, पुष्करेक्षण, पूर्व, प्रकृतेः परस्थ, फुल्लारविन्दकमलायतलोचन, बीज, ब्रह्म, ब्रह्ममय, ब्रह्मायन, ब्रह्मेन्द्रमुनिचारणसंस्तुत, ब्राह्मणप्रिय, भक्तवत्सल, भक्तानां अभयंकर, भक्तिप्रिय, मधुकैटभनाशन, मनोरम, महात्मा, महादेव, महा-बल, महावराह, महोरग, मालाधर, मुक्तसंगानां यतीनां परमा गतिः, मूलप्रकृती,

यशस्वी, युगान्तशेष, योगात्मनां वरिष्ठ, योगात्मा, योगेश्वर, लोकत्रय, लोकायन, वर, वरद, वरदीप्तसुदर्शन, वरपद्मनाभ, वरेण्य, वासुदेव, विश्व, विश्वेश्वर, वेदनिलय, वेदविदां वरिष्ठ, व्यक्त, शम्भू, शरण, शरण्य, शान्त, शाङ्र्गचक्रासिगदाधर, शाश्वत, शिव, श्रीवत्साङ्क, सकल, सनातन, सर्वग, सर्वभूतानां प्रभव, सर्वमह, सर्वेश्वर, सर्वेषां प्रपितामह, साङ्ख्यविदां वरिष्ठ, सिंह, सुप्रिय, सुब्रह्मण्य, सुरेश, सूक्ष्म, हर, हरी, हिरण्यनाभ, क्षीरोदकार्णवनिकेतयशोधर आणि क्षेत्रज्ञ.

गजेन्द्राने ह्या स्तुतीनंतर 'त्राहि मां शरणागतम् ।' [स २५. श्लोक ९१] अशी विनवणी केली आहे. प्रस्तुत उपाख्यानाच्या अखेरी-अखेरीस खुद्द भगवंतांनी गजेन्द्राला उपदेश केला असून आपल्या प्रातःस्मरणीय, पूज्य व पापमोचक रूपांचा नामनिर्देशही केला आहे [तत्रैव, श्लोक १२६-१३३]. ह्या आख्यानाच्या अंती ह्याची महती व फलश्रुती यांचेही वर्णन आले आहे. ह्या तपशिलावरून असे म्हणता येते की, प्रस्तुत आख्यानान्तर्गत गजेन्द्रकृत विष्णुस्तुती 'स्तोत्र' ह्या रचनाप्रकाराच्या काटेकोर अर्थाच्या दृष्टीने स्तोत्र नाही हे खरे, पण तिच्यात स्तोत्राची अनेक वैशिष्ट्ये आढळतात हेही तितकेच खरे. एकंदरीने प्रस्तुतच्या आख्यानाचे वि-णुस्तुतिगर्भ उपाख्यान असे नामकरण निखालसपणे करता येईल.

२·९ गजेंद्रमोक्ष आणि पंचरत्ने

हस्तलिखित स २५ मधील अन्तिम पद्य असे आहे—

गीता सहस्रनामैव स्तवराजो ह्यनुस्मृतिः ।
गजेन्द्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते ॥

[स २५. श्लोक १६२].

अर्थात–भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम, भीष्मस्तवराज, अनुस्मृती व गजेंन्द्रमोक्ष ही महाभारतातील पाच(ग्रंथ)रत्ने होत. भगवद्गीता म्हणजे महाभारताच्या भीष्मपर्वातील अध्याय २५ ते ४२; विष्णुसहस्रनाम म्हणजे महाभारताच्या अनुशासनपर्वातील अध्याय १४९, भीष्मस्तवराज म्हणजे महाभारताच्या शांतिपर्वातील अध्याय ४७ आणि अनुस्मृति म्हणजे महाभारताच्या कुंभकोणम्-प्रतीनुसार शांतिपर्वाच्या अध्याय २०२ नंतरचा भाग [MBH.16. Appendix I pp. 2027-2031]. गजेंद्रमोक्षाचे उपाख्यान महाभारताच्या भांडारकरसंस्थेच्या संस्करणात आढळत नाही, ह्याबद्दलची चर्चा पहिल्या प्रकरणात केलीच आहे. वरील पाच ग्रंथांना पंचरत्ने का म्हणतात, ह्या ग्रंथांत कोणते साम्य आहे व गजेंद्रमोक्ष उपाख्यानाचा अन्तर्भाव ह्या पंचरत्नांत का न्याय्य आहे, त्याचा आता संक्षेपाने विचार करू.

भगवद्गीता चिदानन्द कृष्णाने स्वमुखाने अर्जुनास सांगितली [पंच. पृ. ५, श्लो. ९], जेथे गीतेचे पठण, पाठण, श्रवण व चिन्तन चालू असते तेथे भगवंतांचे वास्तव्य असते [तत्रैव, पृ. ४, श्लोक ६], गीतेचे ध्यान करणाऱ्यास पापे स्पर्श करीत नाहीत [तत्रैव, पृ. ४, श्लो. ३], तसेच त्याला वैकुंठाची प्राप्ती होते आणि तेथे विष्णूच्या आनंदमय सान्निध्याचा लाभ होतो [तत्रैव, पृ. ६, श्लो. १८] आणि जो गीताजप करतो त्याला ज्ञानप्राप्ती होऊन परम गती लाभते [तत्रैव, पृ. ५, श्लो. १०]. ह्या शब्दांत खुद्द विष्णूनेच भगवद्गीतेचे माहात्म्य पृथ्वीला विशद करून सांगितले आहे.

विष्णुसहस्रनामाचे पठण करणाऱ्याच्या संकटांचे निवारण होते[पंच. पृ.१३४, श्लो. १२९], सर्व दुःखांचे निरसन होते [तत्रैव, पृ. १२०, श्लो. ६], त्याची पापभयापासून मोकळीक होते [तत्रैव, पृ. १२१, श्लो. १२], त्याला इहलोकी तसेच परलोकी अशुभ प्राप्त होत नाही [तत्रैव, पृ. १३४, श्लो १२२] आणि त्याची सर्व पापे धुतली जाऊन त्याला सनातन ब्रह्मपदाची प्राप्ती होते [तत्रैव, पृ. १३५, श्लो. १३०], ह्या शब्दांत विष्णुसहस्रनामाचा महिमा भीष्मांनी गायिला आहे.

शरशय्येवर पडलेल्या भीष्मांनी भगवान् कृष्णाला हात जोडून प्रणिपात केला आणि त्याची अशी स्तुती केली [पंच. पृ. १४१, श्लोक ५] की, जे गोविंदाला नमस्कार करतात त्यांना भय उरत नाही [तत्रैव, पृ० १५०, श्लोक ९०], कृष्णाला नमस्कार करणाऱ्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही [तत्रैव, पृ. १५०, श्लोक ९१], कृष्णाचे अनुस्मरण करणारे कृष्णमय होतात [तत्रैव, पृ० १५०, श्लोक ९२] आणि 'हरि' ही दोन अक्षरे दुःखशोकांपासून संरक्षण करणारी, संसाराचा उच्छेद करणारी आणि प्राणरूप अरण्यातील प्रवासात पाथेयासारखी उपयोगी पडणारी आहेत [तत्रैव, पृ. १५१, श्लो. ९५].

'अनुस्मृति' ह्या ग्रंथात खुद्द भगवंतांनी नारदाला असा उपदेश केला आहे की 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या जपामुळे जपकर्ता सर्व पातकांपासून मुक्त होतो [तत्रैव, पृ. १५७, श्लो. १५-१६]आणि त्याला विष्णुपदाची प्राप्ती होते [तत्रैव, पृ. १६५, श्लो. ८४]. भीष्मांनी ह्या अनुस्मृतीची फलश्रुती सांगताना असे म्हटले आहे की, ह्या गूढ अनुस्मृतीचे पठण करणाऱ्यास ब्रह्मनिष्ठ बुद्धी प्राप्त होते, पापे व संकटे ह्यांपासून त्याची सुटका होते आणि तो स्नेहरहित होऊन पृथ्वीवर वावरत राहतो [तत्रैव, पृ० १६७, श्लोक १०२,].

गजेंद्रमोक्षाच्या महतीचा व फलश्रुतीचा विस्तृत विचार पूर्वी छेदक २.८ मध्ये केलाच आहे.

वरील पाच ग्रंथांच्या रचनेचे सर्वसमान प्रयोजन एकच आहे आणि ते म्हणजे

'न वासुदेवात्परमस्ति मङ्गलं न वासुदेवात्परमस्ति पावनम् ।
न वासुदेवात्परमस्ति दैवतं तं वासुदेवं प्रणमन्न सीदति ।।'
[पंच. पृ० १६७ श्लोक १०१].

हे महत्तम व सर्वंकष तत्त्व सश्रद्ध व्यक्तीच्या मनावर बिंबविणे हे होय. म्हणूनच या पाच ग्रन्थांना पंचरत्ने म्हणतात व त्यांत गजेंद्रमोक्षाचा अन्तर्भाव अधिकारतः होतो.

—:०:—

३. प्राचीन मराठी काव्ये

पहिल्या प्रकरणात मराठी काव्यांच्या हस्तलिखितांशी ओळख झाली. आता प्रस्तुत प्रकरणात त्या काव्यांच्या संहितांशी प्रत्यक्ष परिचय करून घ्यावयाचा आहे. तसा तो घेताना काही पथ्ये पाळण्याचे ठरविले आहे. त्यांपैकी पहिले पथ्य असे की, मूळ आधारभूत संस्कृत काव्याचे ज्या मराठी काव्यात केवळ शब्दशः भाषान्तर केलेले असेल ते मराठी काव्य पूर्णपणे उतरून न घेता त्यातील निवडक दहा-पंधरा पद्ये उतरून घ्यावयाची व त्यांच्या आधारे मराठी कवीचे अनुवादपटुत्व तेवढे प्रदर्शित करावयाचे. दुसरे पथ्य असे की, जी मराठी काव्ये ह्यापूर्वी स्वतंत्रपणे किंवा काव्यसंग्रहरूपाने प्रसिद्ध झालेलीआहेत, ती पुनर्मुद्रित न करता त्यांच्या हस्तलिखितांत आढळणारे ठळक वैशिष्ट्य तेवढे नमूद करावयाचे. ह्याच धोरणानुसार विश्वनाथतनय नारायण, देवदास व वामन ह्यांच्या काव्यांना (ती पूर्वप्रकाशित असल्यामुळे) येथे स्थान दिलेले नाही. मात्र वामनाच्या काव्याच्या हस्तलिखितांत आढळणारे एक भेदक वैशिष्ट्य तेवढे नमूद करावयास हवे. वामनाच्या पूर्वप्रसिद्ध काव्याचे सुरवातीचे दोन श्लोक वसंततिलका वृत्तात असून ते पुढीलप्रमाणे आहेत:

व० ति०

चक्रायुध स्वमरणार्तिम जो हरी तो ।
धांवे चढोनि खगराजभुजीं अहो ! तो ।।
चक्रेंचि नक्रमुख फोडुनि पाय हातीं ।
ओढी धरूनि हरि हा, विधि हें पहाती ।।१।।

नक्रें तळ्यांत धरिला प्रबळेंचि हस्ती ।
तों 'ये' म्हणे व्यथित यूथप 'पद्महस्तो,' ।।
सत्कीर्ति तूं, श्रवणमंगलनाम नाथा !
सर्वेश आदिपुरुषा ! गति दे अनाथा ।।२।।

वामनाच्या काव्याची जी एकूण एकोणीस हस्तलिखिते प्राप्त झाली त्यांपैकी एकाही हस्तलिखितात वरील श्लोकद्वय नाही, ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या पृष्ठसंख्येच्या बाबतीत काही बंधन पाळावयाचे असल्यामुळे अतिशय प्रदीर्घ अशी ह० म ८ व स १८-मधील काव्ये उद्धृत करता येत नाहीत. ती, शक्य झाल्यास, एखाद्या संशोधनपर मासिकात स्वतंत्रपणें प्रकाशित करण्यात येतील.

स ११ हे विष्णुस्तुतिपर काव्य स १८ मध्ये पूर्णपणे समाविष्ट असल्यामुळे ते वगळण्यात येत आहे. मुकुंद कवीचे काव्य (ह० त ७) हे अत्यंत अशुद्ध व अनाकलनीय आहे. ते छापण्यात प्रयोजन नाही. एकनाथांच्या एकाच काव्याची एकाधिक हस्तलिखिते (स २०, स २१ व स २२) प्राप्त झाली. त्यांपैकी एक मूळ समजून पूर्णपणे उद्धृत केले आहे आणि इतर दोहोंतील पाठभेद नमूद केले आहेत. एवढ्या खुलाशानंतर आता एकेका काव्याचा परिचय करून घेऊ.

३.१ रघुनाथ

प्रस्तुत कवीचे कुळवृत्त, ग्रंथकर्तृत्व व काळ ह्यांविषयी माहिती मिळत नाही. महाराष्ट्र-सारस्वताच्या सूचीत [मसा. पृ. १०५६] इतर अनेक रघुनाथांचे उल्लेख आहेत, पण ह्या कवीचा उल्लेख नाही.

प्रस्तुत काव्य म्हणजे संस्कृतातील श्रीमद्भागवत पुराणाच्या अष्टम स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायाच्या चौथ्या पद्यापासून तो चौथ्या अध्यायाच्या सव्विसाव्या पद्यापर्यंतच्या भागाचे मराठी रूपान्तर आहे. कवीने मुळातील त्या-त्या पद्याचे वृत्त मराठीतही कायम ठेवले आहे, म्हणून ह्या भाषांतराला समश्लोकी म्हणावयाचे. प्राचीन काळात ह्याच पद्धतीने भगवद्गीता, पंचतंत्र, पद्मपुराण, रसमंजरी अशा काही संस्कृत ग्रंथांचे मराठी अवतार सिद्ध करण्यात आले होते. प्रस्तुतचे काव्य हा तत्सदृश प्रयत्न होय. अशा रूपान्तरात रूपान्तरकाराला मुळातील आशय अन्य भाषेत जसाच्या तसा उतरवावा लागतो. ह्याबाबतीत रघुनाथाला कितपत यश आले आहे, त्याचा काहीसा निर्णय करता यावा एतदर्थ मूळ भागवतातील काही निवडक पद्ये, रघुनाथाच्या समश्लोकीसह, खाली उद्धृत केली जात आहेत :—

तत्रैकदा तद्गिरिकाननाश्रयः करेणुभिर्वारणयूथपश्चरन् ।
सकण्टकान्कीचकवेणुवेत्रवद्विशालगुल्मं प्ररुजन्वनश्यतीन् ।।
तेथें असे त्या गिरिच्या महावनी । फिरे करेणू गजयुक्त काननी ।।
ते कंटके कीचक वेळु वेत्रिच्या । विशाल मोडी तरुगुल्म धात्रिच्या ।।

[भाग० २।२०/स ४ प. २३]

तं तत्र कश्चिन्नृप दैवचोदितो ग्राहो बलीयांश्चरणे रुषाग्रहीत् ।
यदृच्छयैवं व्यसनं गतो गजो यथाबलं सोऽतिबलो विचक्रमे ।।
तो तेथ कोणी नृप दैवप्रोढित । क्रोधे बळे ग्राह पदासि वोढित ।।
स्वेच्छे तयाने व्यसमी बुडे करी । स्वशक्ति वोढि बहु वोढुनि करी ।।

[भाग. २।२७/स ४. प. ३६]

इत्थं गजेन्द्रः स यदाप संकटं प्राणस्य देही विवशो यदृच्छया ।
अपारयन्नात्मविमोक्षणे चिरं दध्याविमां बुद्धिमथाभ्यपद्यत ॥
ऐसे गजेंद्राप्रति प्राप्त संकट । प्राणान्त देहा घडतो महोत्कट ॥
जो सोडवी पूर्ण करोनि कामना । धात्रे दृढ बुद्धि करी असी मना ॥

[भाग. २।३१/स ४. प. ३५]

ॐ नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् ।
पुरुषायादिबीजाय परेशायाभिधीमहि ॥
ॐ नमो भगवान् तूते वस्ती सच्चिदआत्मया ।
पुरुषा आदिबीजाते परेशा बुद्धिने नमो ॥

[भाग. ३।२/स ४. प. ३।२]

तस्मै नमः परेशाय ब्रह्मणेऽनन्तशक्तये ।
अरूपायोरुरूपाय नम आश्चर्यकर्मणे ॥
त्याते नमो परेशाते अनंतब्रह्मशक्तिला ।
अरूपास सुरूपा वंदो करी अपूर्व कर्म त्या ॥

[भाग. ३।९/स ४. प ३।९]

नमो नमस्तुभ्यमसह्यवेगशक्तित्रयायाखिलधीगुणाय ।
प्रपन्नपालाय दुरन्तशक्तये कदिन्द्रियाणामनवाप्य वर्त्मने ॥
नमो नमो तूज अगाधवेगा । शक्तित्रयी निर्गुणधी अवेगा ॥
न अंत शक्तीस शरण्यपाळा । बुद्धींद्रियां नाकळसी कृपाळा ॥

[भाग. ३।२८/स ४. ३।२८]

तं वीक्ष्य पीडितमजः महसावतीर्य ।
सग्राहमाशु सरसः कृपयोज्जहार ॥
ग्राहाद् विपाटितमुखादरिणा गजेन्द्रम् ।
संपश्यतां हरिरमूमुचदुस्रियाणाम् ॥
पाहोनि पीडित गज उतरे अकस्मात ।
ग्राहेसहों धरित काढि कृपाब्धि तस्मात् ॥
छेदोनि ग्राह-मुख ते हरिने गजाला ।
पाहोनि देव सुटती स्तविती अजाला ॥

[भाग. ३।३३/स ४. प. ३।३३]

नेदुर्दुन्दुभयो दिव्या गन्धर्वा ननृतुर्जगुः ।
ऋषयश्चारणाः सिद्धास्तुष्टुवुः पुरुषोत्तमम् ॥
दुंदुभी दिव्य नाद ते गाती गंधर्व नाचती ।
ऋषी चारणसिद्धादि स्तविती पुरुषोत्तमा ॥

[भाग. ४।२/स ४. प. ४।२]

गजेन्द्रो भगवत्स्पर्शाद् विमुक्तोऽज्ञानबन्धनात् ।
प्राप्तो भगवतो रूपं पीतवासाश्चतुर्भुजः ॥
गजेंद्र भगवत्स्पर्शे त्यजी अज्ञानबंधन ।
पावला भगवद्रूप पीतवस्त्री चतुर्भुज ॥

[भाग. ४।६/स ४. प. ४।६]

इदमाह हरिः प्रीतो गजेन्द्रं कुरुसत्तम ।
शृण्वतां सर्वभूतानां सर्वभूतमयो विभुः ॥
ऐसे बोले हरि प्रेमें गजेंद्रा कुरुसत्तमा ।
ऐकवी सर्वभूतांला सर्वभूतात्म जो विभू ॥

[भाग ४ ।१६/स ४ . प. ४।१६].

उत्थायापररात्रान्ते प्रयताः सुसमाहिताः ।
स्मरन्ति मम रूपाणि मुच्यन्ते ह्येनसोऽखिलात् ॥
उठोनि पररात्रीस युक्त निर्मन होउनी ।
स्मरती माझिया रूपा तरती पापसागरा ॥

[भाग. ४।२४/स ४ . प. ४।२४].

भागवती पद्ये व रघुनाथाची तत्समश्लोकी यांची परस्परतुलना केली असता असे जाणवते की, रघुनाथ मुळाचे मराठीकरण करताना क्वचित्स्थळी एखादा शब्द सोडून देतो, क्वचित मूळ अर्थाला किंचित मुरड घालतो, क्वचित मुळातल्या शब्दांचा मराठीत भावार्थ देतो, क्वचित भिन्न अर्थ व्यक्त करतो, तर क्वचित्स्थळी मुळातील कर्मणि-वाक्यरचनेला मराठीत कर्तरी पेहराव चढवतो. मात्र अशा प्रवृत्ती तुरळक स्वरूपातच जाणवतात. सर्वसामान्यपणे तो शब्दाला प्रतिशब्द योजून व मूळ अर्थाला कसोशीने भिडून मराठी भाषान्तर करतो. त्यामुळेच रघुनाथाची ही समश्लोकी मराठी टीका यशस्वी व प्रशंसनीय झाली आहे, असे निःशंकपणे म्हणता येते. रघुनाथ संस्कृताचे मराठीकरण करताना यमकांच्या आहारी जात नाही; निर्यमक रचना निर्भयपणे करतो, हेही त्याच्या समश्लोकीच्या यशाचे

आणखी एक कारण आहे. ज्याला संस्कृताचे ज्ञान नाही व त्यामुळे ज्याला संस्कृतातील मूळ भागवत वाचता येत नाही, त्याला मुळातील प्रस्तुत आख्यान अनायासे समजावे, अशी चांगली सोय रघुनाथाने प्रस्तुत समश्लोकीच्या द्वारे केली आहे.

प्रस्तुत काव्याच्या हस्तलिखिताच्या एकाच नकलेवरून वरील पद्ये छापली आहेत.

३.२ अज्ञात कवी

कवीचे नाव उपलब्ध होऊ शकत नाही. त्याच्या काळाविषयीही माहिती मिळत नाही. परंतु, अनेक वृत्तांत काव्य रचण्याच्या त्याच्या प्रवृत्तीवरून तो मध्ययुगीय महाराष्ट्रातील पंडित कवींचा समकालीन असावा, असे अनुमान करता येते.

त्याचे प्रस्तुतचे काव्य अपूर्ण आहे. सुरवातीची १६ पद्ये अनुपलब्ध असून चोविसाव्या पद्यांनंतरचा फक्त दीड चरण उपलब्ध आहे. परंतु हे उपलब्ध त्रुटित काव्यही लक्षात राहण्याजोगे आहे. कवीच्या नैसर्गिक प्रतिभेची पाऊलचिन्हे ह्या सतरा-अठरा पद्यांवरही उमटली आहेत. परिचित कथानकात कल्पनेने रंग भरण्याचे कौशल्य कवीला अवगत आहे. आख्यानक काव्यात व्यक्तिदर्शनाच्या सौष्ठवाला महत्त्व असते, याची जाणीव कवीला आहे. त्याने लहान-लहान पण मोहक शब्दचित्रांनी कथेची रंगत वाढविली आहे. पद, उपजाती, भुजंगप्रयात, उपेन्द्रवज्रा, कामदा अशा विविध वृत्तांतील पद्यांनी हे काव्य खुलले आहे. हे समग्र काव्य उपलब्ध होऊ शकले तर काव्यरसिकांना एक आनंदाचा ठेवाच गवसल्यामाखे होईल. प्रस्तुत काव्यातील काही पद्यांत वृत्तभंग मात्र जाणवतो. तसेच बहूशब्दाचा अतिरेकी प्रयोगही खटकतो.

हस्तलिखिताची एकच नक्कल उपलब्ध झाली. तिचाच पाठ खाली छापला आहे.

प्रभुपति ।। जाहाला विशाळ थोर हस्ती भूपती ।। गजेंद्र नाम पावला वनात हस्ती डोंगरी । पुत्र पौत्र सुखरूप वास तिरी साजिरी ।। १७ ।। चाली ।। दोघहि असे शाप पावले । × × × श वागवु नित्य लागले ।। एक भितरी एक बाहेरि । राखीत जीवा वैर आंतरिं ।।१८।।

भु०प्र०

त्रिकूटाचला पर्वती मस्त हस्ती । सुखें सागराच्या तिरी त्यासि वस्ती ।।
गिरीच्या परी शोभती स्थूळ देखा । असंख्यात त्या करी कोण लेखा ।।१९।।

उ०व०

सहस्र वरूशे वनि नांदताहे । परस्परें त्या आति प्रीत मोहो ।।
जन्मान्तरीचे सुखदु:ख नाही । विसरूनि गेला समुळीच पाही ।।२०।।
उन्मत्त जाला वधि स्वाप × × × । म्हणे गिरीं ते तरु पाडि दांतें ।।
ऐसा वनामाजि विनाश केला । मदांध रूपस्मति (?) योग केला ।।२१।।

उ०जा०

गजेन्द्र मानी मनि मीच धन्य । आप्रीति ऐसे मज नागसैन्य ।।
तृषानळें बहु पीडलासे । सरोवरातें बळि चालिलासे ।।२२।।

कामदा

पांच योजने दूरि गंडिका । जातसे तेथ नित्य ऊदका ।।
सेविना परी पुष्करीं जळा । ग्राह हा म्हणे नक्र त्या स्थळा ।।२३।।
त्या दिवसिं चित्तविस्मृती । जाहली असे मंद हे मती ।।
पूर्ववैर ते नाठवे मनीं । सर्वही दिसे स्थूळ लोचनीं ।।२४।।
ऐसिया परी काळ कर्मिला । मुख्य काळ तो शीघ्र पातला ।।
त्याजसारिखी बुद्धि योजिली । तहानही बहु फार लागली ।।२५।।
चैत्र मासिचे उष्ण लागले । आंगही बहु फार पोळलें ।।
गंड्की बहू दूर राहिली । पुष्कराकडे चालि मांडिली ।।२६।।

भु० प्र०

जसे देखिले आदरेसी तळाते । बहू विश्रांत तो चालिला शीघ्र वेगें ।।
×× ×× ×× ×× । सवें शोभती संतती सर्व मागे ।।२७।।

कामदा

आधि पाजिले नीर बाळका । त्याजनंतरे सर्व सैनिकां ।।
धूतले तयां स्नेह आदरे । तोष पावला हर्ष आंतरे ।।२८।।

भु० प्र०

करूनि सुखी सर्वही संत(ती)ते । निघाला जळी वोढिले जीवनाते ।।
अमर्याद ते घेतले नीर पाही । पुढे चालिला सैन्य सूखे स्वदेही ।।२९।।
झुगारी शिरी नीर अंगावरी हो । जळाभीतरी खेळ लीळा करी हो ।।
अकस्मात तो झोंबला नक्र पायी । मिठी सोडिना कांहि केल्या उपायी ।।३०।।
बहू झुंजले पर्वतातुल्य देही । गजे वोढिला चेपिला नक्र पायी ।।
फिरे दांत खाऊनि तो नक्र जेठी । धरी सोंड, मारी पदीं नक्र मीठी ।।३१।।

कामदा

आमुडी जंव पाय हस्ति तो । मागुती मवें नक्र वोढितो ॥
झुंजता बहू क्लेश जाहले । पुत्रपौत्र ही सर्व पांगले ॥३२॥
घातल्या अळ्या पाय कुंजरी । वोढिला बळें हाव आंतरी ॥
श्रेष्ट आमुचा राहिला जळी । मीन गुंततो जेपरी गळी ॥३३॥
पाहता कसे साखळी करा । सुंडिने पुसे सर्वही धरा ॥
येक × × × सर्वही बळें । झांबती बहू शक्तिच्या बळें ॥३४॥
वोढि मांडिली दोन्हीहि कडे । यातना बहू × × × × ॥

[ह० इ २]

३.३ अज्ञात कवी

प्रस्तुत कवितेच्या कर्त्याचे नाव प्राप्त होत नाही. तंजावर येथील बयाजवार यादीतही [यादी ३. पृ० ७५] ह्या काव्याच्या कर्त्याच्या बाबतीत 'अनामिक' अशीच नोंद आहे. कवीच्या उत्कर्ष-काळाच्या बाबतीत मात्र काहीशी अटकळ बांधता येते. खाली छापलेल्या काव्यातील 'जे रमेच्या कुचावरी । फिरती पाणी ।' ही शब्दावली मोरोपंतांच्या केकावलीतील 'प्रियाकुचतटीं जिहीं न बहुवार पत्रावळी' [सातवी केका] ह्या पंक्तीची आठवण करून देणारी आहे. प्रस्तुत कवीने केकावलीतून वरील कल्पनेचे ग्रहण केले असावे असे मानल्यास कवी मोरोपंतोत्तर-कालीन म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम चरणातला ठरतो.

प्रस्तुत काव्य भागवतानुसारी असले तरी नवव्या ओवीतील मगराचा युक्तिवाद कविकल्पित आहे. 'काही तरावया गावे' हेच काव्यप्रयोजन दिसते. काव्य धावत्या ओवी छंदात रचलेले आहे. विशेषसे अन्य प्रशंसनीय वैशिष्ट्य जाणवत नाही.

हस्तलिखिताच्या एकाच नकलेच्या आधारे प्रस्तुत कवितेचा पाठ खाली छापला आहे.

॥ श्रीगणेश प्रसन्न ॥

ओव्या. अकस्मातें उडी टाकी । त्या सरोवराच्या तटाकीं । गजेंद्र कष्टि मोटाकि (?) । पाये टाकि नक्राचि ॥१॥ शंख चक्र गदा पद्मीं । देखे वासुदेव-करपद्मीं । तो होतां गज करपद्मी । तो हरी-पद्मीं पद्म अर्पी ॥२॥ झळके पीत कटितटीं । म्हणे पावला संकटीं । भ्रुकुटि ज्याची व्यंकटी । समीप निकटी गज देख ॥३॥ नारायण हाणें स्वचक्रें । ते पाहवे चक्रें । पाय न सोडिला नक्रें । तेंहि शक्रें देखिला ॥४॥ नक्रमुखांतुनि झडकरी । पाय न निघे, विह्वळ करी । करुणाकरे

करुणा करी । आपुला स्वकरीं काढितो ।५। जे (र)मेच्या कुचावरी फिरती पाणी । त्यांत कर घेउनियां पाणी । गज-पाय धूतो चक्रपाणी । मुद्रिकांत सुपाणि झळकतो ॥६॥ जैसें रमेसि विचरण । तैसेंच गजपदीं आचरण । करितो पाहा दीनोद्धरण । ज्याचे चरण शरण ऋषिसुरें ॥७॥ तंव नक्र आला हो शरण । म्हणे, "चुकवा जी जन्ममरण । गजाचे कां धरिलें चरण । तें तुजकारण सांगतों ॥८॥ जंव जंव मी पाय उकरी । तंव तंव स्मरणें करीं करी । वाट पाहे नरकेसरी । यंकेमगी उद्धरसी" ॥९॥ ऐकोनि शरणागती । × नि दीधली करीसम गती । केला देवाची संघाती । नाम गाती हरीचें ॥१०॥ नारायण आरूढे वैनतेया । म्हणे, 'जे येणार तया' । विमानीं देव गाया । लागले अगाधा जगदीशा ॥११॥

॥ श्रीमस्तु ॥ [ह० ७५]

३.४ एकनाथ

पन्नासांहून अधिक ओव्यांचे प्रस्तुत काव्य एकनाथांचे आहे, हे अन्तिम ओवीतील नाममुद्रिकेवरून स्पष्ट होते. नाथांचे चरित्र व ग्रंथकर्तृत्व सर्वश्रुत आहे.

एकनाथांनी हे लघुकाव्य भागवताधारे रचले आहे. त्यांनी भागवती आख्यान थोडक्यात पण मनावर ठसेल अशा रीतीने सांगितले आहे. त्यांनी केलेले गजेंद्राचे पूर्ववृत्तकथन भागवतास धरून आहे, तर त्यांच्या हूहूच्या पूर्वचरित्रनिवेदनास आनंदरामायणाच्या मूलस्रोताचा आधार असावा असे वाटते. रानातील गजेंद्राच्या दांडगाईचे कविकल्पित वर्णन (ओ. २४) मनोरम आहे, तसेच जलपान-प्रसंगीच्या त्याच्या गृहस्थवत आचरणाचे वर्णनही (२८) मनोज्ञ आहे. बंधुत्यक्त गजेंद्राचे स्वगत (३५-३७) हृदयस्पर्शी आहे. मगराने स्वोद्धारासाठी ईश्वरापाशी केलेल्या युक्तिवादात (४८-५०) मार्मिकपणा आहे. देवदास व विष्णुदास यांचे मगरही भगवंताशी अशीच हुज्जत घालतात. नाथांची कथनशैली ओघवती आहे.

प्रस्तुत काव्याचा पाठ हस्तलिखिताच्या एका नकलेच्या आधारे खाली छापला आहे.

॥ श्री रामचन्द्राय नमः ॥

जो योगियांचा योगग्रहणो । जो ब्रह्मचर्या शिरोमणी । जो ज्ञानियांचा मुकुटमणी । तो शुक मुनी सांगत ॥१॥ जो कां वैराग्याचा निधी । ज्ञान-विज्ञान-उदधी । जो कां बुद्धीची बुद्धी । तो शुक त्रिशुद्धी बोलत ॥२॥ पांडव-कुळीं कुळदीपक । कौरव-कुळीं कुल-नायक । श्रोता परीक्षिती तसोदक । श्रवण-चातक कथार्थी ॥३॥

तया परीक्षितीपासीं जाण । गजेंद्राचें उद्धरण । श्रीशुक सांगे आपण । वसतिस्थान गजाचें ।।४।। त्रिकूट नामा गिरिवर । जो योगिजनपूत दशसहस्र । गंडकीपासूनि क्षीरसागर । येवढा थोर पर्वत ।। ५ ।। तया पर्वताची दरी । जे लागली गंडकी गिरिवरी । वनें उपवनें साजिरी । नाना वृक्षांतरीं गंभीर ।। ६ ।। जैसें देखतां उपवन । विश्रांतितें पावे मन । छाया शीतळ सुगंध पवन । कोकिला-कूजन सुखकारी ।।७।। अमृतापरी सफळ सुस्वाद । कस्तूरी होउनि सुगंध । मलयानिल सुखबद्ध । क्रीडति षट्पद सुखरूप ।।८।। ऐशा वृक्षाचिया जाती । असंख्यात नेणों किती । तेणें शोभे पर्वती । ऋषी वसती महासिद्ध ।।९।। पांचाळ-देशराजा इन्द्रद्युम्न । भगवद्-भक्ति-परायण । तो या सरोवरा येऊन । येकान्त देखून राहिला ।।१०।। तेचि काळीं अगस्ति मुनि । आला शिष्येंसीं परिवारूनि । अभ्युत्थान न करूनि । बैसला ध्यानीं ध्यानस्थ ।। ११ ।। ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मभक्ती । भगवद्-भावो नाहीं भूतीं । रायाची खोटी स्थिती । तेणें अगस्ति कोपला ।।१२।। रायाचा झडे ध्यानाभिमान । भगवत्प्राप्ति पावे पूर्ण । ऐशी कृपा अवलोकुन । शाप-वचन वदे मुनी ।।१३।। 'साधु-सज्जनीं गर्वोन्मत्त । तो तूं होशी गज उन्मत्त ।' ऐसें जंव ऋषी वदत । गजत्व प्राप्त रायासी ।।१४।। ब्रह्मशाप अति दुर्धर । तेचि वनीं तो राजेंद्र । होवोनिया मत्त कुंजर । बळोद्गार महाबळी ।।१५।। इन्द्रद्युम्नाची ऐशी स्थिती । हूहू गंधर्व याची रीती । ब्रह्म-शापाची शापोक्ती । 'नक्रत्व पावशील' ।।१६।। देव(ल) ऋषी जलाआंत । उभा सूर्यसूक्त जपत । हूहू गंधर्व जळीं गुप्त । येऊनि झोंबत ऋषि-पायीं ।१७। पायीं झोंबतां सत्वर । कोपोनि शापी ऋषीश्वर । 'होशी गुप्त गवी (?) जळचर । नक्र गज ग्रहो' ।।१८।। ब्रह्मशाप ऐकोनि कानीं । गंधर्व इन्द्रद्युम्न दोनी । उःशाप मागावया लागूनि । कर जोडूनि प्रार्थित ।।१९।। 'आम्ही दोघे अपराधी । तुम्ही दोघे कृपानिधी । तुम्ही अक्षोभ्य अगाधबुद्धी । आम्हां त्रिशुद्धी उद्धरावें' ।२०। 'येक जळीं येक वनस्थळीं । वैरी व्हाल अतुर्बळी । युद्ध करितां जलकल्लोळीं । तुम्हां वनमाळी तारिल' ।। २१ ।। ऐशी वरदोक्ति वदून । ऋषींनीं केलें गमन । दोघे जण शापबंधन । जाले जाण ऋषि-शापें ।२२। नक्र जळीं अतुर्बळी । गजेंद्र वनीं महाबळी । दोघे जण शाप समेळीं । जळीं स्थळीं विचरती ।।२३।। हाणतां दाताचे पैं झडे । पाडित पर्वताचे कडे । ज्याच्या मदगंधापुढें । पळती रोकडे वनसिंह ।। २४ ।। करूनि पंचयोजन गमन । नित्य करी गंडकीय-पान । परि सरोवराचें जीवन । नक्रा-भेणें स्पर्शेना ।।२५।। गंडकी न टाके उष्ण समेळीं । किरणें पोळती कुंभस्थळीं । आला सरोवराजवळी । भयें समेळीं तृषार्त ।। २६ ।। गज राहोनि बाहेरी । सोंड घातलें भीतरीं । मग प्राशी स्वइच्छेकरीं । कांहीं मस्तकावरीं शिंपिलें ।। २७ ।। पहिलें पाजिलें प्रिय

भार्येसी । भार्या पाजिती प्रिय पुत्रासी । मग पाजिती इतरासीं । जेंवि कुटुंबासि गृहस्थ ॥२८॥ ऐसा क्रीडतां जळस्थानीं । नक्रें धावूनि धरिला चरणीं । गजें निज बळें ओढूनि । बाहेरी आणूनि मारूं पाहे ॥ २९ ॥ गज वोढितां भूतळीं । नक्र निज बळें वोढी जळीं । सहस्र वर्षे रणकंदळी । जळकल्लोळीं भिडीनले ॥३०॥ नक्रासि जळीं जळ आहार । गज पडिला निराहार । भूतळा नाणवेचि नक्र । शक्ति समग्र क्षीण जाली ॥३१॥ खुडितां सोंडाचे अणीसी । गजेंद्र जाला कामाविशी । मग म्हणे स्त्रीपुत्रासी । 'ओढूनि पुंसीं मज काढा' ॥३२॥ स्त्रिया म्हणती 'भाग्य थोर । संकटीं वांचले कुमर' । नक्रें गिळिला गजेंद्र । अक्षय पुत्र कडे आले ।३३। ऐसा गजेंद्र क्षीण शक्ती । येतो स्त्रीपुत्रा काकूलती । सांडूनि गेली पति प्राणांती । कोणी अंतीं न ये कामा ॥ ३४ ॥ गजेंद्र पाहे ममता धरूनि । 'अंतीं सांडिलें सुहृज्जनीं । ज्येष्ठ-कनिष्ठादि असंख्य पत्नी । अंतीं त्यागूनि मज गेल्या ॥३५॥ मज समान अति दुर्धर । शतानुशत माझे कुमर । अंतीं विमुख जाहले समग्र । कळत्र पुत्र न ये कामा ॥ ३६ ॥ सुहृद आणि पुत्र प्रौढ । तेहीं सांडिली माझी चाड । हस्तिणीचा कोण पाड । अति अवघड प्राणान्त' ।३७। सोडावया नक्रावरती । गजेंद्रें वेचिली निज शक्ती । कळत्र पुत्र सुहृद् ज्ञाती । न येति अंतीं उपेगा ॥३८॥ 'ऐशी मज जे आठवण । हेचि हरीची कृपा पूर्ण । हरि-अनुग्रहवीण । नामस्मरण नाठवे' ॥३९॥ ऐकोनि गजेंद्राचें वचन । येता जाहला गरुड-वाहन । देव करिती दिव्य स्तवन । कृपाळु पूर्ण भक्ताचा ॥४०॥ चक्रें हणोनिया नक्रा । चक्र-धारें फोडिलें वक्त्रा । मकरमिठी अति दुर्धरा । नक्र गजेंद्रा सोडिना ॥ ४१ ॥ लागतां श्रीहरीचें चक्र । रुधिरें नाहला नक्र । तऱ्हीं न सोडी गजेंद्र । दृढ वैरी द्विज-शापें ॥४२॥ बाप कृपाळु भगवंत । दोहीं तळीं घालोनि हात । जळाबाहेरी अकस्मात । काढिलें त्वरित भगवंतें ॥४३॥ लागतां भगवंताचा हात । दोघे जण अति उद्धत । तेही झाले शापोन्मुक्त । भाग्यवंत सभाग्यें ॥४४॥ विमानीं देखती सुरवर । भूतळीं देखती ऋपीश्वर । गगनीं देखती खेचर । गजेंद्र-नक्र-उद्धरणें ॥ ४५ ॥ भगवंतें कृपा करून । दोघेही बाहेर आणून । गजेंद्र विमानीं बैसवून । श्रीभगवान चालिला ॥४६॥ जातां देखूनि भगवंत । नक्र खदखदां हांसत । त्यासि श्रीहरी पुसत । 'हास्य किमर्थ तुज आलें ?' ॥४७॥ 'उद्धरिलें गजेंद्रातें । मज कां उपेक्षिलें येथें । याचि देखूनि विषमातें । अत्यद्‌भुत हांशिलों' ।।४८।। हरी स्वमुखें सांगे आपण । 'गजेंद्रें केलें नामस्मरण । पाप-पुण्य निर्दाळुन । उद्धरणें पावला' ॥ ४९ ॥ 'तुझें झालिया दर्शन । माझें पाप नव्हे गा क्षीण । पाप-बळें म्यां आपण । श्रीभगवान जिंकिला' ॥५०॥ अति-वक्रोक्ति नक्र-वचन । ऐकोनि तोषला श्रीभगवान । 'तुझें पाहावया मन । उपेक्षण म्यां केलें ॥५१॥ माझिये दर्शनाचिये प्राप्ती । तुज जाहली

ज्ञानस्फूर्ती' । ऐसें बोलोनि श्रीपती । नक्र-गजपती भेटविले ॥५२॥ एकाजनार्दना शरण । जालें गजेंद्राचें उद्धरण । श्रोतीं व्हावें सावधान । पुढील कथन अवधारा ॥५३॥

॥ इति श्रीगजेन्द्रमोक्ष संपूर्ण ॥ [ह० त २]

३.५ एकनाथ

गजेन्द्रमोक्षाच्या उपाख्यानावरील एकनाथांचे हे दुसरे काव्य होय. कवीची नाममुद्रा अडतिमाव्या ओवीत आढळते. गजेन्द्राला मगराने आकंठ गिळले ह्या वर्णनाने काव्यारंभ झाला आहे, तो आकस्मिक वाटतो. गज व नक्र यांचे पूर्ववृत्त वर्णिलेले नाही. संकटग्रस्त गजेंद्राला त्याचे ज्ञातिबांधव सोडून जातात तेव्हा गजेंद्र अन्तर्मुख होतो आणि मग प्रपंचाविषयीची आसक्ती, नातेवाईकांचा मायामोह इत्यादींच्या वैयर्थ्याबद्दल जे खंतीचे उद्गार (ओव्या २ ते ७) काढतो, ते हृदयस्पर्शी वाटतात. गजेंद्राची आळवणी ऐकून देव वेडापिसा झाला आणि अतित्वरेने धावून आला (ओ. १०-१३) हे वर्णन वाचून 'माझेया आणि भक्तां । संवसारिची चिंता । काइ समर्थाची कांता । भूकेतें शोची ॥' [ज्ञानेश्वरी १२।८५] ह्या ज्ञानदेवांच्या वचनांचे स्मरण होते. भगवंतानी झपाट्याने गजेंद्राची सुटका केली व त्यास स्वरूपता प्रदान करून आलिंगन दिले (ओ. १४-१६) हे वर्णन पुनः एकदा ज्ञानदेवांच्याच ' दों वरि दोनि । भुजा आलों घेउनि । आलिंगावे या लागोनि । तेयाचें आंग ॥ [ज्ञानेश्वरी १२।२२२] ह्या रम्योक्तीची आठवण करून देते. भगवंत गजेंद्राचे कौतुक करतो, त्याला पोटाशी धरून कुरवाळतो आणि त्याला झालेल्या श्रमाबद्दल खेद व्यक्त करतो (ओ. १९). भगवंताला अर्पिलेले हे मानवी रूप मोठे लाघवी आहे. इकडे भगवंताकडून गजेंद्राचे कोडकौतुक चालू असता तिकडे विव्हळत पडलेला मगर भगवंताला, तुम्ही कोण, कुठले, तुमचे नावगाव काय, असे अनेक प्रश्न कोणताही मुलाहिजा न ठेवता विचारतो (ओ. २०-२१). भगवंताने आपले 'विश्वंभर' हे नाव सांगताच (ओ. २४) मगर उपहासाने हसतो आणि भगवंताचाच खरपूस शब्दांत समाचार घेऊन आपण विश्वंभर असल्याचे प्रौढीने म्हणतो (ओ. २५-३३). नंतर 'पतितपावन हे आपले ब्रीद सार्थ करण्यासाठी तू माझा उद्धार कर,' अशी देवाला गळ घालतो (ओ. ३५-३६). भगवंत व मगर ह्यांचा हा सगळा खटकेबाज संवाद पूर्णतया कविकल्पित व हृद्य आहे. भगवंताची वरकरणी निंदा करणारे पण मनातून स्तुती करणारे असे मगराच्या तोंडचे हे भाषण खुबीदार आहे. कवीचे कथानिवेदन धावते व मनमोहक आहे.

प्रस्तुत काव्याच्या ह० स २२ चा पाठ खाली छापला असून काव्याच्या शेवटी स २० व स २१ या हस्तलिखितांतील पाठभेद नमूद केले आहेत.

अं व्या—गज[1] नक्र[2] गिळीला रे[3] कंठ[4]परियंत । हे देखोनि[5]कन्यादारा[6]सुत । टाकोनिया[7] पै समस्त । पळोनिया ते[8] गेले[9] ॥१॥ गजेंद्र विच्यारी मनी । ममस्त गेले मज[10] टाकोनी । अंती[11] माझ्या नाही कोणी । एका[12] भगवंता वाचोनि[13] ॥२॥ मी भुललो[14] होतो संसारी[15] बांदवडी । आता[16] कोण करील काहाडा[17] काहाडी । धरिली होती विपयाची गोडी । तेणे[18] गेलो[19] अधःपाता[20] ॥३॥ जियेचे उदरी गर्भवास[21] । केला[22] होता म्यां[23] नवमास । ते[24] मायही न धरी आस । टाकोनिया[25] मज गेली ॥ ४ ॥ जे[26] स्त्रियेने सर्वस्व भोगीले । जिने इहत्त्वा[27] परत्त्वा नागविले । तिने[28] ही मज[29] टाकिले । बांधोनि[30] दिधले काळ हाती ॥५॥ पुत्राचा धरला[31] भरवासा । त्यानेही केली निराशा । आता[32] धाव पाव गा हृषीकेशा । मज[33] दीनाते सोडवी ॥ ६ ॥ मज[34] आता नाही कोणी । आवो[35] कृपाळू[36] माय बहिणी । धावा[37] आता वैकुंठीहुनि । मज दीनातें सोडवावे ॥ ७ ॥ आगा[38] कृपानिधी कृपासागरा । चुकवी[39] आता येरझारा । पुढती[40] न घाली संसारा । जन्म मरणाचिया[41] पै ॥ ८ ॥ मी भुललो होतो देहासी । तो[42] देह कामा न ये[43] आम्हासी । अंतीचा तारक[44] तुंचि होसी । मज दीनाते सोडवावे ॥ ९ ॥ ऐसी[45] अहंता ममता[46] सोडोनि[47] । गजेंद्र करितसे[48] आळवणी । तंव देव पावले[49] तत्क्षणीं । गरूडावरी बैसोनिया[50] ॥ १० ॥ देव[51] सत्त्वर जात । गरूडे[52] पसरीले हात । मागे[53] टाकोनिया[54] भगवंत । पुढे धावत पै आला ॥ ११ ॥ एवढा[55] वेगु असे मनासी । ते मन न लिंपे[56] देवासी । तेथे गरूडाचि[57] गती कैसी । झाला कासाविस धावता ॥ १२ ॥ जैसे पिसे धावती[58] दाही दिशा । तैसा देव[59] जात असे कैसा । सोडावया[60] भक्त फासा[61] । अतित्वरेने[62] जात असे ॥ १३ ॥ चक्र भोंवडी[63] रक्षणा करि । त्वरे[64] धावती श्रीहरी । एकसरे[65] धावोनि सामोरी । गज[66] नक्र जेथे होता ॥ १४ ॥ गज[67] गिळिला होता कंठपर्यंत । तंव चक्र टाकिले[68] भगवंते । नक्राचा[69] देह विदारिला[70] त्वरीत । छिन्न-भिन्न पै केला[71] ॥ १५ ॥ जैसे[72] वत्सालागी धेनु वरसे । तैसे देवासि[73] भक्त पिसे । गजेन्द्र[74] आळंगीला हृषीकेशे । स्वस्वरुपता[75] दिधली ॥१६॥ लक्षुमी ओवाळी[76] देवभक्ताशी । देव करीती पुष्पवृष्टीशी । म्हणती[77] धन्य धन्य मातेच्या कुशी । जिने[78] स्वरूपता दिधली ॥ १७ ॥ गजेन्द्र[79] काय म्हणावा पशू । ज्याने[80] साधिला जगदिशू[81] । त्याचा तोडिला आशा[82]पाशु ।

मुक्त[83] पंथासी पाठविले ॥१८॥ गजेन्द्र धरिला पोटिशी[84] । म्हणे तु[85] बहु[86] श्रमलागी[87] । तव नक्र पडला होता[88] धरणेसी । तो काय[89] देवासी बोलिला ॥१९॥ नक्र म्हणे तुम्ही[90] कवण । हे[91] सांगावे मज लागुन । कोण[92] तुमचे राहते स्थान । ते सांगावे स्वामिया ॥ २० ॥ कोण तुमचा माता पिता । कोण[93] तुमचा ठाव राहाता । देव म्हणे रे[94] पापिष्टा । सर्वथा तुजशी[95] बोलो नये ॥२१॥ तू दुरात्मा दुराचारी । माझिया[96] भक्ताचा तूं वैरी । तुजशी[97] बोलो नये निर्धारी । पापरूपी तु[98] होसी ॥२२॥ तंव नक्र म्हणे जी सर्वथा । तुमचे[99] काय वेचे नांव सांगता । हा माझा वैरी होता । तुम्ही कां[100] याचे साहाय्य केले ॥ २३ ॥ आहो जी स्वामी[101] महासमर्था । नांव[102] सांगावे जी[103] आतां । तंव[104] येरू[105] म्हणे रे[106] जगपिता । माझे नांव विश्वंभर[107] ॥२४॥ नांव सांगोनि[108] विश्वंभर । नक्र[109] हासिनला थोर । म्हणे हे नांव सत्वर ।[110] । शोभेना तुम्हासी ॥२५॥ तूं विश्वंभर म्हणसी[111] । जरी[112] विश्वाचे पालन करिसी । तरी[113] मज कांगा निवडीसी । या विश्वावेगळा[114] ॥२६॥ जरी मी विश्वावेगळा स्वसाचार[115] । हरि[116] माझेचि नाम विश्वंभर । वैकुंठी माझे निज घर । मी उदार त्रैलोक्याचा ॥ २७ ॥ मीच[117] शेषशायी नारायण । मीच[118] सप्तद्विपींचा भगवान । मीच लक्ष्मीरमण । दुजा कोण[119] मजवांचुनि ॥२८॥ मीच[120] भुक्ती मुक्तीचा दाता । मीच[121] या विश्वाचे पाळन करितां । विश्वामाजी[122] तू भगवंता । जे मागसी[123] ते देईन ॥ २९ ॥ थोर माझिया पापांच्या[124] रासी । त्या[125] तुझ्याने न नासती गा सहसी । तरी मज[126] पुढे देव किती होसी । मी निवासी वैकुंठीचा ॥ ३० ॥ आणिक[127] आयकिली पुराणकथा । आजामेळ पापिष्ठ सर्वथा । अंतकाळी[128] स्मरिता[129] सुता । वैकुंठासी[130] नेला नारायणें ॥ ३१ ॥ मज होवोनि तुझे दर्शन[131] । तुझेनि[132] हाते रे माझे मरण । माझे पाप न[133] नासे तुझी आण । ते[134] मी थोर तुझेहुनिया ॥३२॥ हे[135] तो काय पाई बांधिले देवा । पाहिजे[136] सांगीतले लोकां गा । देवा[137] कां मौन धरिले । न देसी प्रति उत्तर[138] ।३३। देव म्हणे 'मी पतीत पावन । मिरवे[139] ब्रीद हे पै जाण' । नक्र[140] बोलिला हांसून, । तुवां पतीत[141] कवण[142] उद्धरीले ॥ ३४ ॥ म्हणसी उद्धरीले गणिकेसी[143] । तरी[144] तिने[145] उच्चारिले रामनामासी । मज सारिखा पतीत उद्धरसी । तरीच[146] होसी पतीत पावन ॥ ३५ ॥ तुम्ही म्हणवीता पतीत पावन । हे साजेना तुम्हां लागोन[147] । पतीताचा तारक मीची[148] जाण । हे ब्रीद पै[149] तुवा मज द्यावे' ॥ ३६ ॥ ऐसी[150] करूणा[151] परिसून ।

ऐकोनी[152] संतोषला नारायण । त्वरीत[153] आणोनि विमान । उद्धरीले[154] गज नक्रासी[155] ।। ३७ ।। येकाजनार्दना [156] शरण । पतीत पावन श्रीकृष्ण । उद्धारावया भक्त[157] जन । ब्रह्मी[158] संपूर्ण प्रकाशिले ।। ३८ ।। ऐसे गजेन्द्र आख्यान । श्रोते व्हावे सावधान । चुकोनी[159] जाय जन्ममरण । कथा संपूर्ण परिसावी ।।३९।। ऐसे[160] गजेन्द्र आख्यान । जे आयकती अथवा पठण । त्याचे दोष महावारुण । नासतील सत्य ।।४०।।

इति[161] एकनाथ विरचित गजेन्द्रमोक्ष संपूर्ण ।। [ह० स २२]

पाठभेद—1 स २० गजे. 2 स २० व स २१—नक्रे. 3 स २० व स २१ मध्ये रे नाही. 4 स २०-कंठपर्येत; स २१-कंठपरियंत. 5 स २१-देखोनिया. 6 स२१-व्याससुत. 7 स २०-उठोनिया. 8 स २०-'ते'जाही. 9 स२० व २१. गेली. 10 स २१ नाही. 11 स २०-आता येका हरीवानि. 12 स २०-सोडविता नाही दुसरा. 13 स २१. वाचुनिया. 14 स २०-पडलो हो तो; स २१-पडलो. 15 स २० व स २१-संसार बंदवडी 16 स-२१ मध्ये 'आता'नाही. 17 स २०-तडातोडी काहाडाकाहाडी; स २१-काडाकाडी. 18 स २१-तेणे मी. 19 स २० गेलो होतो. 20 स २०-अधःपातासी. 21 स २०-गर्भनवमास. 22 स २० वास केला होता तव. 23 स २१ मध्ये 'म्यां' नाही. 24 स २०- माझी ते माय । न धरी आस ।। 25 स २१-टाकुनिया. 26 स २०-ज्या. 27 स २०-अहीवा परतवीले; स २१-अंतकाळि नागविले. 28 स २०-जीन्हे ही दारा दीधले. 29 स २१-अंति 30 स २०-काळ हाती. 31 स २०-धरला होता. 32 स २०-पावपाव ऋपीकेशा; स २१-धावे पावे ऋपीकेशा. 33 स २० व स २१-तोडि फासा संसारीचा. 34 स २०-मज नाही गा. 35 स २१ मध्ये 'आवो' नाही. 36 स २१-कृपाळुवा. 37 स २०-धाव; स २१-धावे. 38 स २० व स २१-येगा. 39 स २०-पुढती न घाली संसारा । 40 स २०-चुकवी येवेनापासुनी दातारा । 41 स २०-मरणाचियें. 42 स २०-हे देह न ये कामासी. 43 स २१-न च. 44 स २०-आवर तुजपासी. 45 स २० मध्ये नवव्या ओवीनंतर ही ओवी—मी नेणे काही दान । मी काही नेणे ध्यान । भजन नेणे मी स्मरण । नाही तुज वाचुन तारक पै ।१०।. स २१ मध्ये अशी ओवी-मी नेणे काही ध्यान । भजन नेणे नाम-स्मरण । चुकवि पशुयोनिपासुन । नाहि तुजवाचुनि तारक ।१०।. 46 स २१ मध्ये 'ममता' नाही. 47 स २० व स २१-सांडुनि. 48 स २० व स-२१ करीता.

49 स२०-प्रगटले ततक्षेनी; स२१-प्रगटला ततक्षणी.50 स२०-बैसुनीया. 51 स२०-देवास वाने जाता; स २१-देव त्वरे असे चालत. 52 स २०-गरुड पसरीले दात; स२१ गरुडे विचकले दात. 53 स २१-मग. 54 स २०-टाकुनी;स २१-टाकुनिया. 55 स २०-मोठा वेग मनासी; स २१-मोटा वेगु असे मानसि. 56 स २१-ल्पे. 57 स २१-गजेंद्राचि दशा. 58 स २० व स २१-धावे. 59 स २०-वर्जीतसे. 60 स २०-तोडावया. 61 स २१-आशा. 62 स २०-त्वरे जातसे; स २१-त्वरेसी पातला. 63 स २०-भोवरे दक्षिणे करे; स २१-भोवडी दक्षिण करे. 64 स २०-श्रीवरे धावीजे श्रीवरे; स २१-वेगि धाविजे श्रीवरे. 65 स २०-येकसरी येउनी; स २१-यकला यउनि. 66 स २१-जेथे गज नक्र होते. 67 स २० व स २१ मध्ये 'गज' नाही. 68 स २०-टाकी भगवंत; स २१-टाकिले भगवंत 69 स २१-गज सोडविला क्षणांत. 70 स २०-विदारूनी त्वरीत. 71 स २०-केले. 72 स २०-जैसी वच्छालागी धेनु तरसे; स २१-जैसी वछ्यालागी धेनु वोरसे. 73 स २१-देवते. 74 स २१-गज. 75 स २०-स्वरूपमुक्ति पैं; स २१-स्वरूप युक्तिमि दिधले. 76 स २०-वोवाळो; स २१-वो सावली. 77 स २०-धन्ये धन्ये माये तु ऐसी, स २१-म्हणति धन्ये धन्ये मायचि कुसि. 78 स २०-जेणे स्वरूप दिधले; स २१-जेणे स्वरूपतादि दिधले. 79 स २१-गज. 80 स २० व स २१-जेणे. 81 स २०-रुपीकेशु. 82 स २०-आस. 83 स २०-मुक्त पंथासी पाठविले; स २१-मुक्तिपदासि पाठविला. 84 स २० व स २१-पोटासी. 85 स २१-आजि 86 स २०-आजी. 87 स २० मध्ये 'बहु' नाही. 88 स २० मध्ये 'होता' नाही. 89 स २१-देवासि काये. 90 स २०-जी तुम्ही कवण; स २१-कवण कोण. 91 स २१-कोण तुमाचे राहाते स्थान. 92 स २०-कोणते; स २१-मी पुसतसे तुम्हालागुन 93 स २०-कोणते स्थळी राहाता. 94 स २१-तु पतिता. 95 स २१-तुमि 96 स २०-तुजसी बोलु नये निर्धारी; स २१-तुसि बोलु नये निर्धारी. 97 स २०-तुझी माझी या भक्ता वैरी; स २१-तु माझ्या भक्ताचा अरि. 98 स २१-'तु' नाही; 'होसी'च्या जागी होसिल. 99 स २०-तुम्ही काय वचने सांगता; स २१-तुम्हा काय वेचे गा सर्वथा. 100 स २० मध्ये 'कां' नाही. 101 स २० व स २१ मध्ये 'स्वामी' नाही. 102 स २० व स २१-तुम्ही नाव. 103 स २१ मध्ये 'जी' नाही. 104 स २० व स २१ मध्ये 'तंव' नाही. 105 स २०-देव. 106 स २० व स २१ मध्ये 'रे' नाही. 107 स २०-विश्वांभरा; स २१-विश्वांभरू. 108 स २०-सांगे; स २१-सांगुनिया. 109 स २० व स २१-तंव नक्र. 110 स २०-साचारू; स२१-साचार. 111 स२० व स २१-म्हणवीसी. 112 स २०-जे; स २१-जे का. 113 स २०-तरीच तु मज नीवडीसी; स २१-

तरि तुं का मज निवडिसि. 114 स २१-०वेगळे. 115 स २० व स २१-साचार 116 स २०-तरि न माझे; स २१-तरि माझे. 117 स २० व स २१-मि शेषशयनि. 118 स २० श्वेत द्विपाची; स २१-मिरवेति दिप्तिचा. 119 स २०-कवण. 120 स २० व स २१-मी. 121 स २०-मी विश्वाते पाळिता; स २१-मीच विश्वाते पाळिता. 122 स २०-तो मी जगत्पिता; स २१-तुं स्वामि जि भगवंता. 123 स २०-मागसील. 124 स २० व स २१-पापरासी 125 स २०-तुझे गा स्मरण सहसी ।; स २१-तुझेनि नाशेना गा सहसि । 126 स २०-मजपुढे वेळ किती; स २१-पुढे देव कैचा होसि. 127 स २०-आणि ऐकोनि. 128 स २१-तो अंतकाळी. 129 स २०-स्मरोनि; स २१-स्मरे. 130 स २०-नारायणें नेला वैकुंठासी; स २१-नारायणें वैकुंठासि नेला. 131 स २१-दरूशन. 132 स २०-तुझे हाती माझे मरण; स २१-तुझेनि हाते मज मरण. 133 स २० व स २१-नाशे न तुझेन; स २१-नाशेना तुझेन. 134 स २०-तरी थोर तुजहुनि; स २१-तरि मि थोर तुजहुनि. 135 स २०-हे ते पाई काये बांधिले; स २१-हाति पाई काये बांधिले; 136 स २० व स २१ ते पाहिजे सांगितले 137 स २०-का देवा मौन्ये धरीले स २१- कागा देवा मौन्ये धरिले. 138 स २१-उत्तरा. 139 स २०-माझे हे ब्रीद०; स २१-माझे हेचि ब्रीद०. 140 स २० व स २१-तंव नक्र 141 स २०-पतीतपावन. 142 स २० व स २१-कोण. 143 स २०-नक्रेसी. 144 स २१-मध्ये 'तरी' नाही. 145 स २०-ते उद्धरली. 146 स २१-तरि. 147 स २० व स २१-लागुन 148 स २० व स २१-मी. 149 स २० - मज दयाळे; स २१-मज द्यावे. 150 स २०-असे कानि उत्तर ऐकुन; 151 स २१-करूणेचि वचन. 152 स २० मध्ये हा व पुढचा असे दोन चरण नाहीत.; स २१ मध्ये 'ऐकोनी' नाही. 153 स २१-मग आणोनिया. 154 स २०-उद्धरीला गजनक्र जाण. 155 स २१-०नक्रा. 156 स २० मध्ये येथील सहा चरण असे-ऐसा हरी पतीतपावन । हे ब्रीद साच पैं त्याचे ॥३८॥ येकाजनार्दना सदन । पतीतपावन श्रीभगवान । उद्धारावया भक्तजन । पूर्ण ब्रह्माण्ड प्रकाशिले ॥३९॥ 157 स २१-भक्तजना. 158 स २१-पूर्ण ब्रह्म प्रकाशला. 159 स २०-चुकोन या; स २१-चुकउनिया. 160 स २० व स २१ मध्ये ही संपूर्ण ओवी नाही. 161 स २०-इति श्री गजेन्द्र आख्यान संपूर्णमस्तु ।; स २१-इति श्री गजेन्द्र आख्यान संपूर्ण ॥

/

३.६ गिरिदास

गिरिदास हा प्रस्तुत लघुकाव्याचा कर्ता आहे. ह्याच्या चरित्राविषयी व कालाविषयी कोणतीही माहिती मिळू शकत नाही. हा मध्ययुगातील संतपरंपरेचा पाईक दिसतो.

गिरिदासाने भागवती कथा संक्षेपाने पण तन्मयतेने सांगितली आहे. त्याने आपल्या स्वतंत्र कल्पनाशक्तीची चुणूक प्रस्तुत चाळीस ओव्यांच्या लहानशा काव्यातही अनेक ठिकाणी जाणवून दिली आहे. हत्तीच्या कळपाचा वनातील आडदांडपणा, मगराच्या विळख्याने गजेंद्राची झालेली दारुण अवस्था, त्याचा भक्तिभावपूर्ण धावा, निद्राधीन विष्णू, इन्द्रादी देवांची घबराट असे त्याने वर्णिलेले कथांश अल्पविस्तृत असले तरी वाचनीय उतरले आहेत. 'जेणे भवबंध तुटे । त्या नाम कवित्व ॥' हीच गिरिदासाची कवित्वविषयक भूमिका आहे. त्याचा पौराणिक कथांशी परिचय दिसतो. त्याला संस्कृतात गती असूनही त्याची मराठी भाषा मात्र शुद्धाशुद्धतेचा विधिनिषेध बाळगत नाही.

हस्तलिखिताच्या एकाच नकलेच्या आधारे खाली ह्या काव्याचा पाठ छापला आहे.

ओव्या

यैका ये अवस्वरी । गजराज चालिला वनामाझारी । समागमे कुंजर भारि । असंख्यात चालिले ॥ १ ॥ मदोन्मत्त माहा गज । उपडोनि टाकिति वृक्ष सहज । येकमेकमि घेति जुझ । मदोन्मत्त चालिले ॥२॥ जाता वनाभीतरी । उदके देखति सरोवरी । गजराज प्रवेशोनि उदकाभीतरी । जळ प्राशन करीता जाला ॥३॥ जळि देखोनि गजराज । मकरे धाविनला माहा विजे । पदी धरीला माहा गज । बहुत शक्ति करुनिया ॥ ४ ॥ पदि धरिता मकरे । दंत हाणितिले कठोरे । न सोडि तो मकरे । बहुत बळसि धरीले ॥५॥ पुछं आपटुनि पाठीवरी । बळे काढी पाये करी । न सोडितो मकरी । माहा बळि जळचरू ॥ ६ ॥ सकळ कुंजर जेते । मीळाले सरोवर भोवते । काहि येत्न न चले तेथे । वृथा किंकळी मारीती ॥७॥ ऐसे परी गज मकरे । करिति युध्ये आपार । दिवस लोटले फार । काहि यत्न न चले ॥८॥ गज क्षीण जाले बहुत । मकरे शो × × × । बळ जाउनियां बहुत । मकर गजा तव सोडि ।९। क्षीण जालि शक्ती बहुत । मग मस्ती की सुड टाकित । जाला नयन झाकीत । बहुत दिनवृत्ति ॥ १० ॥ मग ध्यान लाउनि येकचिति । स्मरता जाला श्रीवछमुर्ति । मदमोहन सावळमुर्ति । ध्याता जाला ते काळी ॥११॥ जयजयाजी कृपासिधु । जयजयाजी दीनबंधू । आनाथरक्षका तुं गोविंदु । हे वचन

सत्य करी ॥१२॥ जयजय जी रमाकांता । जयजय जी पूर्णानंदभरिता । दिन-रक्षका भगवंता । पावे स्वामीया ॥ १३ ॥ जयजयाजी वैकुंठवासा । जयजयाजी मुनिमानसहंसा । जयजयाजी भक्तपाशा । स्वामि मज पावे ॥ १४ ॥ जयजयाजी असुरान्तका । जयजयाजी सुरपालका । जयजयाजी दिनरक्षका । दिनबंधू ॥१५॥ प्रह्लादे गांजी पितीयानें । तो संकटी करीतसे चीतन । संकट वारूनि जाण । असुर दुर्घट मारीला ॥१६॥ ऐसा जो तो भक्त कैवारी । मज पावावे जि मुरारी । प्राण न साहे शरीरी । विकळ होतसे काया ।१७। ऐसा गजेंद्राचे करुणा × × × । आइकोनि जाणे सारंगधर । मुखा वरूनी काढी पीतांबर । तव मकरे गजेन्द्रा गांजीले देख ॥ १८ ॥ निद्रीस्त होता शेशावरी । रमा जाण पाय चुरी । नारदें तुंबर गायन करी । उभय भागी ॥ १९ ॥ हस्त जोडुनि खगराज । लक्षीत जाण पदपंकजे । आखंड चिंतित स्वामिकाज । चरण हस्तावरी पावया ॥२०॥ ऐसा तो देव सिह्यासनी । आसता वैकुंठभुवनी । गजराज गांजीला ऐकोनि । सिघ्रतेसि चालिला ॥२१॥ कोण्हासि न सांगता । गरूडावरी आरूढ न होता । भक्ताकारण बहुत त्वरीत । चरण चालिला लिला ॥२२॥ आश्चीर्य गमले सकळासि । गरूड धावे पाठिसि । इन्द्रादि देव भयाभितया नसि । काय प्रळय आरंभला ॥२३॥ इन्द्रादि देव केवळ । धावोनि × × × सकळ। अंजुळी करूनिया समोरे । विनटाव ते जाले ॥२४॥ काय संकट स्वामिया । कीवा श्रृष्टी होते लया । कां निज भक्तां गांजीलिया । धावण्या जातोसि ॥२५॥ ऐसे पाहा देव सकळ । भयाभीत होउनि केवळ । मार्गी उभे सकळ । दिनवृत्ति पाहाति ॥ २६ ॥ देखोनि देव भयाभित । यासि सांगो कार्य निश्चीत । रिळबळा राळिया (?) गजहु श्रांत । या लागी चक्र प्रेरीले ॥२७॥ चक्रधारा अति तिक्षण । मकरे छेदिला न लगता क्षण । गज जाला पावन । माहा ग्राहापासुनी ।२८। तव इन्द्रादि देवासि । म्हणे जातो भक्तरक्षणासि । मकरे गांजीले गजेन्द्रासि । ऐसे सांगोनि चालिला ।२९। तव गरूड पावला त्वरीत । चरणी ठेविला माथा । अरूड होवे भक्तनाथा । × × × × × × × × ।३०। मग अरूढला गरूडावरी । आर्धांगी शोभे रमा सुन्दरी । लक्ष्मीकांत मुरारी । गजेंद्रापासि उभा ठाके ॥ ३१ ॥ गजेन्द्रा नेत्र उघडुनि पाहात । तव पुढे देख लक्ष्मीकांत । जयजयकारे त्वरीत । मस्तक ठेवि चरणावरी ॥३२॥ गज चरणावरी लोळत । देव आभयकर मस्तकी ठेवित । म्हणे 'श्रमलासि रे बहुत । भक्तराया' ॥३३॥ गज म्हणे 'जी कृपानिधी । मि किंमात्र मंद कुबुधी । दुर्लभ इन्द्रादि देव विधी । तो मज लागी पावलासी ॥३४॥ धनधान्ये आजीचा दिवस । धन्ये धन्ये पुर्व संचीत आसे' । म्हणउनी मस्तक ठेवितसे । अनन्ये भावें ॥ ३५ ॥ मग गजात हरी आज्ञा देत । 'सुखी राहि तु निश्चीत' । गज रक्षुनीया जगनाथ । निजस्थाना

पावला ॥३६॥ ऐसे परी वनमाळी सदा भक्तार्ते सांभाळि । भक्त × × × × । × × पडोचि नेदि ।३७। आता धरूनि संता संग । अहिर्णिसि भजा श्रीरंग । हरीकथा निरोपण सांग । करा तुम्ही ॥ ३८ ॥ जो करी हरी चिंतन । तया प्राप्त वैकुंठ भुवन । तो जाला जन्म पावन । निश्चयेसी ॥३९॥ यैसा जाणोनिया सांग । मनी धरीला श्रीरंग । दुर्घट टाकीला जी योगे । निश्चयो गिरिदास म्हणे ॥४०॥

इति श्रीगजेंद्रमोक्ष संपूर्णमस्तु श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ [हृ० त ८]

३.७ गोविंद

प्रस्तुत काव्य गोविंद नामक कवीचे आहे. कवीने अन्तिम गद्यात स्वनामोल्लेख केलाच आहे. महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणीकारांनी एका गोविंद कवीचा उल्लेख केलेला आढळतो [मसा. पृ० ९५४-९५५]. तो व प्रस्तुतचा गोविंद कवी भिन्न की अभिन्न हे निश्चित करता येत नाही. ह्याने वापरलेले दोन-तीन शब्द तंजावर-कडील मराठी कोशांत आढळतात, त्यावरून हा त्या भागातील कवी असावा काय ?

संस्कृत भाषा व शुद्धकामदा वृत्त ह्या दोहोंवर कवीचे स्पृहणीय प्रभुत्व आहे. त्याला भाषेच्या नाद (sound) ह्या अंगाचा महिमा चांगला कळतो. हे काव्य वाचताना रसिक नकळत ठेका धरतो. कवीने पद्ये ४ ते २० मध्ये गजेन्द्राच्या धाव्याचे वर्णन करताना श्रीहरीसाठी जी संबोधने वापरली आहेत ती ईश्वराच्या विविध अवतारांतील पराक्रमाच्या कथासंदर्भांनी युक्त आहेत. त्यांवरून कवीचे पौराणिक कथाज्ञान जाणवते. पण त्याव्यतिरिक्त आख्यानक - काव्याचा कोणताही गुण प्रतीत होत नाही. त्यामुळे ह्या लघुकाव्याला 'गजेन्द्राचा धावा' म्हणणे योग्य ठरेल.

काव्याच्या हस्तलिखिताच्या एका नकलेच्या आधारे खालील पाठ छापला आहे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

स्वागता

येकदां गजबजी गजबाली । वित डुल्लत मदें मदशाली ॥
मस्तकीं भ्रमतसे भ्रमराली । दंत दंडितां विपक्षित गजाली ॥१॥

नीर - नीरचर - नीरजयोगें । रम्य दुर्गम सरोवरिं वेगें ॥
पावला गजपती जलरागें । ओढिला जलचरों पदसंगें ॥२॥

शुद्धकामदा

जलचरें जलीं ग्रासिला वळी । चमकली दुरी स्वजन-मंडळी ॥
वाद (?) गोखरी(?) वदतसे करी । दीनवत्सला पाव गा हरी ॥३॥

कामदा ?

नंदनंदना विश्वमंडळा । भक्ति धावण्या धांव गा हरी ॥
पतितपावना विश्वमोहना । असुरनाशना रक्षिलें हरी ॥४॥

शुद्धकामदा

स्वरित वेणुनें मोहितांगना । वज्र–विभूपणा सुन्दरा हरी ॥
कुमुदलोचना गोपिकामना । मुरलिमर्दना सावळ्या हरी ॥५॥

इन्द्र कोपला, वृष्टि वर्षला । शरण गोकुळा रक्षिलें हरी ॥
धरुनि करतला आच(?)लागला । त्वरित गोवळा पावगा हरी ॥६॥

असुरतक्षका भक्तरक्षका । मोक्षदायका यादवा हरी ॥
अमरनायका वेदगायका । मोक्षदायका पावगा हरी ॥७॥

तरणिवंशजा लक्ष्मणाग्रजा । भरतराज्यदा धांव गा हरी ॥
जनकजा-वरा कलित-मन्दिरा । इन्दिरावरा सुन्दरा हरी ॥८॥

मदनमन्दिरा इन्दिराधरा । विपधरामरा शंकरा हरी ॥
पीनकंधरा श्यामसुन्दरा । विद्याडंबरा यादवा हरी ॥९॥

अव्दमन्दिरा हलधरावरा । त्वरित ईश्वरा पावगा हरी ॥
रावणान्तका कुम्भनाशिका । वदन जानकी रक्षिलें हरी ॥१०॥

जनक-पुत्रिका शुद्धशोधिता । चाप-भंजिका व्यापका हरी ॥
रामराघवा पाव माधवा । कृष्णकेशवा पावगा हरी ॥११॥

दशरथात्मजा विचित्रभूभुजा । कौसल्यात्मजा नन्दना हरी ॥
ताड-खंडिका वालिमारका । वायुपुत्रका प्रेरिलें हरी ॥१२॥

श्वेतबिन्दुका वानराधिपा । त्वरित प्रेरिलें राक्षसांवरी ॥
बहुत पीडतो मेदिनीधवा । शिव शिवा शिवा पावगा हरी ॥१३॥

दृष्टियीधनें (?) भाविलीं मनें । पतिकन्यका जिंकिली बळें ॥
दृष्टशासनें केशबंधनें । धरुनि ओढितां देखिली जनें ॥१४॥

सदसभेवरी बैसले हरी । वदतसे करी परम सुन्दरी ॥
दृष्टि देउनी पति-मुखांवरी । पाप वर्तते ह्या सभेवरी ॥१५॥

वसनभूपणें भर्तृदूषणें । वदत फेडिली राष्ट्रनन्दनें ॥
गात्रकंपनें भ्रान्तलोचनें । स्वेदबिंदुनी व्यापिली सती ॥१६॥

बहुत पीडतो जलचराननीं । धांव पाव गा नरहरी हरी ।।
हर्ष कोंदला वदतसे करी । नमन घेइं गा धाव लौकरी ।।१७।।

क्षीरसागरीं फणिवरावरी । चरण सुन्दरी मर्दिले करी ।।
स्तुति-करी-स्वरीं ऊठिले हरी । खगवरावरी बैसले त्वरी ।।१८।।

जैंमि धेनु का वत्सवत्सला । तशि परी धावले निर्मला जलीं ।।
भुजग तुष्ट हा मेघ सावला । श्रवणि कुंडलें वसन पीवली ।।१९।।

मुकुट मस्तकीं कनक-सोज्वला । जलज लीलया घेउनी करीं ।।
त्वरित अर्पिलें हरिशिरावरी । धन्यधन्य म्यां देखिलें हरी ।।२०।।

व० ति० येक्या करें जलज देउनी तें मुरारी ।
सोंडा धरूनि उचली दुसऱ्या कराग्रीं ।।
नक्रें शि वक्त्र ताडी हरि चक्र मारी ।
तिसरें सुरवरांत बलांकारी (?) ।।२१।।

चौथें भुजाग्र फिरवी करिचे शरीरीं ।
वाचें वदे, 'गजवरा श्रमलास भारी ।।
ऐसा कृपा वरतिललहाभवारी (?) ।
गोविन्द ज्या विनवी मज देव तारी ।।२२।।

[ह० न ६]

३.८ पंडित सुरेंद्र

प्रस्तुत कवीने आपल्या नावाचा निर्देश पद्यांक २२ व ६२ ह्यांमध्ये केला आहे. परंतु हा कवी कोण, कोठला, केव्हा होऊन गेला, त्याने कोणकोणते ग्रंथ लिहिले आहेत, इत्यादीविषयी काहीच माहिती मिळत नाही. महाराष्ट्रसारस्वत-कारांनी एका पंडित कवीची चर्चा केलेली आहे [मसा. पृ. ३९२-९३]; त्या कवीला शब्दचमत्कृती अत्यंत प्रिय होती असे त्याचे वैशिष्ट्यह त्यांनी नमूद केले आहे. प्रस्तुत कवीच्या रचनेतही ते वैशिष्ट्य जाणवते. त्यावरून सारस्वतकारांनी वर्णिलेला पंडित व प्रस्तुतचा पंडित सुरेन्द्र हं दोन्ही एकच असावेत असे मानण्याकडे मनाचा कल होतो. तसे ते एकच असतील तर प्रस्तुतचा पंडित कवी शालिवाहनाच्या सतराव्या शतकातला ठरतो.

प्रस्तुतचे काव्य म्हणजे भागवती उपाख्यानाचे संक्षिप्त मराठी रूपान्तर होय. भक्तीचे मंडन करणे हेच कवीचे उद्दिष्ट आहे. कवीला आपण प्रबंधरूप काव्यरचना करीत असल्याची जाणीव आहे (पद्य २३) जरी त्याच्या ह्या प्रबंधरूप काव्याचा

मूळ आधार, वर म्हटल्याप्रमाणे, भागवती आख्यान असले तरी कवीने त्यात आनंदरामायणातील कथाविशेषांची भर घालून एक वेगळे रसायन बनविले आहे. कवीनें इन्द्रद्युम्नाच्या हकीकतीच्या निवेदनाने काव्यारंभ केला आहे, कवीचा इन्द्रद्युम्न त्रिकूटावरील सरोवराच्या काठी ध्यानस्थ बसतो; हूहू गंधर्वही तेथेच क्रीडार्थ येतो. त्याच वेळी तेथे अगस्त्य मुनी येतात. इन्द्रद्युम्न त्यांची उपेक्षा करतो आणि हूहू गंधर्व पाण्यात उतरून त्यांचे पाय धरतो. त्यामुळे ते दोघांना एकाच वेळी शाप देतात (प० ६-१६) मूळ कथेचा हा कायापालट कवीने आपल्या कल्पनेने घडवून आणला आहे. कवीने आपल्या कल्पनेबरोबरच आपली सहृदयताही, तहानेने व्याकुळ झालेल्या गजेंद्राच्या वर्णनात (प. २५-२७), व्यक्त केली आहे. संकटग्रस्त गजेंद्र जेव्हा आपल्या प्रियापुत्रांना मदतीसाठी पाचारतो (प० ३७) तेव्हा तो एखादा 'मनुष्य' वाटतो. गजेंद्राने केलेला विष्णूचा धावा (प० ४४-४८) संक्षिप्त असला तरी हृदयाला भिडणारा आहे. कवी अनेक वृत्ते वापरतो. पण भुजंगप्रयात, वसंततिलका व शार्दूलविक्रीडित ह्या वृत्तांतील त्याची रचना विशेषेकरून सफाईदार आहे. 'ळी' अक्षराची यमके व अनुप्रास त्याने अनेक पद्यांत (३४. ४०, ४३, ६२) साधले आहेत.

प्रस्तुत काव्याचा खाली छापलेला पाठ एका हस्तलिखितावर आधारलेला आहे.

॥ श्रीराम ॥

भु० प्र० जळीं पीडितां नक्र पूर्वीं गजेंद्रा।
करीनें हरी चिंतिला तो नरेंद्रा! ॥
त्वरें पावुनी त्यास उद्धार केला।
असा श्रीहरी भक्तिभावा भुकेला ॥१॥

व० ति० सर्वेंद्रियें नृपति बांधुनि नेमुनी ते।
प्रार्थूनियां नृप म्हणे स्वमनें मुनीतें ॥
'कैशापरी हरिनें उद्धरिला करी तो।
सांगें' म्हणोनि चरणा धरिला करीतो ॥२॥

मुनी म्हणे, 'नृपति तू जगिं धन्य मोठा।
त्वां बांधिल्या श्रवण-साधन धान्य-मोटा ॥
तत्त्वार्थ-संग्रह सुयोग्य दुकानिं घेसी।
उल्हासितोसि अणि वाङ्मधु कानिं घेसी' ॥३॥

शा० वि० "राया ऐक, परीक्षिति शुक म्हणे" तूं धन्य मोठा क्षितीं ।
केला प्रश्न परीक्षितीं सकळ ही जे लोक सापेक्षिती ।।
धर्मादी उपेक्षिती मुनि वरी ध्यानीं मनीं लक्षिती ।
ते मांगेन गजेंद्रमोक्ष तिसरा तूं आणि या दक्षिती ।।४।।

उपजाति. जे अंतरींचे रिपु सा वधोनी । बैसे त्रिशुद्धी नृप सावधोनी ।।
मुनीमुखी तो मन-कान देई । वक्ता शुकाचा मन का न देई।।५।।

शा० वि० इन्द्रद्युम्न म्हणोनि पांड्य नृपती विख्यात भूमंडळीं ।
होता धार्मिक सर्व कर्म यजुनी भक्तांचिया मंडळीं ।।
वैराग्यादि चतुष्टयासि वरुनी गेला त्रिकूटावरी ।
तेथें एक सरोवरा-तटि बसे ध्यानीं हरीतें वरी ।।६।।

आधीं वेधुनियां त्रिकूटशिखरी तो वाट काढी पुढें ।
संगे घेउनि भाव-भक्ति गुरुची तो चालिला सुदृढ ।।
जें जें दृश्य दिसे तयापरि हरी बारा आणि सोवळा ।
सत्रावीत सरितेंत स्नान करुनी झाला निजी सोवळा ।।७।।

पूर्णानंद-पदीं बसोनि समही शून्यावली भावना ।
केलें कारण कार्य सर्वही गुरूपायासी संभावना ।।
होतों बद्ध-स्वरूप मुक्त जाहलों हा आठवावा उगा ।
क्षीरीं क्षीर, जळीं जळ समरसे तैं राहिला तो उगा ।।८।।

व० ति० सरोवरीं जलचरें वसती अगम्य ।
पद्मावली वरि अली घुमती सुरम्य ।।
क्रीडावया जळि प्रिया-समवेत हूहू ।
गंधर्व येउनि तयांत म्हणेचि पोहूं ।।९।।

गंधर्व सर्वहि स्त्रियांसह क्रीडतांना ।
आले घटोद्भव सरोवरिं त्याचि स्थाना ।।
पांड्याधिभू स्वसुखि तत्पर उन्मनीच्या ।
अवमानिला म्हणुनि कोप मनीं मुनीच्या ।।१०।।

माध्यान्ह स्नान करुनी ऋषि अर्घ्य सोडी ।
गायत्रिचा जप जळांत उभाच जोडी ।।
गंधर्व त्या मुनिसि पाय धरूनि ओढी ।
कोपूनि शाप दिधला उभयासि होळी ।।११।।

शा० वि०

'साधू हेळण मांडिलें सुरगाणा तूं नक्र होसी जळीं ।
संतातें अवमानिलें नृपति तूं हस्तीच हो या स्थळीं ॥
राहे पर्वति याचि सर्व विहरे मस्ती तुला ते चढो ।
जीवा पीडुनि जीवनीं अनुदिनीं पापे तुला ते घडो' ॥१२॥

ऐकोनी मुनि-शाप तो उभयतां धाकें बहू कांपती ।
होऊनी अति हीन दीन वदनें बोलावया धांवती ॥
नाना स्तोत्र करूनि गद्‌गद् रवें पादांबुजीं लागती ।
'स्वामी दीन-दयाळ साधु सदया सांगा अम्हांला गती' ॥१३॥

साधूच्या हृदयासि येउनि दया तेव्हां कृपाळू मुनी ।
बोले त्यासि द्वयासि देत अभया उःशाप तो नेमुनी ॥
'प्रारब्धासि प्रयत्न कांहिं न चळे सर्वांसि हें तों कळे ।
आतां काळ कितेक श्रीहरि तुम्हां शापा करी मोकळे ॥१४॥

व० ति०

गंधर्व नक्र सरसांतली जीवनातें ।
नागेंद्र पर्वति करी उपजीवनातें ॥
काळांतरीं करिसि पीडिल नक्र पाणीं ।
तेव्हां गजेंद्र स्मरी, उद्धरी चक्रपाणी ॥१५॥

विज्ञापना करि पुन्हा नृपती मुनींद्रा ।
'कैशापरी स्मरण श्रीहरिच्या सुरेंद्रा ॥
मी हीन दीन भवलीन कृपा-समुद्रा ।
ते जाणवी भजन भाविक ज्ञानमुद्रा' ॥१६॥

शा० वि०

हूहू नक्र जळांत विक्रमपणें तो शक्रसा क्रीडतो ।
पाहे वक्र जिवासि चक्र दुसरा तो अक्रम पीडितो ॥
राजा मत्त करी समस्त शिखरीं कामास्तसा(?) पुंडतो ।
ज्याचा हस्त मृगेंद्र-मस्तकीं पडे तो स्वस्थ की हिंडतो ॥१७॥

इन्द्रवज्रा

झाला मदोन्मत्त महेंद्र दंती ।
त्या कांपती सर्व महेंद्र देती ॥
धाके मनीं तो बहु देवदंती ।
राया असो लोक वदे वदंती ॥१८॥

ओवी०

रूपें महोन्नत तो हस्ती । आंगीं चढली जया मदमस्ती ॥
विहरे /पर्वतीं समस्तीं । कुस्ती करित मृगासी ॥१९॥

सिंह शरभ ते शार्दूल । गंड भेरंड (?) निर्मूळ ॥
करुनि उडवी गगनीं धूळ । काळ मूळ होउनी ॥२०॥

वृक्ष उपडितां स्वसुंडीं । मद झिरपे ज्याच्या गंडीं ॥
पर्वत-कडे तो उल्लंडी । अति उद्दंडी पर्वतीं ॥२१॥

पांड्य देशींचा नरेंद्र । शापें झाला तो गजेंद्र ॥
पर्वत धरिला तो महेंद्र । पंडित सुरेंद्र म्हणताहे ॥२२॥

भु० प्र० पहा... गंडकीपासुनी क्षीर-सिंधू ।
महा थोर ऐसा त्रिकूटाद्रि सिंधू ॥
प्रिया-पुत्र-पौत्रादि घेऊनि बंधू ।
फिरे पर्वतीं हा जयाचा प्रबंधू ॥२३॥

व० ति० जाता असे करिवरासि कितेक काळ ।
आला अशांत एक वत्सरिं ग्रीष्म काळ ॥
संतप्त पर्वत समग्रहि सूर्यतापें ।
त्या जीवनास्तव गजेन्द्र फिरे प्रतापें ॥२४॥

भु० प्र० जळाभाव झाला तया गंडिकेतें ।
म्हणोनी त्यजी आपणा गंडकीतें ॥
× × × × ।
× × × × ॥

शा० वि० तान्हेजोनि गजेंद्र पर्वत दरे खोरे झरे हिंडतो ।
वापी कूप तडाग पील्लम रमहा(?) त्या जीवना धुंडितो ॥
कोठेही जलबिंदु-गंध न दिसे तृष्णा बहू लागली ।
नाना यत्न-प्रयत्न ते करुनिया तद्वृत्ती ते भागली ॥२५॥

इन्द्रवज्रा टाकूनि एक्या जग(त्) जीवनातें ।
कां कष्ट ते हे जगजीवना ते ॥
तरंग जैसे जगज्जीवनाते ।
ऐशापरी हे जगत्-जीव-नाते ॥२६॥

उ० जा० पुत्रबांधवांसह भटकतो ।
गिरिवरि तया बहुकुटुम्ब तो ॥
जीवनाविण बहु विटंबतो ।
देखिला पुढें जल-तुडंब तो ॥२७॥

व० ति०

सरोवरीं भरिव निर्मल जीवनाला ।
पाहोनिया करिवरा जिविं जीव आला ।।
जे शापिले मुनि अम्हांसि यया तटाकीं ।
तो नक्र शत्रु वसतो म्हणे श्वास टाकी ।।२८।।

पंचचामर

तटीं उभाच ठाकला जळांत तो उधातला(?) ।
करी स्वीकरी जळा परंतु जीव धाकला ।।
सुपुत्र जीवनासि या पाजवी स्वतः पहा ।
निवेचिना कशानेहि तनू तिला स्वतः पहा ।।२९।।
म्हणोनि मोह पातला विवेक तो निपातला ।
मनांत काम धातला विचारही विघातला ।।
कुवासनेन कातला, यकायकीं यकांतला ।
मधें, बहूत मातला, गजेन्द्र तो भ्रमातला ।।३०।।

शा० वि०

मोहांधीं पडला, तनूसि दडला, अहंकृती रूढला ।
सत्कर्मीं ढळला, भवाब्धि बुडला, योनीत तो मूढला ।।
भ्रांतीनें सडला, विवेक सुटला, संसार त्या वाढला ।
महत्त्वा चढला, विवेक उडला, तो चित्सुखा नाडला ।।३१।।

भु० प्र०

गजेन्द्रासि त्या मोह आला मनातें ।
त्वरें आपुल्या प्रेरिलें कामनातें ।।
तनू तापली पाहुनी जीवनातें ।
प्रियेसीं उडी घातली जीवनांत ।।३२।।

शिखरिणी

करी क्रीडे संगें प्रियकर प्रिया घेउनि करीं ।
करी नाना लीला सजळि अवलीलाच निकरी ।।
भरीं नीराच्या जो धरि वसतसे दुष्ट मकरी ।
त्वरें खोडी प्रौढी, गज धरुनि ओढी यम-करीं ।।३३।।

शा० वि०

तेव्हां नक्र जळीं गजेन्द्र कवळी, घेऊ म्हणोनी बळी ।
ओढी त्या कवळी, पदासि अबळी, चावूनि दंतावळीं ।।
हस्तीही स्वबळीं जळा खळबळी, जंतूसि त्या पाबळीं ।
आणायासि चळो बळी चूं चूं बळी हालेचना तो बळीं।।३४।।
ओढी तो मकरी जळांत निकरीं पायीं धरूनी करी ।
झोंबूनीचि करीतनूसि उकरी, तो फार पीडा करी ।।

तोही मत्त अहंकरी छडकरी नक्रापुढें हुं करी ।
चालेना बळ-धी करी किरि-किरी तेव्हां प्रिया हाकरी॥३५॥

व० ति० पाहूनिया करिवरासि अशी अवस्था ।
सोडोनिया पति जळांत प्रिया समस्ता ॥
येऊनिया तटभुवीं रुदती करुण्या ।
'आम्हांसि काय गति सांग करी वरेण्या' ॥३६॥

इन्द्रवज्रा ओढी गळां घालुनि काळ पाश ।
बंधू-जनीं मोह सुकाळ पाश ॥
प्राण्यासि जे संकट त्या नरेन्द्रा ।
तैशापरी दुःख तया गजेन्द्रा ॥३७॥

भु० प्र० 'प्रिया पुत्र हो काय आतां पहातां ।
जळीं येउनी द्या मला शीघ्र हाता ॥
मला ओढुनी सर्व बाहेर काढा ।
बळें पीडितो नक्र हा काळ-दाढां' ॥३८॥

व० ति० बोले प्रियांसि जंव यापरि नागराणा ।
गेले (गेल्या ?) त्यजूनि पति-आस समस्त राणा (राण्या?) ॥
ते धांवती स्वजन त्या पथि वेगळाले ।
तें पाहुनी करिसि धैर्यधृती गळाले ॥३९॥

शा० वि० हत्ती-नक्र-कळीं जळांतुन कळी ते खुंटली मोकळी ।
बारा सूर्यकळी जसा कळकळी ब्रह्मांडिच्या पोकळीं ॥
पाहूनी सकळी जनांत विकळी झाले जयाच्या किळी ।
तेव्हां हस्तिकुलेंद्र फोडि डकळीं आक्रंदुनी किंकळी ॥४०॥

मस्ती त्या हरली समस्त विषयीं नेमस्ति तो राहिला ।
हस्ती नाम वृथा बृहस्विति(?)त्वचा अस्थीशी त्या वाहिल्या(?)
वस्ती ज्यासि जळीं अवसरे नृपावस्तीस त्या साहिला(?) ।
कुस्ती नक्र करीत गस्ति(?)फिरता अगस्ती मुनी ध्याइला॥४१॥

पाणी त्या बुडवी, तनूसि सडवी, हातें तया ओढवी ।
मोहातें अडवी, स्त्रिया त्रिघडवी, कामादिकां जोडवी ॥
भ्रांतीतें घडवी, विवेक उडवी, दुःखासि त्या वाढवी ।
संसारीं पडवी, गुम्स दृढवी(?) त्या श्रीहरी सोडवी ॥४२॥

ऐसा युद्धजळी प्रसिद्ध उजळी हा हा शताब्दावळी ।
होता ते प्रबळी गजेन्द्र सबळी होऊनिया निर्बळी ।।
झाले देह गळीत वृत्ति विगळी त्या बुद्धि हे वेगळी ।
तेव्हां पुण्यफळीत मूर्ति हरिची ते चिंतिली सावळी ।।४३।।

भक्तोद्धारक भक्तवत्सल हरी भक्ताभिमानी बरा ।
भक्ताभीष्ट फलप्रदा भवनिधी भक्तासि तारू खरा ।।
होसी तूं मज सोडवी सुदृढई पायों तुझ्या साक्षिणी ।
स्वामी दीन दयापरा मुरहरा पाहे कृपावीक्षिणीं ।।४४।।

दीनानाथ जरी दयार्णव हरी वेदीं तुझी वैखरी ।
धांवे पावुनि सोडवी झडकरी ते गोष्टी तेव्हां खरी ।।
जाणूनी निज अंतरीं नरहरी योजोनि सा लक्षणी ।
स्वामी दीन दयापरा मुरहरा पाहे कृपावीक्षणीं ।।४५।।

दैन्या हार कधीं न रक्षक असे तूझें मला नांव दे ।
वाहे नीट जिभेवरी मग दुजे काळत्रयीं नांव दे ।।
ऐसें नाम प्रतापकारक पुरी भक्तासि संरक्षणीं ।
स्वामी दीन दयापरा मुरहरा पाहे कृपावीक्षणीं ।।४६।।

आपद्बांधव आदिमूल अगुणा आनंदकारी हरी ।
आतां अंत न पाहि शीघ्र अनघा आर्तासि माझ्या हरी।।
आली नाहि दया हरी त्वद्हृदया आश्चर्य येत क्षणीं ।
स्वामी दीन दयापरा मुरहरा पाहे कृपावीक्षणीं ।।४७।।

तूं सर्वेश्वर सर्वकारण जगीं सर्वात्मता वाहसी ।
हे सर्वज्ञ सनातना मज हरी सोडून कां पाहसी ? ।।
सर्वाधार सुधारधार (?) धरुनी होंऊ नको साक्षिणी ।
स्वामी दीन दयापरा मुरहरा पाहे कृपावीक्षणीं ।।४८।।

ऐसा हा करितां गजेन्द्र वरदाभक्तांतरींचा सखा ।
धांवे पाहुनि श्रीहरी करिवरा त्या दीधलें चित्सुखा ।।
भृंगीनें डसतांचि बाळक रुदे धांवे त्वरें माउली ।
ऐसा नक्र करीन्द्र उद्धरुनि त्या आत्मोंच मामावली ।।४९।।

व० ति० तेव्हां पुन्हा नृप म्हणे, 'मुनि दीनबंधू ।
हे तोषिता श्रुतिचकोर प्रबोध-इन्दू ।।

कैश्यापरी हरि करी मकरीस ऐक्य ।
केलें, कथा मधुर सांग मला सुवाक्य ॥५०॥

मालिनी
सदय मुनि वदे बा पूर्ण बोधाब्धिसोमा ।
तव वचन कर उल्हासिले या हृदोमा ॥
जनम सफळ केला जन्मुनी त्या नृपार्या ।
दृढ धरि कथितों जे जे हरीची सुचर्या' ॥५१॥

पंचचामर
हरी करीस पावला, करी धरी सुपाउला ।
गिरीधरू कृपावला त्वरें बरी उपावला ॥
गजेन्द्र नक्र ओढितो पराक्रमी महाबळी ।
तयासि वक्रता हरिनें चक्र प्रेरिलें तळीं ॥५२॥

व० ति०
आणि सुदर्शन क्षणीं गज नक्र भूमी ।
संतोषला हरि मनांत जगद्विभो मी ॥
त्या सोडवी करिवरासि स्वयंभु केला ।
देऊनि त्या स्वरुपतेसि स्वयं भुकेला ॥५३॥

घेऊनि त्यासि हरि चालियला स्वलोका ।
आनंदाच्या परम सर्वही विश्वलोका ॥
तेंव्हां म्हणे मकरी देव अपक्षपाती ।
म्यां देखिलें हरि तुला अजि पक्षपाती ॥५४॥

शालिनी
शापग्रस्ती जाण हे मी करी रे ।
त्यांत तूझे मुक्त नामी करीरे ॥
त्या रूपाचा न विता हा प्रताप ।
पाहूनीया जाईना क्षिप्र ताप ॥५५॥

शा० वि०
ऐसे तो सुमरी बिवेक पसरी आज्ञेचिया ओसरी ।
बैसोनी घसरी हरीसि कुसरी बोले श्रुती ती सुरी ॥
सर्वी मीच सरी समान न सरी एकात्म मी केशरी ।
ते झाले विसरी हरी संवसरी हे बुद्धि कां दूसरी ॥५६॥

इन्द्रवज्रा
जें चिंतितां नाम, स्वरूप देसी ।
तें पाहतां रूप, विरूप देसी ॥
हे वंचना कां हरि देवराया ।
हे कष्ट माझे हरि देवराया ॥५७॥

ननु प्रसन्ना हासक्त देव नाथा ।
बोले असा तो जंव नक्र पाणीं ।।
संतोषला तो मनि चक्रपाणी ।
× × × × ।।५८।।

त्या देउनी शीघ्र स्वरूप मुक्ती ।
केली हरीनें उभया विमुक्ती
× × × ।।५९।।

व० ति० ऐशापरी सफळ सांग गजेन्द्रमोक्षा ।
सांगीतलें तुज परीक्षिति ते मुमुक्षा ।।
हें ऐकती हृदयिं बांधुनि जे अपेक्षा ।
देईल श्रीहरि अधिकची त्यां त्याजपेक्षां ।।६०।।

वृत्त ? ऐसी मुनीसी हरिनाम-सुधारसाची ।
होऊनिया अमर-आत्म सुखावला हो ।।
श्रोते तसे आत्मसुखास लाहो ।
ते सोडली नृप श्रुतीत सुधारला(?) हो ।।६१।।

शा० वि० श्रीमद्भागवती कथा शुभवती नागेन्द्र-मोक्ष-स्थिती ।
सांगे सांग परीक्षितीस शुक ते भावेंचि जे ऐकती ।।
दुष्कर्में पळती, अरिष्ट टळती, भाग्यें महा घोळती ।
धर्मार्थी फळती, सुखी उफळती त्या लाभ दे पंडिनी ।।६२।।

।। इति श्रीगजेंद्रमोक्ष ।। [ह० स १२]

३.९ माधव

प्रस्तुत कवीनें स्वनामोल्लेख पद्यांक ९, ३३ व ४३ मध्ये केला आहे. परंतु हा माधव कोण, कोठला, केव्हा होऊन गेला, त्याने आणखी कोणकोणते ग्रंथ लिहिले इत्यादी बाबींविषयी माहिती मिळ् शकत नाही. भुजंगप्रयात वृत्तावर कवीची असलेली विशेष भक्ती, 'भक्तीची आवडी' व काही 'रामदासी' शब्दप्रयोग ह्यांवरून हा दासानुयायी असावा; तसेच अहाच, धावण्या, हारी इत्यादी शब्द-प्रयोगांवरून तो दक्षिणेकडील असावा, असे अनुमान होते.

हे काव्य अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. एखादे सुपरिचित व मर्यादित विस्ताराचे कथानक चटकदार कसे करावे त्याचा, हे काव्य म्हणजे, एक वस्तुपाठच आहे. पद्यांक नऊ ते अकरा मध्ये गजेंद्राने स्वतःची निखंदना करून मायामोहाचे वैयर्थ्य प्रकट केले आहे. ते विचारी व्यक्तीला अन्तर्मुख बनविणारे आहे. गजेंद्र भगवंताचे स्मरण व पराक्रमवर्णन करताना (पद्ये १२-२५) भगवंताला परखड शब्दांत लोकव्यवहारही ऐकवतो. त्याला कृष्ण ही आपली मायबहीण वाटते (पद्य २३). कवीचा मगरही परमेश्वराशी सडेतोडपणे युक्तिवाद करतो (पद्य ३६). इतकेच नव्हे तर त्याला रेशमी चिमटा घ्यावयासही मागेपुढे पाहात नाही (पद्य ३७). ह्या तरल शलाकेने मगराचे व्यक्तिदर्शन उजळून निघाले आहे. प्रस्तुत कवी, स्वतःच्या कवित्वाचे उपबृंहण व्हावे म्हणून दुसऱ्याची रचना उद्धृत करतो (पद्य ३९). हे त्याचे नजरेत भरणारे वैशिष्ट्य आहे. कवी वृत्तांचा बदल काव्यगत पात्राच्या भावनेच्या बदलाला पोषक व समान्तर असाच करतो (पद्य २७). ह्या काव्यात क्वचित छंदोभंग जाणवला (पद्यांक २८, ३०-३३) तरी कवीचे भाषेवर व वृत्तावर उत्तम प्रभुत्व असल्याचीच एकंदरीने प्रतीती येते (पद्ये १०-१२, २७, ३५-३८, ४० व ४३). कवीची भाषा सताल व ठसकेबाज आहे. एवंगुणविशिष्ट प्रस्तुत काव्याची पहिली आठ पद्ये उपलब्ध होऊ शकत नाहीत, ह्याची रसिकाला चुटपूट लागून राहते.

ह्या काव्याच्या हस्तलिखिताच्या एकाच प्रतिलिपीच्या आधारे खालील पाठ छापला आहे.

पद जैं मी होतों सुखावासी । तैं हे होते मजपासीं । अंतीं सोडुनि गेले परदेशी ॥१॥ मी येकलाची ॥ ध्रु० ॥

माझे सुत माझी दारा । म्हणउनि भुललों संसारा । अंतीं न पडे कोण्हाचा वारा ॥२॥ मी येकलाची ॥ ध्रु० ॥

माधव स्वामीविण पाहीं । मज तो न दिसे अणु कांहीं । शेवट कोण्ही कोणाचे नाहीं ॥३॥ मी येकलाची ॥ ध्रु ॥ ९ ॥

भु० प्र० समस्तांसि म्यां पाजिलें जीवनासी । मला सोडुनी सर्व गेले वनासी ॥
म्हणे या परीचा स्वभावो जनाचा । करावा बरा संग साधू-जनांचा ।१०॥

त्यजी पामरा अंतरीं कामनेसी । धरी सार तूं येक आतां मनेंसी ॥
तुझे पाहतां कोण आहे निदानीं । भजे आवडीं नित्य कैवल्यदानी ॥११॥

शा० वि० देहाची ममता त्यजूनि गज तो भावें स्मरे श्रीहरी।
नाहीं सोडविता तयाविण दुजा, जो या भवातें हरी॥
बोले लावुनि नेत्र काय मग तो पावें जगत्पाळका।
कृष्णा यादव माधवा निज-सुखा देई तुझ्या बाळका॥१२॥

कामदा थोर नक्र हा पीडितो हरी। येउनी त्वरें दीनता हरी॥
विश्वव्यापका भक्त-तारका। × × × × × × ॥१३॥
वेद शीणले पार नेणवे। पामरा मनीं केविं जाणवे॥
घोर संसृती-भीति-वारका। पाव माधवा सौख्यकारका॥१४॥
दीनबंधु हें बिरुद साच रे। जाहलें दिसे तें अहाच रे॥
साधुपाळका दुष्टमारका। पाव माधवा सौख्यकारका॥१५॥

स्तोत्र कृष्ण केशव अच्युता हरि यादवा मधुसूदना।
श्रीधरा पुरुषोत्तमा वसुदेव—देवकि—नंदना॥१६॥
मच्छ कूर्म वराह नरहरि वामना भृगुनंदना।
जानकीवर राम यदुपति केशिदैत्य—निकंदना॥१७॥

भु० प्र० अगा बौद्धरूपा अनन्ता अरूपा। प्रभो कल्किरूपा अमूपात्मरूपा।
निजानन्द-आनन्दकन्दा मुरारी। तुतें देखतां काळ पोटीं थरारी॥१८॥

पद द्रौपदी बहिणूली अपुली सभेसि आणिली।
नग्न करितां धांवत येउनि वस्त्रें पुरविलीं॥१॥
तैसा मज पावें धांवत धांवत माधवा।
सत्वरि येउनि उद्धरीं रे मजला जड जीवा॥२॥
छळिता पिता प्रल्हादानें तुजला आठविलें।
स्तंभीं प्रकटुनि वधुनी असुरा सुख भक्ता दिधलें॥३॥
दुष्ट नक्र हा आक्रमिता हे सतनुप्राणांतें।
माधव दासा रक्ष पक्षिणी जेंवि अंडजातें॥४॥१९॥

रथोद्धता आरडूनि बहू कंठ शोषला। काळजी—श्रम विशेष वाकला॥
जी पशूप्रति निदान मांडिलें। कीं पतीत म्हणवोनि सांडिलें॥२०॥

इन्द्रवज्रा कोण्ही नसे दुःख-निवारणाला। पावें त्वरें गा मज वारणाला॥
म्यां आळवीलें बहु किंकरानें। तूं येउनी सोडविं कीं करानें॥२१॥

ओवी

ऐसी नाना प्रकारीं । गजेंद्र प्रेमें स्तुती करी ॥
म्हणे पावगा श्रीहरी । विलंब न करी धावण्या ॥२२॥

अवो कृष्णे मायबहिणी । मानस-वृन्दावन-विहारिणी ॥
वैकुंठपुरवासिनी । पावें निदानीं स्नेहाळे ॥२३॥

दुर्बळ जाणे नृपासि । भूप न जाणे अल्पासि ॥
हें उचित असे सर्वांसि । तुज सर्वज्ञासि अनुचित ॥२४॥

जनीं मायबापें वेगळीं । येक कोपे, दुजे सांभाळी ॥
तूंचि माता आणि माउली । काय बोली फार करूं ॥२५॥

गजेंद्र करुणाजनकाचा । नाद कर्णीं श्रीहरीच्या ॥
झगटताचि पैं साचा । उठिला भक्ताचा कनवाळू ॥२६॥

मालिनी

लगबग बहु झाली देवराया दयाळा ।
गरुड-गमन तेव्हां नाठवेची मवाळा ॥
मनपवनहि पक्षी टाकुनीयां निघाला ।
सकरुण जगदात्मा तांतडीनें निघाला ॥२७॥

भु० प्र०

झणी प्राण सोडील चिंता हरीला ।
दुरोनी म्हणे नाभि नाभी करीला ॥
गजेंद्रें देखिला नाथ लोकत्रयाचा ।
सुखें लोटलें बाष्प नेत्रीं तयाच्या ॥२८॥

समर्पावया पाहिलें जों अजाला ।
अकस्मात तैं देखिलें पंकजाला ॥
उभारूनि शुंडा शिरीं वाहियेलें ।
मुकुंदें दयाळें कृपें पाहियेलें ॥२९॥

दिंडी

गरुड सोडुनियां धांवला सिपाई । दीनबंधू उत्तीर्ण होउं काई ॥
जिणें मरणें नाठवे मला पाहीं । काय सांगूं सौख्यासि पार नाहीं ॥३०॥

देवदेवा केशवा श्रीमुरारी । नामस्मरणें नासती पापहारी ॥
निज दासाचा पूर्ण साह्यकारी । सर्वव्यापक तूं येक चराचरीं ॥३१॥

नित्यानंदा निर्गुणा निर्विकारा । निर्विकल्पा निःसंग निर्व्यापारा ॥
आला गेलासी भक्त-भावना हे । ज्ञानी म्हणती येथेंचि पूर्ण आहे ॥३२॥

येणें जाणें तुज नसे नारायणा । दास माधव अनुभवी गुरुखूणा ॥
× × × × । × × × × ॥३३॥

सवाई स्तोत्र करीत गजेंद्र जळीं, मधुसूदन तो अतिसन्निध आला ।
घालुनियां करपंकज तें द्वय वोढित, बाहिर नेइं गजाला ॥
सोडवितां न सुटे, मग हाणुनि चक्र, विदारुनि नक्र-मुखाला ।
काढियला गज मानसिं लज्जित देखुनि नक्र विस्मित जाला ॥३४॥

मालिनी अतिचपल विमानीं बैसवीले नृपाला ।
तंव झडकरी नक्रें हास्य केलें कृपाळा ॥
मग हरि पुसताहे 'काय गा हांसतोमी ।
विसरुनि निजदुःखा तोष कां मानितोसि' ॥३५॥

भु० प्र० नसे चाड कां पूससी माधवा रे । खुषी आमुची जाय तूं येथवां रे ॥
तऱ्ही सांग ऐसें पुन्हां बोलियेलें । म्हणे थोर आश्चर्य म्यां देखियेलें ॥३६॥

शा० वि० नामाच्या स्मरणेंचि तूं झडकरी पावोनि त्या तारिसी ।
दृष्टीनें अवलोकिल्यावरि कसा मातें बळें मारिसी ॥
चक्रें वक्त्र विदारिलें अतिशयें तें दुःख नाहींच जी ।
जालें दर्शन व्यर्थ जाय म्हणुनी आश्चर्य हृत्पंकजीं' ॥३७॥

ऐसें ऐकुनियां तयावरि बहू संतोषला (तो) हरी ।
भक्ताचा कनवाळ तो भवभयापासूनि त्या उद्धरी ॥
प्रीतीनें गजराज-नक्र उभयां घाली विमानांतरीं ।
जाली भेटि परस्परें निज-सखे ते बोलती उत्तरीं ॥३८॥

अभंग* अहो अग्नीमाजी गेलें । तें तें अग्नी होऊनि ठेलें ॥१॥
काय उरलें आपण । मागील तें नामगुण ॥२॥
लोह लागे परिसा-अंगीं । तेंही भूषण होय जगीं ॥३॥
अहो सरिता ओहळ वोघ । गंगे मिळतां गंगा मग ॥४॥
अहो चंदनाच्या वासें । अन्य तरूही होती तैसे ॥५॥
तुका ठेला संतपायीं । दुजेपणा ठावा नाहीं ॥६॥३९॥

शा० वि० गंधर्वासि म्हणे गजेन्द्र भगवत्प्राप्ती तुझेनी मला ।
संसारार्णव दुःख-शोक समुळीं गेला लयातें भला ॥
तो बोले अवघा प्रसादही तुझा हे तत्त्वता जाणिजे ।
पूर्ण ब्रह्म तुझेनि प्राप्त मजला चित्तीं दुजें नाणिजे ॥४०॥

मालिनी तंव खगपति आला (फार) लज्जीत जाला ।
सकळ श्रम निमाला देखतांची अजाला ॥
मुदुवचन हरीला काय बोले दयाळा ।
त्रिभुवन-प्रतिपाळा दाविली धन्य लीळा ॥४१॥

स्वागता वैनतेय करितां स्तवनासी । ते क्षणींच अपुल्या भवनासी ॥
माधवेश उभयतांसि विमानीं । नेत घालुनि महासुखस्थानीं ॥४२॥

शा० वि० भक्तीचेनि सुखें सुखाउनि हरी नेलें तयां तत्पदा ।
मोक्षाची पदवी सदा अनुभवी दैवी दिल्ही संपदा ॥
होईं सावध माधवीं परिहरी संसारिची आपदा ।
जेणें उद्धरिला गजेंद्र भज तूं त्या श्रीहरीच्या पदा ॥४३॥

॥ संपूर्णमस्तु ॥ [हस्तलिखित स. १५]

* तुळा—

"३४४. अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तें च ठेलें ॥१॥ ध्रु०॥ काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ॥२॥ लोह लागे परिसा अंगीं । तो ही भूषण जाला जगीं ॥३॥ सरिता ओहळा ओघा । गंगे मिळोनि जाल्या गंगा ॥४॥ चंदनाच्या वासें । तरु चंदन जाले स्पर्शें ॥५॥ तुका जडला मंतां पायीं । दुजेपण ठाव नाहीं ॥६॥" [तुगा पृ. ६७६]

३.१० कविनाम ?

प्रस्तुत काव्य अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. पहिली गोष्ट अशी की, हे काव्य नेमके कोणाचे हे ठरविणे अवघड होऊन बसले आहे. कारण ह्यात दास हा नामनिर्देश दोनदा (पद्यांक १ व ८) व ज्ञानदेव हा नामोल्लेख एकदा (पद्यांक १४) आला असून तुकाराम ही नाममुद्रा चार वेळा (पद्यांक १५, २१, २३ आणि ३५) आली आहे. परंतु, हे काव्य ह्या तिघांपैकी कोणाही एकट्याचे नाही. हे, जो कोणी मूळ कवी असेल त्या मूळ कवीचे आणि वरील तिघा प्रसिद्ध कवींचे असे सर्वांचे मिळून आहे. हे काव्य उसनवारीनेच सिद्ध झाले आहे, हे खालील तपशिलावरून लक्षात येईल :—

ह्यातील ओवी क्र. २ = ह० स १८ मधील ओवी क्र. १२४
,, ,, ,, ३ व ४ = ,, ,, ,, ,, १३०-१३१
,, ,, ,, ७ = ,, ,, ,, १४०
,, ,, ,, ९-१३ = ,, ,, ,, १४१-१४४

,,	,,	,, १६–२० =	,,	,,	,	१४५–१४९
,,	,,	,, २२ =	,,	,,	,	१५०
,,	,,	,, २४–३० =	,,	,,	,	१५१–१५७
,,	,,	,, ३१–३२ =	,,	,,	,	१६५–१६६

,, अभंग 'आपुलिया काजा'–इ. (पद्यांक १५) = तुगा. क्र. ३१५०पृ. ६१५

,, ,, 'तुजला म्हणती'–इ० (,, २१) = ,, क्र. ३१४ पृ.८८-८९

,, 'उपेक्षिलें येणें कोण्ही'–इ.(,, २३) = ,, क्र. ३१५५पृ,६१६

,, अभंग 'मज अभयदान'–इ. (,, ३५) = ,, क्र. ५३०पृ० १३०

उपर्युल्लिखित इतर कवींच्या रचना बाद केल्यावर मूळ कवीच्या स्वतःच्या रचना शिल्लक राहातात त्या इतक्याच–तीन पदे (पद्यांक १, ५, ८) व ओव्या ६, ३३ व ३४. ह्यावरून प्रस्तुत कवी जवळजवळ परोपजीवी आहे, असे म्हणता येते. मात्र इतरांच्या पद्यांचे अपहरण करण्यात कवीने कौतुकास्पद कौशल्य दाखविले आहे. त्याने इतर कवींची समुचित अर्थाची पद्ये निवडली असून ती यथायोग्य स्थळी आपल्या काव्यात योजिली आहेत. त्यामुळे त्याच्या स्वतःच्या व इतरांच्या रचना यांचा सांधा बेमालूमपणे जोडला गेला आहे. त्याच्या स्वतःच्यां ओव्या उपजीव्य कवीच्या ओव्यांसारख्याच तंतोतंत आहेत. त्याची स्वरचित तिन्ही पदे प्रवाही, प्रसन्न व प्रांजळ आहेत. एकंदरीने हा 'मिश्र' काव्याचा एक वेगळाच नमुना आहे. एखाद्या हरिदासाने कीर्तनाला उपयोगी पडावी म्हणून तर ही मिश्र रचना केलेली नसेल ना ?

प्रस्तुत काव्याच्या हस्तलिखिताच्या एका नकलेच्या आधारे खालील पाठ छापला आहे.

पद — शरण तुज रे रघुवीरा । गुणगंभीरा । धन्य धन्य रे दातारा । कृपाळु खरा ।। ध्रु० ।। जन्म-दुःख मांगतां न ये । सांगु मी काये । दुरी करूनी अपाये । केले उपाये ।।१।। बाळपणापासुनी वेडें । तुज सांकडें । सांगावें कवणापुढें । जाहलें येवढें ।।२।। जीवींचें मनींचें पुरवीलें । गोमटें केलें । सर्व साहोनियां नेलें । नाहीं पाहिलें ।। ३ ।। देवा तूं रे त्रैलोक्यनाथ । मी रे अनाथ । मज करूनी सनाथ । केलें समर्थ ।। ४ ।। दास म्हणे तुझ्या अन्नाचा । वाढलों साचा । मज हा संसार कैंचा । सर्व देवाचा ।।५।।१।।

ओवी — अनंतकाळीचा सोयरा । एक श्रीहरीच खरा । ऐसें मानलें गजेन्द्रा । सह पुत्र-दारा-त्यागें ।।२।।

पद वीसरगेनीयां तुज राघवा । रिक्तपाणिर्न पश्येत् राजानं देवतां गुरुम् ।१।

ओवी अपविया हरी जवळी । कांहीं नाहीं हातातळीं । शोधीतां सरोवरजळीं । कमळ तेकाळी सांपडलें ।।३।। शुंडादंडीं कमळ-प्राप्ती । उल्हास गजेन्द्राचे चित्तीं । आक्रोशें स्मराया रघुपती । वीकळ गती वाचेसी ।।४।।

पद येंरे येंरे राघोबा माझ्या ।।ध्रु।। त्रिविध ताप शमन चापबाणपाणी । त्रिविध पापदमन आम-सौख्य-खाणी । स्तवीति बाप (बाप)देव दीव्य वाणी रे ।। जल नयन जलधिशरण जलजैकरुचिर ।। जयजय राघोबा माझ्या ।।५।।

औवी धांव पाव गा लक्ष्मीकान्ता । स्मरान्तका हृदय-विश्रामदा ।।
कमलोद्भवजनका जगत्‌त्राता । भवभयमोचका चक्रपाणी ।।६।।
ऐकतां गजेन्द्र-आर्तवचन । स्वयें गरुडासन सांडून ।
सरोवरीं उडी घालून । आला भगवान् कृपाळू ।।७।।

वद आठवे मनीं आठवे मनीं आठवे मनीं सदा राम चिंतनीं ।।ध्रु०।।
मुगुट किरिटी । वक्र भ्रुकुटी । रम्य गोमटीं । नयनांबुजें ।।१।।
मकरकुंडलें । ठाण-दंडलें । तेज खंडलें । मेघदामिनी ।।२।।
बाणली उठी । काम गोमटी । किंकिणी कटी । क्षुद्र घंटिका ।।३।।
पदक मेखळा । फांकती किला । रुळती गळां । मुक्तमाळिका।।४।।
ते सुलक्षणें । रत्नभूषणें । वीरकंकणें । शोभती करीं ।।५।।
रम्य रंगलें । चाप चांगलें । सैन्य भंगलें । श्रीकूटाचळीं ।।६।।
णंदुनें ? पुरे । वांकी गजरें । तें मनोहरें । पाडलें बरीं ।।७।।
हृदयकमळीं । मूर्ती सांवळी । दास न्याहळी । कुळदैवता ।।८।।

ओवी. चक्रें हाणोनिया नक्र । साचें फोडिलें वक्त्र । मगरमीठी अति दुस्तर । नक्र गजेन्द्र सोडीना ।।९।। लागतां श्रीहरीचें चक्र । रुधिरें नाहणीला नक्र । तऱ्हीं न सोडी गजेन्द्र । दृढ वैर द्विज-शापें ।।१०।।

बाप कृपाळू भगवंत । दोहीं तळीं घालुनी हात । जळाबाहेरी अकस्मात । काढीला त्वरीत भगवंतें ।।११।। लागतां भगवंताचा हात । दोघेजण अती अद्‌भुत । तेही शापोन्मुक्त । भाग्यवंत सभाग्य ।।१३।।

अभंग देव करी तरी काय येक नोव्हे । दगडाची नांव तरीजेली ॥१॥
फुटतील पाय चालतील भिंती । मेरु-मत्स्यक येती समतुका ॥२॥
रविकिरणावरी मुंगिया विहरी । अग्नीचे पठारीं पीक होये ॥३॥
ज्ञानदेव म्हणे अघटित घडे । गुरुकृपें जोडे परब्रह्म ॥४॥१४॥
[१]आपुलीया काजा । धांवे भक्ताचीया काजा ॥१॥
नाम धरीलें दीनानाथ । सत्य करावया वृत्त ॥२॥
घात-आघात निवारी । छाया पीतांबरें करी ॥३॥
उभा कर कटीं । तुका म्हणे याचसाठीं ॥४॥१५॥

ओवी विमानीं देखती सुरवर । भूतळीं देखती ऋषीश्वर । गगनीं देखती खेचर । नक्र-गजेंद्र उद्धारण ॥ १६ ॥ भगवंतें कृपा करून । दोघे बाहेर आणून । गजेंद्र विमानीं घालून । श्रीभगवान निघाला ॥१७॥ जातां देखोनी भगवंतु । नक्र गदगदां हंसतु । त्यासी श्रीहरी पुसतु । हास्य किमर्थ तुज आलें ॥ १८ ॥ सर्व भूतीं हरी समान । गर्जे(त) वेदशास्त्रें पुराणें । त्या तुजपाशीं विषमपण । आजी संपूर्ण देखिलें ॥१९॥ उद्धरीले गजेंद्रातें । मज उपेक्षीलें कां येथें । याची देखोनी विषमातें । अति आद्भुतें हसीलों ॥२०॥

अभंग [२]तुजला म्हणती कृपेचा सागर । तरी कां अव्हेर केला माझा ॥१॥
अझुनी कां न ये माझी तुज दया । काय देवराया पाहतोसी ॥२॥
आळवीतां जैसें पाडस कुरंगिणी । पीडलों ये वनीं तहानभुकें ॥३॥
प्रेमरस पान्हा पाजी माझे आई । वेगीं ये वेगीं ये वोसरोनी ॥४॥
तुका म्हणे माझें कोण हरे दुःख । तुजवीण येक पांडुरंगा ॥५॥२१॥

ओवी हरी स्वमुखें सांगे आपण । गजेन्द्रें केलें नामस्मरण ॥
पापपुण्यनिदळिण । उद्धरण पावला ॥२२॥

अभंग [३]उपेक्षिलें येणें कोण्ही शरणांगत । ऐसी नाहीं मात ऐकिली पैं ॥१॥
आतां काय सांडील ब्रीद तें आपुलें । ठाइचेंची धरिलें जाणोनीयां ॥२॥
माझ्या दोषासाठीं होईल पाठिमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ॥३॥
तुका म्हणे रूप आमच्या कैवारें । धरीलें गोजिरें चतुर्भुज ॥४॥२३॥

ओवी तंव नक्र म्हणे जाण । तुझें जाहलिया दरूषण । माझें पाप नव्हे क्षीण । पापबळें श्रीभगवान् जिंकिला म्यां ॥२४॥ तुझ्या नामें पाप निर्दळे । तुज देखिल्या पाप न टळे । माझ्या पापा-भेणें हरी पळे । म्यां जिंकिलें गोविंदा ॥ २५ ॥ सकळ पापातें संहारी । या लागीं नाम श्रीहरी । माझ्या पापाच्या तोडरीं । तुजला म्यां मुरारी । धांवलों पदां नको दुरीं धरूं ॥ २६ ॥ अति वक्रोक्ति नक्रवचन । ऐकोनी संतोषला श्रीभगवान । तुझें पाहावया निज ज्ञान । उपेक्षण म्यां केलें ॥२७॥ माझ्या दर्शनाची प्राप्ती । तुज जाली ज्ञानस्फूर्ती । ऐसें बोलुनी श्रीपती । नक्र गजपती भेटविला ॥२८॥ नक्रें धरीले गजाचे चरण । तुझें करितां चरण-ग्रहण । मज भेटला श्रीभगवान । तुझेनी जाण गजेन्द्रा ॥२९॥ गजेन्द्रें घातलें लोटांगण । तुवां धरिले माझे चरण । मज आठवला श्रीभगवान । उद्धरण तुझेनी ॥ ३० ॥ संतोषोनी भगवान । स्वरूपता दे संपूर्ण । नेदी श्रीवच्छलांछन । मज अधीन नाहीं म्हणे ।३१। ब्राह्मणाच्या दुर्वाक्यता । हृदयीं साहिली द्विजलाता । श्रीवच्छ लाभे हाता । सत्यवाक्यता वेदार्था ॥ ३२ ॥ दोघां करूनी चतुर्भुज । मुकुट-कुंडलें अलंकार वोज । घालूनी विमानीं सहज । वैकुंठासी पैं निघाले ॥ ३३ ॥ मग तोही श्रीहरी स्तविला तेंहीं । तुझें उत्तीर्णता नव्हों आम्ही । तुझ्या कृपावलोकनें पाहीं । ऐक्य परत्र साधिलें ॥३४॥

अभंग *मज अभयदान देई रे उदारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥१॥
देह तंव तुझे ठेवियला पायीं । आणिक नेणों कांहीं तुजविणा ॥२॥
सेवा भक्ति तुझी नेणें मी पतित । आतां माझें हित तुझे पायीं ॥३॥
अवघा निरोपिला तुज देहभाव । आतां मज पाव पांडुरंगा ॥४॥
तुका म्हणे तुझें नाम दीनानाथ । तें मज उचित करी आतां ॥५॥३५॥
[हस्तलिखित स २].

तुळा १. "३१५०. आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ॥ १॥ ध्रु० ॥ नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत ॥ २ ॥ आघात निवारी । छाया पीतांबरें करी ॥३॥ उभा कर कटीं । तुका म्हणे याजसाठीं' ॥ तुगा. पृ० ६१५.

२. "३१४. तुज म्हणतील कृपेचा सागर । (तरि)कां केला धीर पांडुरंगा॥ ॥१॥ध्रु०॥ आझुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहा-

तोसि ।।२।। आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तान-भूक ।।३।। प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाई वोर-सोनी ।। ४ ।। तुका म्हणे माझें कोण हरी दुःख । तुजविण एक पांडुरंग" ।।५।। तुगा. पृ० ८८-८९.

३. "३१५५. उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईकिली ।। १ ।। ध्रु०।। आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनियां ।।२।। माझ्या दोषासाठीं होईल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ।। ३ ।। तुका म्हणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ।।४।।" तुगा. पृ० ६१६.

४. "५३०. मज अभयदान देईं तूं (देईंगा) दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ।।१।।ध्रु०।। देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजें नेणें ।। २ ।। सेवाभक्तिहीन नेणता पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ।। ३ ।। तुका म्हणे माझें सर्व ही साधन । नाम संकीर्तन विठोबाचें" ।।४।। तुगा. पृ० १३०.

३.११ विष्णुदास

सुमारे पाऊणशे ओव्यांच्या प्रस्तुत काव्याचा कर्ता विष्णुदास आहे. ह्याची नाममुद्रा विष्णुदास आहे, नामा विष्णुदास किंवा विष्णुदासनामा अशी नाही. त्यामुळे 'अद्यापिहि एक वादविषयच' (मश्रा. पृ. ७७२) असलेल्या विष्णुदास नाम्याहून हा विष्णुदास वेगळा वाटतो. ह्याच्या काळाविषयी कोणताही पुरावा मिळत नाही. ह्याने वापरलेले काही शब्द तंजावरी कोशात आढळतात, त्यावरून हा दक्षिणेकडील मराठी कवी तर नव्हे, असे मनात येऊन जाते.

ह्याचे प्रस्तुतचे काव्य भागवतानुसारी असले तरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. उद्धारक अशा हरिनामस्मरणाचा महिमा गाणे हे या काव्याचे प्रयोजन आहे. मगराच्या तडाख्यात सापडलेल्या व बरोबराच्या हत्तींनं त्यागिलेल्या गजेन्द्राचे करुण स्वगत (ओ. २०-२१), विष्णुचक्राच्या प्रहारानंतरही मुक्तिलोलुप मगराचे गजेंद्राच्या पायाला मिठी मारणे(३९-४२), गजेन्द्राला वाटत असलेला मगराचा धाक (४७-४८),गजेन्द्राच्या मोक्षप्राप्तीनंतर मगराचे गाऱ्हाणे व भगवंताशी युक्तिवादपूर्ण भाषण (५९-६४), इत्यादी कथांश कविकल्पित असून मनोज्ञ उतरले आहेत. विशेषतः मगराच्या तडाख्यात सापडलेला आणि ज्ञातिबांधवांकडून टाकला गेलेला हताश हत्ती रसिकांच्या डोळ्याच्या कडा ओल्या करू शकतो. तर स्वतःचा उद्धार न झाल्यामुळे

तळमळणारा, मनातल्या मनात विचारांची जुळणी करणारा आणि मग भगवंताशी पेचदार युक्तिवाद करणारा मगर रघुनाथ पंडितांच्या 'चतुर नर यखादा बोलतो राजहंसा' समान वाटतो. कवीला ह्या अमानुष प्राण्यांचे मानुषीकरण करण्यात जसे यश आले आहे तसे अतिमानुष भगवंतांचेही मानुषीकरण करण्यात यश आले आहे (ओव्या ४९, ५०, ६६). कवीचा योगशास्त्राशी परिचय दिसत असला तरी त्याची खरी प्रीती भक्तिमार्गावरच आहे, हे सुरवातीच्या सतरा ओव्यांवरून स्पष्ट-पणे जाणवते. कवीची मराठी भाषा सुबोध, गोड आणि प्रवाही आहे.

प्रस्तुत काव्यपाठ हस्तलिखिताच्या एकाच प्रतिलिपीवरून येथे छापला आहे.

ओव्या।

ऐका ऐका सावधान । परिसा हरिकथेचें महिमान । अज्ञानासी स्फुरे ज्ञान । कीर्तनासाठीं ॥१॥ हरिनामीं ज्याची आवडी । तो इन्द्रलोकींचा वऱ्हाडी । त्यासी मूळ येतसे तातडी । विष्णुदूत ॥ २ ॥ जेथें हरिकथेची सुरवाडी । तेथें पापें होती देशधडी । वैकुंठीं उभारे गुढी । कीर्तन हरीच्या ॥३॥ नामें पावन श्रोता । नामें पावन वक्ता । नामें पावन कथा । कथितार्थ ॥ ४ ॥ नामें जिव्हा रसाळ । नामें श्रवण सीतळ । नामें कलिकाळ । सार्थक होय ॥ ५ ॥ नामें शुद्ध मन । नामें शुद्ध अन्तःकरण । नामें बुद्धी पावन । नामें चैतन्य चित्त हें ॥६॥ नामें अहंकारासी गाळी । नामें त्रिगुणातें घुमळी । नामें नवनीत नव्हाळी । निजस्वरूप जें ॥ ७ ॥ नामें मरते साधन । नामें सरते ध्यान । नामें सरते वदन । नामें पावन । तिही लोकीं ॥८॥ नामें पावन चारी × ×णी । नामें पावन चारी वाणी । नामें पावन × × । × × पावन ॥९॥ नामें पावन खेच(री) × । नामें पावन भूचरी । नामें × × । × × ॥१०॥ नामें तुटे भवबंधन । नामें आ× × । × × । प्रक्षाळण ॥११॥ नामें जीवनर्ज × × तो उमापती । अखंड नाम चित्तीं । ध्यातो अहोराती । नामें गती पाविजे ॥१२॥ पाताळीं सहस्र फणी । नाम ध्यातो नित्य ध्यानीं । नाम तारक त्रिभुवनीं । नामावांचुनी तरेना ॥१३॥ येका नामासाठीं । गणिका बैसली वैकुंठीं । अक्षरें जपतां उफराटी । वल्मीक सृष्टी पावन ॥ १४॥ पुत्र मोहें अजामेळ । नामें (त)रला तत्काळ । धुरूसि दिधलें मंडळ । अच × × ळेना ॥१५॥ वैकुंठीहूनि धांवणें । केलें प्रल्हादा-कारणें । नामासाठीं नारायणें । धरिलें तेणें उग्रतेसी ।१६। गजइन्द्र नाडी सावजी । धरूनि वोढिला उदकामाजी । मुक्त नव्हे आपुल्या भुजीं । सख्या आतमजीं मोक-ळिला ॥१७॥ आप्त-वर्गीं मोकळिला । दारा-पुत्रें त्यजिला । म्हणती याचा अन्त पुरला । वार्धिक मेला मरों द्या ॥१८॥ ऐसी गेली दाही दिशा । गजेन्द्र पडला

फंसा । अंतीं खुंटली आशा । पाहे दिशा वोहटल्या ॥१९॥ माझी दारा, माझे पुत्र । माझ्या दुहिता, माझें गोत्र । नातूपणतू माझे मैत्र । हे सर्वत्र न येती कामा ॥२०॥ म्हणे म्यां अवघियातें पोशिलें । माझी म्हणउनी म्यां पाळिलें । सेखीं मज सांडिलें । मोकळिले अंतकाळीं ॥ २१ ॥ जळचरें घातली मिठी । गजेन्द्र जाला हिंपुटी । म्हणे आजि बुडाली सृष्टी । न सुटे मिठी कांहीं केल्या ॥ २२ ॥ गजेन्द्रें पाहिलें परतोनी । विचारिलें तेव्हां अन्तःकरणीं । म्हणे येका पुरुषावांचुनी । न चुके योनी बंदाची ॥२३॥ म्हणे धांवेना हरी । नारायणा नरकेसरी । धरियेलें मज मगरीं । महामारीं पेटला ॥२४॥ धांवे धांवे वैकुंठनाथा । धांवे धांवे लक्ष्मी-कान्ता । धांवे धांवे जी अनन्ता । शरणांगता सोडवा ॥ २५ ॥ आजि देव वेद हरपले । मच्छरूपें पाहिजे धुंडिले । रसातळ आजि वोडवलें । धरिलें पाहिजे पृष्टीवरी ॥२६॥ आजि पृथ्वीची मोडी । केली हिरण्याक्षें चौघडी । आतां पावें तूं तांतडी । दंत बुडी द्यावया ॥ २७ ॥ माझा भावार्थ प्रह्लाद । आजि बुडाला प्रसिद्ध । सिंहवदनें तूं गोविंद । करी ब्रीद साच हें ॥ २८ ॥ ये गा ये गा बळि-बंधना । ये गा ये गा दीनोद्धारणा । ये गा ये गा नारायणा । × × (वि)राट-पुरुषा ॥ २९ ॥ ये गा ये गा फ × × । × × वसुन्धरा । वेगीं सोडवी द × × । × × ॥ ३० ॥ माझे सत्त्व रावणा । धांवे धांवे ताटिकामर्दना । × × । × × ॥ ३१ ॥ आजि मांडिलें वस्त्र × । × × धन । माझा घेवो पाहे प्राण । काय निर्वाण पावसी हरी ॥ ३२ ॥ ऐसे तळमळी तो अंतरीं । तंव ध्वनी उठिली क्षीरसागरीं । गजबजिला तो मुरारी । रमेसहित आपण ॥३३॥ लक्ष्मी शेजेवरी । निद्रिस्त टाकुनी मुरारी । धांवे भक्तांचा कैवारी । चक्र करीं घेउनियां ॥३४॥ वेगीं पावला तत्त्वता । म्हणे नाभी नाभी रे भक्ता । कोणें गांजिलें सांग आतां । त्यासी सर्वथा दंडीन ॥ ३५ ॥ गजेन्द्रें तये वेळां । देखिला मेघश्याम घनसांवळा । अश्रु स्रवले डोळां । हृदयकमळीं प्रेम दाटे ॥३६॥ गजेन्द्र म्हणे जगन्निवासा । मगरें गिवसिलें आवीसा । वेगीं करी गा हृषीकेशा । बंदपाशा छेदावें ॥३७॥ मग चक्र घेऊनि करीं । भेदिले त्या जळाभीतरीं । दोघे उसळले अंबरीं । बाहीरी पडले ॥३८॥ नक्र म्हणे संकटीं । देव पावला नामा-साठीं । गजेन्द्रा पायीं घातली मिठी । तरीच जाली भेटी हरीची ॥ ३९ ॥ माझिया जन्माचें सांकडें । गजेन्द्रें फेडिलें रोकडें । मग सरसाउनिया भांडें । पायीं गाढें धरियेलें ॥ ४० ॥ संकटीं हा नाम उच्चारी । म्हणउनि येथें रातले हरी । यासि न विसंबे क्षणभरी । मिठी मगरीं घातली ॥४१॥ म्हणे या पायांसी सोडितां । मी जाईन अधोपाता । हा जाईल तत्त्वता । वैकुंठ-पंथें निघोनिया ।४२। याचे पायीं माझा जीवो । याचि घडीमाजि जावो । ऐसा धरूनि दृढ भावो ।

जीवें पाय न सोडी ॥ ४३ ॥ तंव गजेन्द्र घाबिरा । म्हणे काय पाहतोसि गा दातारा । वेगीं सो× × । या मगरापासोनी ॥ ४४ ॥ मग × × । जु हाणीतला मुख मेळी । × × । दांतखिळी सुटली ॥४५॥ × × × । नक्र पडला अचेतन । × × × × । (ज) गज्जीवन पाहतसे ॥४६॥ गजेन्द्र × × । नक्र-भय लागलें गाढें । जीवें पळे देवाकडे । पायां पडे घाविरा ॥ ४७ ॥ गजेन्द्र कांपे थरथरा । नक्रभयाचा वाहे दरारा । पाठिमी घाली गा सारंगधरा । होई न मगरावर पड ॥ ४८ ॥ देव म्हणे रे भक्ता । भय सांडी सांडी आतां । माझिया भक्तासी द्वन्द्व करितां । करीन घात तयाचा ॥४९॥ माझिया भक्तांवरी आघात । कोण्ही करूं सके उन्मत्त । त्यास करीन घात । अकस्मात छेदीन ॥ ५० ॥ ऐसे बोलोनि हृदयामाजि । देवें आळंगिला चौभुजीं । येरू म्हणे दासी तुझी । चरणांबुजीं राखिजे ॥५१॥ देवभक्तांची मीळणी । नक्र देखतसे नयनीं । म्हणे गजेन्द्र गेला ठकुनी । निरंजनीं मज सांडिलें ॥ ५२ ॥ जर्जर जालों चक्रघायें । शक्ति नाहीं गळाले पाये । करी खेद मोकली धाये । जैमी लाहे तळमळी ॥ ५३ ॥ ऐसें सावज तळमळी । मजवरि कोपला हा वनमाळी । गजेन्द्रासी धरिलें हृदयकमळीं । जळपाळीं मज टाकिलें ॥ ५४ ॥ मग धैर्य धरूनिया धीर । यासि नेतां देखोनि सारंगधर । तंव यखादा करीन विचार । सर्वेश्वर जेणें रिझे ॥५५॥ मग उगाचि राहिला क्षण येक । देव भक्ताचें पाहे कौतुक । तंव दोघांचें हृदय झालें येक । जालें सुख गजेन्द्रा ॥५६॥ मग देव म्हणे भक्ता । चाल वैकुंठासी आतां । जे कां मुक्ती सायोज्यता । तुज तत्वता दिधली ॥५७॥ मग गजेन्द्रा धरूनि करीं । दोघे चालिले वैकुंठाभीतरीं । नक्र म्हणे पाहे पां मुरारी । दृष्टि माघारीं परतोनी ॥५८॥ मज मोकळूनि जासी । तरि सोडी गा ब्रीदासी । माझें भयें तूं पळतोसी । जिंकिलासि रे मुकुंदा ॥ ५९ ॥ हा नाम स्मरला संकटीं । त्यासि नेतोसि वैकुंठीं । तुझें स्वरूप देखोनि दृष्टी । पाप शेवटी राहिलें ।६०। माझिया पातकाच्या धाकें । आजी पळू काढिलें यदुनायकें । जिंकिलें जिंकिलें तुज रंकें । म्यां येक पतितें ॥६१॥ पतीत-पावन जें बांधिलें । तें ब्रीद सोडीं आपुलें । आतां बहूत मी न बोलें । म्यां जिंकिलें रे गोविंदा ॥६२॥ माझें भयें पळतां । लज्या नाहीं तुझिया चित्ता । म्यां जिंकिलास रे × × । ब्रीदें आता सोडी हे ॥६३॥ × × । देइ माझे करीं । सुखें जाय × × । × × पुलिया ॥ ६४ ॥ ऐसें जळ × × । × × चें हृदय निवालें । म्हणें × × । × × पाहिजे यासी ॥ ६५ ॥ × × । मजचि आलें कीं उणें । × × जग जीवन । ब्रीदें करणें साच हें ॥६६॥ मज स्वभावें जे निंदिती । त्यासी होय माझी प्राप्ती ।

येणें देखिली माझी मूर्ती । केली स्तुती निंदामिसें ।। ६७ ।। म्हणउनि कृपेच्या सागरें । नक्र धरिलें अभयंकरें । आश्वासोनि सारंगधरें । येकसरें उद्धरिला ।।६८।। नक्र गजेन्द्र दोन्ही । उद्धरिले तत्क्षणीं । नेले वैकुंठभुवनीं । देव विमानीं घालुनियां ।।६९।। ऐसा महिमा नामाचा । उद्धार केला पतिताचा । नाम-श्रवणीं ज्याची वाचा । उद्धार तयाचा तात्काळें ।। ७० ।। नक्र गजेन्द्राचें कथन । या निरोपणासि हेंचि कारण । येणें जग होय पावन । करी स्मरण तत्काळ ।। ७१ ।। म्हणउनिया श्रोता । सावध होई आतां । नामकीर्ती उच्चारितां । मुक्ति-पंथा पाविजे ।। ७२ ।। विष्णुदास बांधी शरण । तुटलें भव(भ)याचें बंधन । जालें गजेन्द्रोद्धारण । नक्र पावन नामें केला ।।७३।। [ह० त० ९]

३.१२ शेष

हा शेष कवी कोण ते निश्चित करता येत नाही. महाराष्ट्र-सारस्वताच्या पुरवणीकारांनी दक्षिणेतील एका शेष कवीचा उल्लेख केला आहे [मसा. पृ० ८९५-८९६]. प्रस्तुत कवीही तंजावरकडील असावा. येथे छापलेल्या त्याच्या काव्यातील हुलकला व बिलकला (पद दुसरे) हे दोन्ही शब्द मराठी भाषेच्या तंजावरी कोशात आढळतात. त्यावरून वरील अनुमानास थोडीशी पुष्टी मिळते. हा सतराव्या शतकात होऊन गेला असावा.

प्रस्तुत काव्यात फक्त तीन पदे आहेत. त्यातील कथानक भागवतानुसारी आहे. कथेची पद-बद्धता, भाषेतील अनुप्रासप्राचुर्य, नादानुवर्तित्व, भक्तिभावाचा उठाव इत्यादी वैशिष्ट्यांवरून प्रस्तुतचे लघुकाय काव्य कीर्तनात गाण्यासाठी रचण्यात आलेले असावे, असे वाटते. कवीला संस्कृत भाषेची समज चांगली आहे. प्रस्तुत संक्षिप्त काव्य सताल व गेय असल्यामुळे रसिकाचे लक्ष वेधून घेते.

कवीने काव्यांती स्वतःच्या नावाचा उल्लेख केला आहे.

प्रस्तुत काव्याच्या हस्तलिखिताची एकच नक्कल उपलब्ध झाली. तद्गत पाठच खाली मुद्रित केला आहे.

पद पहा पहा नवल मोठें गजही भवसागर तरला ।।ध्रु०।।
गजेन्द्र तो परिवारासह धनतोरा माजवी थोरा हंसे ।।
फेरा घेत वनीं तरुभार विदारीत सारा ।।
दणदण दणदण दौड घेत टळटळित दुपारा ।।

वणवण वणवण फिरत कठोरा ।। दिनकर-किरणीं फणफण फणफण तापुनिया रान देखता न सहोनी उबारा ।। नीरासाठीं धांव घेत हैरा ।। पाहों ये तंव सरोजविलसित सरोवरा ।। देखोनि लोचनीं फारा तोषें माजि उतरला सरळा।।१।।

भरी भरुनि तो करी नवल करि ।। जळीं रिघुनी तनु भिजउनि घन किंकाट करित कमलावळी भंगित ।। नक्रराज उदकावरि आला ।। करिवरासी देखुनि तैं कोपें बळें हुलकला ।। नकळतसा येवोनि समीपीं चरणिं बिलकला ।। तंव तो गजेन्द्र नक्रमिठी सोडवी परि न सुटे ।। जर्जर झाला मरुं टेकला ।। देखुनि हें स्वजनाचा पाळा भयें पळाला ।। अंगलगी परिणाम दाविला ।। मनीं समजला ।। सुकृतवशें श्रीहरी आठवला ।। शरण रिघाला त्याला ।।२।।

'म्हणे स्वामिया दीनबांधवा ।। गरुडवाहना धांव पावगा ।। भव नक्रें बेजार माधवा ।। जालों अंत न पाहीं बरवा ।। करि वर वरदायक म्हणउनि जनिं बिरुद वागवीं' ।। यापरि तेणें करितां धावा ।। आर्त ध्वनि ते ऐकुनि गरुडारूढ सुदर्शन-धर हरि तत्क्षणीं । अभय देत तंव भक्त विसांवा ।। उडी घालुनी चक्रें सत्वरि नक्र विदारुनि गजेन्द्रासि दे निज-सुख-ठेवा ।। जाणुनि हें ब्रह्मादिदेवमुनि ।। गर्जुनि म्हणती 'शेष' विभुवर सेवा ।।३।। [ह० स. १७]

—:०:—

४. समालोचन

मागील प्रकरणात आपण मध्ययुगातील बारा मराठी कवींच्या 'गजेंद्रमोक्ष'-पर कवितांचा प्रत्यक्ष परिचय करून घेतला. त्या कवितांचे पुनरवलोकन केल्यावर असे ध्यानात येते की, त्या कवींनी पुराणप्रसिद्ध व मर्यादित विस्ताराचे असे हे उपाख्यान अनेक युक्त्या योजून रंगतदार बनविले आहे. त्यांपैकी काही युक्त्या बहिरंगनिष्ठ असून काही अंतरंगनिष्ठ आहेत. त्यांचीच ओळख ह्या प्रकरणात करून घेऊन प्रस्तुतचा अभ्यास संपवू.

४.१ बहिरंग वैशिष्ट्ये

मागील कवितांच्या पद्यसंख्येवरून नजर फिरविली की असे दिसून येते की, शेषाची कविता विस्तारदृष्ट्या सर्वात लहान (तीन पद्ये) असून विष्णुदासाची सर्वांत मोठी म्हणजे श्याहत्तर ओव्यांची आहे. त्याच्या खालोखाल लांबी पंडित सुरेन्द्राच्या कवितेची असून एकनाथ, गिरिदास, माधव ह्यांची काव्ये जवळजवळ सारख्याच आकाराची आहेत. ह्यावरून असे म्हणता येते की, ह्या मध्ययुगीय कवींनी प्रस्तुत उपाख्यान अतिसंक्षिप्त व अतिविस्तृत अशा उभयविध स्वरूपात रंजक बनविण्यात सारखेच यश मिळविले आहे. त्यांच्या ह्या यशात अनेक कवींच्या वृत्तवैविध्याने चांगली भर घातली आहे. एकनाथ, गिरिदास व विष्णुदास ह्यांनी जरी ओवी हाच प्राकृत व सोपा छंद हाताळला असला तरी त्यांची प्रवाही व अस्खलित ओवी कथेला गती प्राप्त करून देते. पहिला अज्ञात कवी (३.२), गोविंद, पंडित सुरेंद्र, माधव व शेष यांनी अक्षरगणात्मक वेगवेगळी वृत्ते, अभंग व पदे यांची मौज लुटली आहे. ह्या विदग्ध कवींत कथांशातील बदलाबरोबर वृत्त बदलण्याची मर्मज्ञता दिसते. गोविंदाने कामदा (किंवा शुद्धकामदा) हे मंदगतीचे व पंडित सुरेंद्राने पंचचामर हे दीर्घ व सताल वृत्त औचित्यविवेकाने वापरले आहे. काही कवींनी वृत्तविवेकाबरोबर शब्दविवेकही दर्शविला आहे. प्रास, यमके, ध्वन्यनुकारी शब्द इत्यादींची रेलचेल गोविंद, सुरेन्द्र, माधव व शेष यांच्या काव्यांत आहे. पंडित सुरेंद्र काही स्थळी 'ळ' ची यमके व अनुप्रास जुळविण्याचा हव्यास (पद्ये ३४, ४०, ४३) करतो हे खरे, परंतु तसे तो चूष म्हणून करतो असे भासते. बारा कवींच्या मिळून तब्बल चारशे पद्यांत पुढीलसारख्या, अक्षरशः हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच, उपमा आढळून येतात, ही बाबही आवर्जून

ध्यानात घेण्याजोगी आहे—जशी गाय वासरासाठी पान्हावते तसा देव भक्तासाठी वेडापिसा झाला (एकनाथ प. १६), मुलाला मुंगी चावली की, जशी आई धावत जाऊन त्याला कडेवर घेऊन उगी करते तशी देवाने गजेंद्राची संकटातून मुक्तता केली (पंडित. प. ४९). येथवर आपण मागील बारा कवितांचे नावीन्यपूर्ण बहिरंग न्याहाळले. आता अंतरंगात अधिक बारकाईने डोकावून बघू.

४.२ अंतरंग वैशिष्ट्ये

अंतरंगात डोकावून पाहू लागल्यावर अगदी पहिल्यांदाच आपल्याला जी जाणीव होते ती अशी की, ह्या बाराही कवींनी प्रायः भागवती उपाख्यानच डोळ्यांसमोर ठेवले आहे. त्यातल्या त्यात एकनाथ व पंडित सुरेंद्र यांनी ही गोष्ट पुनःपुन्हा आठवणीने सांगितली आहे (पाहा, पंडित प० २-४, ५०, ६०, ६२). परंतु, त्यांनी मुळातली कथा मराठीत यथामूळ निवेदिलेली नाही. त्यांनी तिच्यात लहानमोठे अनेक फेरबदल केले आहेत. त्यांपैकी अगदी पहिला बदल म्हणजे कथानकातील मध्यवर्ती पात्रांचे-इन्द्रद्युम्न आणि हूहू गंधर्व यांचे—जीवनचरित्र. मूळ भागवतानुसार पांड्यदेशीय इन्द्रद्युम्न राजा एकदा मलयपर्वतावर ध्यानस्थ बसला असता त्याच्याकडून अगस्त्य मुनीची अवज्ञा झाली व त्यामुळे मुनीने राजाला शाप दिला; राजाने हे आपल्या प्रारब्धाचे कर्मफळ असे जाणून तो शाप मुकाट्याने सहन केला. हूहू गंधर्वाला देवल ऋषीने शाप दिला होता. भागवती उपाख्यानानुसार ह्या दोघांचे पूर्ववृत्त असे आहे. एकनाथांच्या (३.४) काव्यात अगस्त्य व देवल हे ऋषी एकाच सरोवरापाशी इन्द्रद्युम्न व हूहू यांना शाप व उःशापही देतात (प० १०-२२). पंडित सुरेन्द्राने तर एकनाथांवरही मात केली आहे. त्याने(३.८) एकटे अगस्त्य मुनीच इन्द्रद्युम्न व हूहू यांना एकाच ठिकाणी व एकाच वेळी शाप देतात, असे वर्णन (प० १०-११) केले आहे.

वरीलसारखे आणखी एक परिवर्तन दृष्टोत्पत्तीस येते ते असे की, हे कवी मुळातील ओझरत्या किंवा संक्षिप्त निर्देशाचा आपापल्या कल्पनेनुसार विस्तार करतात; त्यामुळे रसिकाला कधी चित्रमय वर्णने वाचावयास मिळतात, कधी एखादा नवीनच प्रसंग पाहावयास मिळतो तर कधी खटकेबाज संवादाचा आनंद लुटावयास मिळतो. अशा प्रकारे ही परिवर्तने हृदयंगम ठरतात. काही वेचक उदाहरणे पाहू.

सरोवरावर कळपासहवर्तमान येऊन पोचलेला मत्त गजेंद्र उन्हाने पोळून निघाला होता व तहानेने व्याकुळ झाला होता, असे मूळकथेतील वर्णन आहे.

पंडित सुरेन्द्राने त्याचा रम्य विस्तार केला आहे. तो असा—सगळा पर्वत तापून निघाला होता, गंडिकेत पाण्याचा थेंब नव्हता, गजेंद्र 'पाणी पाणी' करीत दऱ्या, खोरी, झरे, विहिरी, तळी व सरोवरे धुंडाळत होता, पण बापड्याला पाण्याचा थेंब मिळाला नाही. इकडे तहानेने जीव व्याकुळ होऊ लागला होता. जगण्यासाठी आपण जीवन (पाणी) शोधत आहोत आणि त्या जीवनासाठी कोण ही याता-यात असा विचारही त्याच्या मनाला चाटून गेला. आपल्या लाडक्या बायकांसह व कच्च्याबच्च्यांसह तो ह्या जलाशयावरून त्या जलाशयावर असा भटकत होता, पण पाणी काही केल्या गवसेना ! एवढ्यात पाण्याने तुडुंब भरलेले एक सरोवर त्याला अचानकपणे दिसले ! (प० २४-२८) हे वर्णन म्हणजे हवालदिल होऊन् हिंडणाऱ्या हत्तीच्या हालचालींचा चलच्चित्रपटच !

भागवती उपाख्यानातील हत्तीने सरोवरावर येताच प्रथम स्नान केले, सरो-वराचे कमलगंधित पाणी प्राशन केले, मग एखाद्या सहृदय व गृहस्थाश्रमासक्त व्यक्तीप्रमाणे बरोबरच्या हत्तिणींना व पिल्लांना पाणी प्यावयास दिले आणि स्नान घातले. वेगवेगळ्या मराठी कवींनी हा छोटासा प्रसंग वेगवेगळ्या पद्धतींनी सशब्द केला आहे. अज्ञात कवीचा (३.२) गजेंद्र प्रथम पिल्लांना पाणी पाजतो, नंतर बरोबरच्या 'सैनिकांना'; मग त्यांना स्नेहादराने स्नान घालतो आणि मनातल्या मनात सुखावतो (प० २८). एकनाथांचा (३.४) गजेंद्र प्रथमतः स्वतः पाणी पितो, डोक्यावर पाणी शिंपतो, नंतर अगोदर भार्येला व मग प्रिय पुत्रास पाणी पाजून त्यानंतर इतरांना पाणी पाजतो (प० २७-२८); ही दोन्ही परिवर्तने आपापल्या परीने सुखावह आहेत.

भागवतातील हत्तिणी, गज-नक्रांचे घोर युद्ध पाहून हताश होतात आणि आक्रोश करू लागतात; कळपातील इतर हत्तीही गजेंद्राला सोडवू शकत नाहीत. मराठी कवींनी मुळातील ह्या कथांशाला एका सौन्दर्यस्थळाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. अज्ञात कवीच्या (३.२) काव्यातील गजेंद्राचे पुत्रपौत्रादी त्याचे क्लेश पाहून पांगतात (प० ३२). एकनाथांच्या (३.४) काव्यातील हत्तिणी गजेंद्राला म्हणतात 'बाबा रे ! आमचे भाग्य थोर म्हणून आम्ही आणि पोरे वाचलो. आता तू आणि तुझे नशीब ! पाहून घ्या !' (प. २३) एकनाथांच्या दुसऱ्या (३.५) काव्यातील हत्तीची बायकामुले, त्याला मगराने गळ्यापर्यंत गिळले आहे हे पाहून, त्याला सोडून अक्षरशः पळून जातात (प० १). पंडित सुरेन्द्राच्या काव्यातील हत्तिणी गजेंद्राची दारुण स्थिती पाहून 'आता आमचे कसे होणार ?' (प० ३६) अशी चिन्ता व्यक्त करीत तेथून काढला पाय घेतात

(प. ३९). विष्णुदासाच्या काव्यातील हत्तिणी तर आणखी पुढचे पाऊल टाकतात. त्या सरळच म्हणतात, म्हातारा मरतो आहे. मरू द्या' (प० १८) आणि वाट फुटेल तिकडे धावत सुटतात (प० १९). मराठी कवींनी केलेले हे नानाविध फेरफार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. मुळातील गजेंद्र, आपले जातभाई आपली सुटका करण्यास असमर्थ असल्याचे मनोमन ओळखून, ईश्वराला शरण जातो व त्याची आळवणी करू लागतो. मराठी कवींचा मनुष्येतर योनीतील गजेंद्र अन्तर्मुख होतो, मनुष्याप्रमाणे खिन्न होतो आणि पुढीलप्रमाणे 'स्वगत' म्हणतो–'अरेरे, मला एकट्याला सोडून माझे सारे सगेसोयरे निघून गेले ना ! मी ह्या साऱ्यांना वाढविले, त्यांचे रक्षण केले, त्यांच्यावर माया केली. पण आज माझ्यावर संकट आले असता कोणीही धावून आले नाही ! माझ्या लहानमोठ्या सर्वच बायका मला शेवटी टाकून गेल्या. माझ्यासारखेच बलाढ्य माझे शतावधी मुलगे. पण तेही पाठमोरे झाले. आणि माझे प्रौढ वयाचे मित्र. त्यांनाही माझी चाड नाही, एकंदरीने या जगात कोणी कोणाचे नाही, हेच खरे !' असे खेदोद्गार स्वतःशीच काढून हजार वर्षे चालू असलेल्या घोर युद्धाने थकलेला हत्ती सोंड टाकतो, डोळे झाकतो व दीनवाणेपणाने उभा राहतो !' एकनाथ, गिरिदास, माधव व विष्णुदास ह्यांनी वरील शब्दांत वर्णिलेला गजेन्द्र सहृदयांच्या हृदयाला हात घालतो. गजेन्द्राचे वरील 'प्रचीतीचे बोलणे' ऐकून ज्याच्या डोळ्यांत टचकन पाणी येणार नाही, असा रसिक क्वचितच असेल.

गजेन्द्र जेव्हा धावा करू लागला तेव्हा विष्णू कोठे होता, त्याचा उल्लेख भागवती कथेत नाही. परंतु, गिरिदास आणि गोविंद ह्या दोघांनी, 'विष्णू त्या सुमारास शेषशायीवर पहुडला होता. किंबहुना त्याला डोळा लागला होता. लक्ष्मी शेजारी बसून त्याचे पाय चुरत होती. गरुड हात जोडून उभा असून स्वामिकार्याचा विचार करीत होता आणि नारद व तुंबुरु गायन करीत होते' (गिरिदास प० १९-२०, गोविंद प० १८), असे जे पूर्णपणे काल्पनिक शब्दचित्र रेखाटले आहे ते मनमोहक आहे. गिरिदासाने तर त्यात 'विष्णूने पीतांबर तोंडावर ओढून घेतला होता, तो किंचित बाजूला केला, तेव्हा त्याला नक्राने गजेंद्राच्या पायाला विळखा घातल्याचे दिसले'. अशी एक खास महाराष्ट्रीय छटा मिसळून बहार उडवून दिली आहे.

भक्त संकटात असल्याचे पाहून भक्ताचा कैवारी व्यथित होतो व भक्तरक्षणाची तातडीने व्यवस्था करतो, ही झाली भगवंताची सर्वसाधारण रीत. पण मराठी कवींचा भगवंत इहलोकींच्या मानवासारखा वागतो. एकनाथाचा भगवंत वेडापिसा

होतो (३.५ पद्य १३), गिरिदासाच्या भगवंताला गरुडारूढ होण्याचे भान राहात नाही, तो एकटाच पायी चालत जाऊ लागतो (प० २२), तर ३-१० मधील भगवंत गजेंद्राची हाक ऐकताच अक्षरशः धावत सुटतो (प० ७) ! विष्णु-दासाच्या भगवंताला शेजारी पहुडलेल्या रमेचाही विसर पडतो ! (प० ३४). विष्णूची ही धावपळ बघून इन्द्रादी देव 'हडबडून' जातात. कोठे काय घडले ते त्यांना कळेनासे होते आणि भयाने लटलटा कापत ते विष्णूसमोर उभे राहतात (गिरिदास प० २३-२४). हे कविकल्पित वर्णन मनोरंजक आहे.

माधव (प० २७-२९) आणि विष्णुदास (प३४-३६) ह्यांनी हा प्रसंग अधिक हृदयस्पर्शी बनविला आहे. त्या दोघांचाही विष्णू भक्तरक्षणार्थ तातडीने निघतो दुरूनच गजेंद्राला, 'भिऊ नको, भिऊ नको, मी येऊन तुझ्या शत्रूचे पारिपत्य करतो' असे आश्वासन देतो. विष्णूला दुरून येताना पाहून गजेंद्राच्या मनात भक्तिभाव दाटतो, कृतज्ञता कोंदते आणि त्याचे डोळे पाण्याने डबडबतात. तो सरोवरातील एक कमळ सोंडेने खुडतो आणि विष्णू जवळ येताच ते त्याच्या मस्तकावर वाहतो. ह्या प्रसंगचित्राला कवींच्या भक्तिभावाने खुलावट लाभली आहे की त्यांच्या प्रसन्न कल्पकतेने, ते ठरविणे अवघड आहे !

गोविंद (प० १९-२०) व काव्य ३.१० चा कर्ता (पद दुसरे) यांचा विष्णू सर्व भक्तांना चिरपरिचित असलेल्या स्वरूपात अवतरतो. त्याचे शरीर सुदृढ व तेजस्वी आहे, त्याचे डोळे कमळांसारखे टपोरे व श्वेतसुन्दर आहेत, भुवई किंचित वाकडी आहे, कानात कुंडले आहेत, डोक्यावर सोनेरी मुगुट आहे, हातात कमळ आहे, कमरेच्या साखळीचे घुंगुर वाजत आहेत, गळ्यात मोत्यांची माळ आहे मनगटांवर वीरोचित सलकडी आहेत आणि जवळ देखणे धनुष्य आहे. थोडक्यात, कवींनी आपल्या मनातील ईश्वराची प्रतिमा शब्दांनी चित्रित केली आहे.

अशा वर्णनात क्वचित्स्थळी गोविंदासारखा एखादा कवी (प० २१-२२) अद्भुताचा सुन्दर व सुखद रंग भरतो. त्याचा भगवंत एका हाताने कमळ घेतो, दुसऱ्या हाताने गजेंद्राची सोंड वर उचलतो, तिसऱ्या हाताने मगराच्या डोक्यावर चक्र हाणतो आणि चवथ्या हाताने हत्तीच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवितो. एकनाथही (३.५) अशी मोहक रंगभरणी करतात. त्यांची लक्ष्मी गजेंद्राला ओवाळते तेव्हा स्वर्गातून देव पुष्पवृष्टी करतात (प०१७).

गोविंद व एकनाथ प्रसंगवर्णनात जशी रंगत आणतात तशीच रंगत विष्णु-दास व्यक्तिदर्शनात साधतो. विष्णूने गज-नक्रांना पाण्याबाहेर काढल्यानंतरही

विष्णुदासवर्णित मगर हत्तीच्या पायाचा विळखा सोडत नाही. आपण हत्तीला सोडले तर आपला अधःपात होईल अशी त्याला भीती वाटत असते. त्यामुळे आपण हत्तीच्या पायाखाली तुडविलो गेलो तरी हरकत नाही, पण ह्याला सोडावयाचे नाही, असा निर्धार तो करतो (प० ३९-४३). विष्णुदासांनी मगराची ही स्वभावच्छटा रंगविण्यात जसा मार्मिकपणा दाखविला आहे तसाच मार्मिकपणा गजेंद्राच्या स्वभावच्छटेच्या वर्णनातही प्रकट केला आहे. गजेंद्राला मगराचा असा काही धाक उत्पन्न झालेला असतो की, तो (मगर) मरून पडलेला आहे हे डोळ्यांनी पाहूनही त्याच्या जिवाची उलघाल उणावत नाही. तो भगवंताकडे धावतो, थरथरा कापत त्याच्यापुढे उभा राहातो आणि 'मला वाचवा, मला वाचवा', असे त्याला पुनःपुन्हा विनवतो (प० ४७-४८). विष्णुदासांचा हा भयभीत गजेंद्र, भीतीने ज्याची गाळण उडाली आहे, अशा एखाद्या मनुष्यासारखा भासतो. विष्णुदासांनीच मगराच्या मनःस्थितीचे वर्णन करतानाही असाच एक बारकावा शब्दबद्ध केला आहे. चक्राच्या प्रहाराने विद्ध झालेला नक्र कळवळू लागतो, पण हताश न होता धीर धरतो. ईश्वराशी योग्य वेळी युक्तिवाद करण्याचे मनाशी ठरवितो आणि ईश्वर आता काय करतो ते बघू, असे मनाशी म्हणत गुपचूप उभा राहतो (प० ५२-५६). विष्णुदासांनी अ-मानवी मगराचे केलेले हे मानवीकरण नुसतेच यशस्वी नाही, तर प्रभावीही आहे.

विष्णू गजेंद्राला घेऊन वैकुंठलोकी जाऊ लागतो, तेव्हा मगर उपहासाने हसतो, विष्णूची निर्भर्त्सना करतो, त्याच्या पतितपावन ह्या बिरुदाची टर उडवितो, पक्षपाती म्हणून त्याचा धिक्कार करतो, 'माझे तोंड फाटल्याचे मला दुःख नाही रे ! तुझे दर्शन वाया गेले याचेच वाईट वाटते !' अशी कोपरखळी मारतो आणि मी आज तुला पापबळे जिंकले आहे, ह्या क्षणापासून मीच त्रैलोक्यनाथ !' असे ठणकावून बजावतो. एकनाथ, पंडित सुरेन्द्र, माधव, काव्य ३-१० चा कर्ता व विष्णुदास इत्यादींनी मगर व भगवंत यांच्यातील खटकेबाज संवादाचा जो असा काल्पनिक प्रसंग उभा केला आहे त्याची गोडी रसिकांनी मुळातूनच चाखली पाहिजे.

मराठी कवींनी परिचित पुराणकथेत कोणकोणत्या युक्त्यांनी नावीन्य उत्पन्न केले आहे ते आपण येथवर विचारात घेतले. आता त्यांनी ह्या कथेच्या द्वारे सश्रद्ध वाचकांना कोणता तात्त्विक उपदेश केला आहे, तो समजून घेऊ. मनुष्यमात्राने जन्ममरणाचे फेरे चुकविण्याची इच्छा बाळगावी; मी, माझे नातेवाईक, माझी मुलेबाळे इत्यादी ममत्वबुद्धी टाकावी; संकटाच्या वेळी ह्यांपैकी कोणीही धावून येत

नसतो हे लक्षात ठेवावे; शेवटी संकटग्रस्ताचे संरक्षण परमेश्वरच करतो हे तत्त्व चित्तावर कोरून ठेवावे; 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' हे विचारसूत्र निरंतर मनी वागवून सावध असावे; मायामोहाने विवेक भ्रष्ट होतो हे 'चित्ती असो द्यावे' परमेश्वर हा भक्ताची कसोटी बघत असला तरी तो पुण्यवंतांना तसेच पाप-शापितांनाही तारतो हे लक्षात ठेवून हरिनामस्मरण करावे; हरिकथा गावी आणि सद्‌गती प्राप्त करून घ्यावी. मागील प्रकरणातील सर्व मराठी कवींच्या उपदेशाचे सार हे असे आहे.

येथवर मागील प्रकरणातील सर्व काव्यांचे समालोचन झाले आहे. त्यात काव्य ३.१०चा स्वाभाविकपणेच समावेश होतो. तथापि,त्या काव्याचा थोडासा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे, असे वाटते. तीन स्वतःची पदे, तितक्याच स्वतःच्या ओव्या, इतरांच्या चोवीस ओव्या आणि इतरांचे चार अभंग यांच्या संकलनातून साकारकेले हे काव्य कीर्तनासाठी लिहिले गेलेले असावे,असा दृढ ग्रह होतो. प्राचीन भारतात पाठान्तर, प्रश्नोत्तर, मीमांसा, कथन इत्यादी ज्या अनेक शिक्षणपद्धती रूढ होत्या त्यामध्ये प्रा० कृ० पां० कुळकर्णी [च.सं. पृ. १४३-१५०] ह्यांनी प्रतिपादिल्याप्रमाणे कीर्तन हीही एक पद्धत होती. ह्या पद्धतीच्या साह्याने अशिक्षित किंवा अल्पशिक्षित प्रौढ स्त्री-पुरुषांना प्राचीन संस्कृती, परंपरा व जीवनमूल्ये यांची ओळख करून देण्यात येत असे. कीर्तन हे लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन होते. त्याचा प्रचार मध्युगीय महाराष्ट्रात प्राचुर्याने होता. गावोगावी देवळादेवळामधून कीर्तने व पुराणप्रवचने होत असत [य.म. पृ. १६७] लोकांना धार्मिक प्रवचने ऐकता यावीत म्हणून धनिकांनी जागोजागी मंदिरेही बांधली होती. [तत्रैव पृ. १६०]. ह्या धार्मिक कीर्तन-प्रवचनांसाठी महाभारत, रामायण व भागवतादी पुराणे यातील हरिश्चंद्राख्यान ध्रुवाख्यान, प्रल्हादचरित्र, भस्मासुराख्यान, गोपीचंदाख्यान, शिशुपालवध, अहिल्योद्धार, अहिमहिरावणाख्यान, सुभद्राहरण, द्रौपदीहरण, अजामिळकथा इत्यादी आख्याने (आख्यानांची विस्तृत यादी डॉ० यशवंत पाठक यांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी" कॉन्टिनेन्टल, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०, पृ. १६५-२२१ वर दिली आहे, ती जिज्ञासूंनी पाहावी) निवडली जात असत. अशा आख्यानांच्या पोथ्या घरोघरी वाचल्या जात असत. पूर्वी शीघ्र प्रवासाची साधने नसल्याने पावसाळ्यात लोक घरीच राहात असत. अशा वेळी दक्षिणेत आणि कोकणात प्रत्येक कुटुंबात कोणती तरी एक पोथी नित्यनियमाने एकाने वाचून दाखवावी व/बाकीच्यांनी ती एकाग्रतेने ऐकावी असा प्रघात असे [शिव. पृ. ६]. पुराणकथांच्या श्रवणाची आवड सरदार व पेशवे ह्यांनाही होती.

ते प्राचीन भारतेतिहास, धर्म, नीती व संस्कृती समजावी म्हणून पुराणांच्या बखरी लिहवून घेत असत [पेम . ६५], त्या स्वारीशिकारींतही आपल्या-बरोबर बाळगत असत [तत्रैव पृ. ८०], आणि विश्रांतीच्या वेळी शनिवार-वाड्यावर होणारी प्रवचने, कीर्तने, पुराणे ऐकत असत [तत्रैव पृ० ७५]. नामदेव, एकनाथ, दासोपंत, समर्थ, अमृतराय असे कित्येक मराठी कवी उत्तम कीर्तनकार होते. अशांपैकीच एखाद्याने काव्य ३.१० हे कीर्तनात उपयोगी पडावे म्हणून रचलेले असावे.

एकंदरीने, प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेल्या बारा मध्ययुगीय मराठी काव्यांची स्थितिगती वर वर्णन केल्याप्रमाणे आहे.

—: ० :—

निवडक शब्दांचे अर्थ

अतुर्वळी–अतिबलाढ्य.
अहाच–अल्प, उतळ [भाप्र. ३१]
आसुडणे–झटका देणे.
उपडणे–होते ठायांतुन कहडणे [तंको. ४२]
उपावला–पावला.
किंकळी–अरोळी [तंको. ५०]
गजबज–घाबरणे [तंको. ६०]
चमकणे–भये माघारणे [भाप्र. ८८]
झोंवणे–कवळणे [तंको. ८१]
टाकणे–पावणे [भाप्र. ४१]
ठाण–शरीराची ठेवण.
ताऱ्हेजणे–ताहन लागणे [तंको. ९१]
तोडर–येकट पायांत घातीला तो बिरदाचा वाळा [तंको. ९४]
दंडणे–शोभणे.
दुकानि–दोन्ही कानांनी
धाकणे–भय वागवणे [तंको. १०२]
धावण्या–कैवारिया [तंको. १०३]
निवडणे–वेचणे [तंको. १०७]
पाळा–जमाव [भाप्र. ८९]
पुष्कर–सरोवर

बाणणे–शोभणे
बांदवडी–बंदिखाना [तंको. १२४]
बिलकणे–बळाने कवेंटाळणे [तंको. १२५]
मेकळणे–सोडणे [तंको. १४०]
देधवां–आता [तंको. १४२]
योगग्रहणी–योग्यांमध्ये मुख्य
लिंपे–गुंते ॥लागे॥ [तंको. १५०]
वरसे–वोरसे–पान्हा सोडते.
वित–युव
विषम–पक्षपातपूर्ण वर्तन
वैनतेय–गरुड
वोज–तेजस्वी
वोढी–आकर्ष [तंको. १६०]
सत्रावी–अमृतकला
समेळ–समूह जमाव
सा–कामादी षड्रिपू
साचार–खरे, साच [तंको. १६८]
सुरगाणा–देवगायक, गंधर्व
हारी–वळी, कतार [तंको १७५]
–पंक्ति [भाप्र. ६१]
हाव–असोसी [तंको १७५]
हिंपुटी–कष्टी [तंको १७७]
हुलकणे–चवताळणे [तंको. १७८]

संदर्भ-ग्रन्थांची यादी

Belvalkar, S. K., (ed.), **The Mahabharata, Vol. 15,** The Shantiparvan, [Part III-A], Poona, B.O.R.I., 1954.

—— , **The Mahabharata, Vol. 16,** The Shantiparvan [Part III-B], Poona, B.O.R.I., 1954.

Gode, P. K., and C. G. Karve (ed.), Prin. V. S. Apte's **The Practical Sanskrit-English Dictionary, Vol. I.,** Poona, Prasad, 1957.

Mani, V., **Puranic Encyclopaedia,** First edition in English Delhi, Motilal Banarsidass, Delhi, 1975.

Raghavan, V. and K. K. Raja, **New Catalogus Catalogorum Vol. Five,** Madras, University of Madras, 1969. (Madras University Sanskrit Series 30)

कुंवरलाल, 'व्यासशिष्य,' **इतिहासपुराणसाहित्य का इतिहास**, प्रथम संस्करण, आगरा-दिल्ली, इतिहासविद्या प्रकाशन, मे १९७८.

खरे, ग० ह०, (संपा०), भारत-इतिहास-संशोधक-मण्डलस्थ-हस्तलिखित-ग्रन्थानुक्रमणिका, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९६०.

गाडगीळ, अ० ल०, (संपा०) **श्रीरामकोश खण्ड पहिला : भाग दुसरा,** मराठी आवृत्ती पहिली, पुणे, श्रीरामकोशमंडळ, १९७६.

तुकाराम, **तुकाराम गाथा**, (संपा०), अ० वा० मराठे, प्रथम आवृत्ती, मुंबई, साहित्यरस माला, १९६४.

तुळपुळे, शं० गो०, (संपा०), **मराठी भाषेचा तंजावरी कोश**, आवृत्ती पहिली, पुणे, व्हीनस प्रकाशन, ऑक्टोबर १९७३.

देव, शं० श्री०, (संपा०), **श्रीरामदासी संशोधन प्रथम खंड**, धुळे, सत्कार्योत्तेजक सभा, शके १८५५.

देव, शं०श्री०, (संपा०), **श्रीरामदासी संशोधन द्वितीय खंड**, धुळें, सत्कार्योत्तेजक सभा, शके १८६०.

पाठक, यशवंत, **नाचू कीर्तनाचे रंगी**, प्रथमावृत्ती, पुणे, कॉन्टिनेन्टल्, १९८०.

पानसे, मु०ग०, **यादवकालीन महाराष्ट्र**, आवृत्ती पहिली, मुंबई, बईमुं मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६३.

बापट, वि० वा०, (भाषां०) आनंदरामायण,, आवृत्ती तिसरी, मुंबई, यंदे मंडळी, १९२८.

भावे, वा०कृ०, पेशवेकालीन महाराष्ट्र, नवी दिल्ली, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, १९७६.

भावे, वि० ल० (लेखक) व शं० गो० तुळपुळे (पुरवणीलेखक), महाराष्ट्रसारस्वत पुरवणीसह, आवृत्ती पाचवी, मुंबई, पॉप्युलर, १९६३

मंडलीक, वि० ना० (संशो०), पद्मपुराणम् (उत्तरखण्ड-चतुर्थ भाग), पुणे, आनन्दाश्रम, १८९४.

मनु, मनुस्मृतिः, (संशो०) ना०रा० आचार्य, दशम संस्करण, मुंबई, निर्णयसागर मुद्रणालय, १९४६.

रामकवि, भाषाप्रकाश, (संपा०) शं० गो० तुळपुळे, पुणे, पुणे विद्यापीठ, १९६२ (प्राचीन मराठी गद्य-पद्य-माला : २).

राव, टी०बी० रामचंद्र (संक०), तंजावरच्या सरस्वती महालातील मराठी ग्रन्थांची बयाजवार यादी भाग १ ला, तंजावर, टी० एम्० एस्० एस्० एम् लायब्ररी, १९२९.

———, तंजावरच्या सरस्वती महालातील मराठी ग्रन्थांची बयाजवार यादी भाग २ रा, तंजावर, टी०एम०एस्०एस्०एम० लायब्ररी, १९३२.

———, तंजावरच्या सरस्वती महालातील मराठी ग्रन्थांची बयाजवार यादी भाग ३ रा, तंजावर, टी०एम्०एस्०एस्०एम्० लायब्ररी, १९३८.

वाडेकर, दे०द० व इतर (संपा०), चापेकर-संस्मृति [प्रबंधोपहार], मुंबई, चापेकर-संस्मृति-समिती, १९४६.

विष्णुधर्मोत्तरपुराण, मुंबई, श्रीवेंकटेश्वर स्टीमप्रेस, शके १८३४.

श्रीपंचरत्नगीता सचित्र, बारावे संस्करण, गोरखपुर, गीता प्रेस, संवत् २०३२.

सरकार, जदुनाथ, शिवाजी व शिवकाल, (अनु० वि० स० वाकसकर), मुंबई, भारतगौरव-ग्रन्थमाला, १९३० (भारतगौरवग्रन्थमाला पुष्प ८९वें)

सान्वय सार्थ श्रीमद्भागवत स्कंध ७-८ संपूर्ण, भाग ५, मुंबई, दामोदर सावळाराम आणि मंडळी, १९२७.

स्कांद महापुराण, मुंबई, श्रीवेंकटेश्वर स्टीम प्रेस, शके १८३१.



लेखक-परिचय

डॉ. वामन केशव लेले

(जन्म-मुंबई, २९ मे १९३३)

शालेय जीवनात अनेक पारितोषिके मिळविली.

बी०ए० (मुंबई विद्यापीठ, १९५४) पहिला वर्ग.

एम्०ए० (मुंबई विद्यापीठ, १९५६) पहिला वर्ग.

एम्०ए० च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल 'न०चिं० केळकर सुवर्णपदक' प्राप्त.

पीएच्०डी० (पुणे विद्यापीठ, १९७०).

गेली दोन तपे मराठीचे अध्यापन-कार्य.

सध्या काशी हिन्दू विश्वविद्यालयात मराठीचे प्रपाठक.

लेखकाची इतर पुस्तके

कविकण्ठाभरण

[मराठी व हिन्दी संस्करणे]

औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा

[ह्या पुस्तकाला महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था यांची पारितोषिके आणि पुणे विद्यापीठाचे प्रकाशन-अनुदान प्राप्त].

भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ति : प्रथम युग

[ह्या ग्रंथास महाराष्ट्रशासन, इचलकरंजी ग्रंथोत्तेजक संस्था, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था यांची पारितोषिके मिळाली].

मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्य

[नेस वाडिया महाविद्यालयाचे प्रकाशन-अनुदान मिळाले].

काव्य, शास्त्र व संस्कृति

[ह्या पुस्तकाला मुंबई विद्यापीठ व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था यांची पारितोषिके प्राप्त]

विचार और विवेचन (हिन्दी)

[ह्या पुस्तकाला विद्यापीठ अनुदान मंडळाचे प्रकाशन-अनुदान मिळाले].